आज श्रीकृष्ण जन्माष्टमी



दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

## सरकारचे शिष्टमंडळ आंदोलनस्थळी पोहोचले

**आंतरवाली सराटी :** सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासह विविध मागण्यांसाठी आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा गुरूवारी सहावा दिवस होता. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मराठा बांधव आंतरवाली सराटीत दाखल होत आहेत. मनोज जरांगे यांची भेट घेण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ आंतरवाली सराटीकडे रवाना झाले आहे. मंत्री उदय सामंत, विखे पाटील, प्रसाद लाड व मकरंद पाटील हे आंदोलनस्थळी पोहचले असून, जरांगे व शिष्टमंडळामध्ये ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्रासह इतर मागण्यांसंदर्भात चर्चा सुरू आहे.

## न्यूज ब्रीफ

### डिजिटल अरेस्टची धमकी; १ कोटी २८ लाखांचा गंडा

**पुणे :** मगरपट्टा सिटी भागात एका ज्येष्ठ नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट'ची धमकी देऊन सायबर चोरट्यांनी १ कोटी २८ लाख रुपयांने गंडा घातला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने शिवाजीनगर येथील सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदार ७४ वर्षांचे असून, ते हडपसरमधील मगरपट्टा सिटीत राहतात. सायबर चोरट्यांनी २० ऑगस्ट रोजी तक्रारदार आणि त्यांच्या पत्नीच्या मोबाइलवर संपर्क साधला.

### मराठा आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यू

**मुंबई :** आंतरवाली सराटी : जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या बीड जिल्ह्यातील एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. दशरथ रायकर (रा. संगम, जि. बीड) असे मृत आंदोलकाचे नाव आहे. रायकर हे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आंतरवाली सराटीत आले होते. बुधवारी रात्री ते येथील एका शेतात झोपले होते. मात्र, आज सकाळी ते उशिरापर्यंत उठले नाहीत. त्यामुळे त्यांना तातडीने अंबड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### दक्षिण गडचिरोलीत भूकंपाचा सौम्य धक्का

**नागपूर :** दक्षिण गडचिरोली शहरासह परिसराला गुरुवारी पहाटे भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी पहाटे ४ वाजून ३६ मिनिटे ५८ सेकंदांनी ३.६ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली.
या भूकंपाचा केंद्रबिंदू सिरोंचा तालुक्यातील राखीव वनक्षेत्र परिसरात होता. तो जमिनीपासून अवघ्या १० किलोमीटर खोलीवर (१९.१०३ अंश उत्तर अक्षांश व ७९.९२९ अंश पूर्व रेखांश) होता.

### रीलस्टार संतोष पंडित यांना मध्यरात्री अटक

**पुणे :** महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि पुणे महापालिकेच्या विधी समिती सदस्य मिताली कुलदीप साळवेकर यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह, वक्तव्ये तसेच व्हिडीओ प्रसारित केल्याबद्दल रिलस्टार संतोष पंडित यांच्याविरोधात कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी मध्यरात्री एक वाजता पोलिसांनी त्यांना त्यांच्या घरातून अटक केली.

### आरोपी अटकेत : राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद

# डीजेविरोधात आवाज उठविला; विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला

**पुणे, वृत्तसंस्था :**

गणेशोत्सवात डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला आणि ध्वनिप्रदूषणाला विरोध करून राज्यभरात चर्चेत आलेले पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांच्यावर टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात गुरूवारी चार ते पाच तरूणांनी हल्ला केला. हल्ला करणाऱ्या आरोपीला पोलीसांनी अटक केली असून संतोष चव्हाण असे आरोपीचे नाव आहे. तो एका गणेश मंडळाचा माजी अध्यक्ष असल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. दरम्यान या घटनेचे राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले आहेत. यावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे.

विद्यानंद बापट हे टिळक रोडवरील कशाळे चौक परिसरात एका वृत्तवाहिनीशी संवाद साधत होते. त्याच वेळी स्थानिक गणेश मंडळांशी संबंधित असल्याचे सांगणाऱ्या ४ ते ५ तरुणांचा गट तिथे आला. त्यांनी बापट यांना अडवून त्यांच्याशी वाद घातला



आणि काही क्षणांतच त्यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. सुदैवाने परिसरातील नागरिक धावून आल्याने मोठा अनर्थ टळला. संविधानाच्या मार्गाने आपली भूमिका मांडणाऱ्या विद्यानंद बापट यांना झालेली मारहाण हे वैचारिक अध:पतनाचे लक्षण आहे. या गुंडांचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. बापट यांची तक्रार नोंदवून घेण्यात आली असून, या प्रकरणातील आरोपी संतोष चव्हाण याला शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

### बापट यांना झालेली मारहाण अयोग्य : मुख्यमंत्री



■ डीजे आणि ध्वनीप्रदूषणाविरोधात आवाज उठवणारे विद्यानंद बापट यांना झालेली मारहाण अत्यंत अयोग्य असल्याचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले. लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार असून पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला तत्काळ अटक केली असल्याचे त्यांनी सांगितले.

### सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी हल्ला

*आपल्या भूमिकेवर बोलताना बापट यांनी ''घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद् गर्दभरोहणम्'' (मडके फोडावे, वस्त्र फाडावे किंवा गाढवावर बसावे; पण कोणत्याही प्रकारे प्रसिद्ध व्हावे) या संस्कृत श्लोकाचा संदर्भ दिला. केवळ सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी हा हल्ला करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.*

**- विद्यानंद बापट**

### नागपुरात डीजेवर १ नोव्हेंबरपर्यंत बंदी

■ नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी नागपूर शहरात डीजे, डॉल्बी साऊंड, मॉडिफाइड साऊंड सिस्टिम, डीजेची वाहने तसेच बीमलाईट आणि लेझर बीमलाईटच्या वापरावर १ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्याचे आदेश जारी केले आहेत. गुरुवार, ३ सप्टेंबरच्या रात्रीपासून या आदेशाची अंमलबजावणी सुरू होणार असून, आगामी सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक तसेच संबंधित कार्यक्रमांमध्ये प्रतिबंधित साउंड सिस्टीम आणि लेझर लाईटचा वापर करता येणार नाही.

# शेअर बाजारात मोठी घसरण!

## सेन्सेक्स ४१७ अंकांनी कोसळला

### गुंतवणूकदारांचे ५ लाख कोटी बुडाले

**मुंबई, वृत्तसंस्था :**



शेअर बाजाराची सुरुवात गुरूवारी अतिशय सकारात्मक झाली. सुरुवातीच्या सत्रात सेन्सेक्स ७७ हजार अंकांच्या जवळ पोहोचला होता आणि बाजारात ३५० हून अधिक अंकांची तेजी दिसून आली. मात्र, दिवसाखेर विक्रीच्या प्रचंड दबावामुळे बाजाराचे चित्र पूर्णपणे बदलले. दिवसभरातील उच्चांकी पातळीवरून सेन्सेक्स तब्बल ४१७ हून अधिक अंकांनी घसरला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे तब्बल ५ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

गुरुवारी भारतीय शेअर बाजारातील घसरण कायम राहिली. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती, बॉन्ड यील्ड आणि इतर कारणांमुळे गुंतवणूकदारांचा विश्वास काहीसा कमी झाला. त्यामुळे सकाळची तेजी टिकवण्यात सेन्सेक्स आणि निफ्टीला अपयश विद्यानंद बापटांवरील हल्ल्याची गृह मंत्रालयाकडून गंभीर दखल: फडणवीस म्हणाले- पोलिस संरक्षण देणार, दिशा सालियन प्रकरणावरही दिली प्रतिक्रियाआले. साप्ताहिक एक्सपायरीच्या दिवशी क्लोजिंग ऑक्शन सेशन नंतर बाजारात जोरदार घसरण झाली. यादरम्यान, सेन्सेक्स ४१७ अंकांनी म्हणजेच सुमारे ०.६ टक्के घसरून ७६,१५३ अंकांवर बंद झाला, तर निफ्टी ५०: ४१ अंकांनी म्हणजेच ०.१७ टक्के घसरून २३,८७३ अंकांवर आला.

### या शेअर्समध्ये मोठी घसरण

■ सेन्सेक्समधील घसरणीचे नेतृत्व करणाऱ्या प्रमुख शेअर्समध्ये टायटन, ट्रेंट, आयटीसी, महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज फिनसर्व्ह आणि एचसीएल टेक्नॉलॉजीज यांचा समावेश होता. या कंपन्यांच्या शेअर्समध्ये सुमारे २ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. याशिवाय टेक महिंद्रा, सन फार्मा, टीसीएस, अल्ट्राटेक सिमेंट, बजाज फायनान्स, कोटक महिंद्रा बँक, मारुती सुझुकी, इंडिगो आणि हिंदुस्तान युनिलिव्हर यांच्या शेअर्समध्ये १ टक्क्यांहून अधिक घसरण झाली. मात्र, बाजारातील या घसरणीच्या ट्रेंडच्या उलट ॲक्सिस बँक आणि अदानी पोर्ट्स यांच्या शेअर्समध्ये सुमारे १ टक्क्यांची वाढ झाली.

### लग्नसमारंभात कोसळले मिसाइल

**तेहरान :** होर्मुझ सामुद्रधुनीजवळ असलेल्या कुहेस्तक या किनारपट्टीच्या शहरात एका भीषण हल्ल्यात मोठी जीवितहानी झाली.

एका मासेमाराच्या मुलीच्या विवाह सोहळ्यानिमित्त जमलेल्या नागरिकांवर अमेरिकेचे मिसाइल पडले. या हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला, ज्यात दोन चिमुकल्यांचा समावेश आहे. तर, जवळपास ६८ लोक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा टोकाला पोहोचला असून, अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने गुरुवारी कुवेतवर मोठा हल्ला केला. गुरुवारी पहाटे कुवेतमध्ये युद्धाचे सायरन वाजले. दरम्यान, इराणच्या या खुल्या आक्रमकतेदरम्यान आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने अनेक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हवेतच नष्ट केल्याची माहिती कुवेतच्या संरक्षण मंत्रालयाने एक्सवर दिली. याआधी बुधवारी अमेरिका-मित्र राष्ट्रांनी जॉर्डन आणि बहारीननेही इराणचे अनेक हवाई हल्ले परतवून लावल्याचे जाहीर केले होते.

## 'सन १९९४ पासून सत्तेत, मग आरक्षणासाठी काय केले?'

### राधाकृष्ण विखेंवर शरद पवारांचा पलटवार

**बारामती, वृत्तसंस्था :**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या सहा दिवसांपासून उपोषण सुरु आहे. मनोज जरांगेच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका स्पष्ट करताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेतली.

यावेळी राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना ''१९९४ साली मंडल आयोगाच्या शिफारसी स्विकारल्या असत्या आणि मराठा समाजाचा अंतर्भाव केला असता तर हा इतिहास घडला नसता. १९९४ साली जे मुख्यमंत्री होते, हे त्यांचे पाप आहे. मात्र, आम्ही आता प्रयत्न करत आहोत,'' अशा शब्दांत विखे पाटील यांनी नाव न घेता शरद पवार यांच्याकडे बोट दाखवले होते. विखे पाटील यांनी १९९४ सालातील तत्कालीन सरकारवर टीका केल्यानंतर शरद



पवार यांनीही १९९४ पासून आजपर्यंत तुम्ही काय करताय? ९४ पासून सहा वर्षे आणि आता २६ वर्षे झाली, असा सवाल करत पवारांनी विखे पाटील यांना प्रत्युत्तर दिले. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बोलताना पवार यांनी लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याची संधी दिली पाहिजे, अशी भूमिका मांडली. विद्यार्थ्यांच्या काही मागण्या आहेत. सरकारने स्वीकारलेले धोरण चुकीचे असल्याचे न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे. न्यायव्यवस्थेने सरकारला एक प्रकारे कठोर शब्दांत इशारा दिला आहे. प्रशासन आणि न्यायव्यवस्थेच्या भूमिकेबाबत आज निर्माण झालेली परिस्थिती चिंताजनक असल्याचेही पवार म्हणाले.

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर टोलवा-टोलवी

**नाशिक :** वसतिगृह आणि आश्रमशाळांच्या मूलभूत मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण सुरू आहे. वसतिगृह, आश्रमशाळा आणि शिक्षणाच्या मूलभूत सुविधांसंबंधी आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांकडून आणि सरकारकडून केवळ थातूरमातूर आणि टोलवाटोलवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

नाशिक येथे सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या उपोषणाला शिवसेना (उबाठा) चे नेते अदित्या ठाकरे यांनी गुरूवारी भेट दिली. सरकारला लोकांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांपेक्षा कोण शाकाहारी खातो आणि कोण मांसाहारी, यावरच राजकारण करण्यात जास्त रस आहे. कोणी उपाशीपोटी मरत असेल तर भाजप आणि सरकारला त्याचा काहीही फरक पडत नाही,'' असा संतापही त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनाला शिवसेना (उबाठा) पक्षाचा पूर्ण पाठिंबा असून, याप्रश्नी आपण काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याशीही चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## भारतीय हवाई दलाच्या स्वदेशी शस्त्रसामर्थ्यात 'खगांतक-२४३'ची भर

### लांब पल्ल्याची हल्लाक्षमता होणार मजबूत

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारतीय हवाई दलाने स्वदेशी लाँग रेंज ग्लाइड बॉम्ब 'खगांतक-२४३' ची यशस्वी चाचणी केली आहे. या बॉम्बच्या समावेशामुळे भारताची स्वदेशी लांब पल्ल्याची हल्ला क्षमता आणखी मजबूत होणार आहे.

या बॉम्बमध्ये १२५ किलो वजनाचे एमके-८१ वॉरहेड बसवण्यात आले आहे. हा बॉम्ब १४४ ते १८० किलोमीटर अंतरावरील लक्ष्यावर हल्ला करू शकतो. या क्षमतेमुळे लढाऊ विमानांना शत्रूच्या हवाई संरक्षण यंत्रणेच्या थेट कक्षेत न जाता दूरवरच्या लक्ष्यांवर हल्ला करता येणार आहे. त्यामुळे वैमानिक आणि लढाऊ विमानांची जोखीम कमी करत शत्रूच्या महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्याची क्षमता वाढणार आहे.

'खगांतक-२४३' ची पहिली चाचणी भारतीय हवाई दलाने पोखरण येथे सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानातून केली होती. हा स्वदेशी ग्लाइड बॉम्ब नागपूरस्थित स्टार्टअप जेएसआर डायनॅमिक्सने भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड सोबत विकसित केला आहे. भारतीय हवाई दलाने पोखरण येथे सुखोई-३० एमकेआयवर या बॉम्बची चाचणी केली होती. भविष्यात मिग-२९के आणि मिराज-२००० या लढाऊ विमानांमध्येही 'खगांतक-२४३'चा समावेश करण्याची योजना आहे.



### तुलनेने कमी खर्चात तयार होतो ग्लाइड बॉम्ब

■ ग्लाइड बॉम्बमध्ये क्रूझ क्षेपणास्त्रांप्रमाणे स्वतंत्र इंजिन नसते. हे बॉम्ब विमानातून सोडल्यानंतर हवेच्या प्रवाहामुळे निर्माण होणाऱ्या उचल शक्तीचा वापर करून लक्ष्याच्या दिशेने सरकत जातात. इंजिन नसल्यामुळे ग्लाइड बॉम्ब तुलनेने कमी खर्चात तयार करता येतात. त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य होते. युद्धाच्या परिस्थितीत मोठ्या संख्येने अशा शस्त्रांचा वापर करण्यासाठी ही क्षमता महत्त्वाची ठरू शकते.

# सण-उत्सवांतील भंडाऱ्यांसाठी घ्यावी लागेल परवानगी

### तुकाराम मुंढेंकडून 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' लागू

**मुंबई, वृत्तसंस्था :**

सण-उत्सवांच्या काळात भाविकांना वाटल्या जाणाऱ्या महाप्रसाद, लंगर आणि भंडाऱ्यांमधील अन्नाच्या गुणवत्तेवर आता अन्न आणि औषध प्रशासनाची करडी नजर असणार आहे.

सणांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय लागू केला आहे, ज्याअंतर्गत महाप्रसाद आणि अन्नदानाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन तपासणी केली जाणार आहे. सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा स्थायी



आदेश लागू करण्याची भारताच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे.

सणांच्या काळात अन्नपदार्थांमधील वाढती भेसळ रोखण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने वार्षिक कॅलेंडर तयार केले असून, धडक कारवाईसाठी विशेष नियोजन केले आहे.

### सणांचे तीन स्तरांवर वर्गीकरण

■ प्रथम श्रेणी (राज्यव्यापी सण): गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ (ख्रिसमस) आणि नववर्ष पूर्वसंध्या.द्वितीय श्रेणी (प्रादेशिक सण): मकर संक्रांती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिक वारी, श्रावण महिना, जन्माष्टमी, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरुनानक जयंती. तृतीय श्रेणी (स्थानिक सण): स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरुस ही कारवाई सणाच्या २१ दिवस आधी सुरू होऊन सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत चालणार आहे.

### ग्रुप कॅप्टन अभिनंदन हवाई दलातून निवृत्त



**नवी दिल्ली :** २०१९ मध्ये पाकिस्तानसोबत झालेल्या हवाई संघर्षात पाकिस्तानी एफ-१६ लढाऊ विमान पाडून देशभरात चर्चेत आलेले भारतीय हवाई दलाचे माजी ग्रुप कॅप्टन अभिनंदन वर्धमान हवाई दलातून निवृत्त झाले असून त्यांनी आता नागरी विमान वाहतूक क्षेत्रात प्रवेश केला आहे. पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी बालाकोट येथे हवाई हल्ले केले होते. त्यानंतर २७ फेब्रुवारीला भारत आणि पाकिस्तानच्या हवाई दलांमध्ये संघर्ष झाला होता. त्यावेळी विंग कमांडर असलेले अभिनंदन वर्धमान मिग-२१ बायसन विमानातून उड्डाण करत होते.

### दिपके आणि केजरीवालांवर आंदोलनाचा सौदा केल्याचा आरोप

# कॉकरोच जनता पार्टीमध्ये उभी फूट!

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर देशभरात चर्चेत आलेल्या कॉकरोच जनता पार्टीमध्ये उभी फूट पडली आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासोबत हातमिळवणी करून आंदोलनाचा सौदा केला, असा गंभीर आरोप करत मूळ आंदोलनातील प्रमुख कार्यकर्ते मनीष ब्रह्मभट्ट यांनी गुरुवारी 'कॉकरोच जनता पार्टी डेमोक्रेटिक' या नव्या राजकीय पक्षाची अधिकृत घोषणा केली. या बंडामुळे युवा आंदोलनाच्या नावाखाली स्थापन झालेल्या या पक्षात अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.

अहमदाबादचे रहिवासी आणि आंदोलनात सुरुवातीपासून सक्रिय राहिलेले मनीष ब्रह्मभट्ट यांनी





नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन अभिजीत दिपके यांच्यावर थेट तोफ डागली. ''जंतर-मंतरवरील आंदोलन देशातील सामान्य जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या घामातून उभे राहिले होते. मात्र, आंदोलन यशस्वी होताच ते पूर्णपणे विकले गेले. अभिजीत दिपके यांनी घरी बसून स्वत:च्या मर्जीने १२ लोकांची राष्ट्रीय कोअर टीम तयार केली. असा गंभीर आरोपही मनीष ब्रह्मभट्ट यांनी केला. आपण भाजपच्या पाठीशी नसल्याचे स्पष्ट करत मनीष ब्रह्मभट्ट म्हणाले की, कॉकरोच आंदोलनाची मूळ कल्पना ही देशातील भ्रष्ट व्यवस्थेविरोधात लढण्याची होती. त्यामुळे कोणत्याही एका नेत्याची किंवा 'आप'ची हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि प्रत्येक राज्याला समान अधिकार देण्यासाठी 'सीजेपी डेमोक्रेटिक' ची स्थापना करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

### मुस्लिम, शीख विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व शून्य

■ नव्या कार्यकारणीतील रचनेवर आक्षेप नोंदवताना ब्रह्मभट्ट यांनी सीजेपीच्या सर्वसमावेशकतेवर प्रश्न उपस्थित केले. ''राष्ट्रीय कोअर टीममध्ये एकाही सामान्य विद्यार्थ्याचा समावेश करण्यात आलेला नाही. आंदोलनाच्या काळात ज्या शीख समाजाने गुरुद्वारांचे दरवाजे उघडून लंगर वाटले, त्या समाजातील एकाही शीख प्रतिनिधीला स्थान मिळाले नाही. तसेच एकाही मुस्लिम पुरुषाला या टीममध्ये घेण्यात आलेले नाही.''

## न्यूज ब्रीफ

### उबाठाचे आमदार शिंदेसोबत जायला तयार

**मुंबई :** उबाठाचे १३ ते १४ आमदार हे उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेसोबत जायला तयार झाले आहेत, राऊतांनी त्याकडे लक्ष दिले पाहिजे नाहीतर उद्या उठून पुन्हा बोंब मारतील की आमचे खासदार, आमदार आणि नगरसेवक पळवले, असा टोला भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी उबाठाला लगावला आहे. नवनाथ बन म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या नेतृत्वामध्ये देश पुढे जात आहे. त्यांचा राजीनामा कोणीही मागितला नाही. भाजपमध्ये देश प्रथम ही भावना घेत काम केले जाते. उबाठासारखे आदित्य ठाकरेविरुद्ध संजय राऊत असे काही भाजपमध्ये होत नाही, असा टोला बन यांनी उबाठाला लगावला आहे. उबाठामध्ये संजय राऊत मग उद्धव ठाकरे, आणि शेवटी आदित्य ठाकरे असे सुरू आहे, राऊतांना पक्षप्रमुख म्हणून पक्ष ताब्यात घ्यायचा आहे. तुम्ही आता प्रतिपक्षप्रमुख म्हणून काम करत आहे.

**नाना पटोलेंचा थेट आरोप ; राष्ट्रवादीच्या आमदारांच्या भूमिकेवरही सवाल**

# अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवतेय !

**मुंबई / वृत्तसंस्था**

दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी विरोधकांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांत अद्याप एफआयआर नोंदवण्यात न आल्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दिला आहे. "अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार नक्कीच काहीतरी लपवत आहे," असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला आहे.

सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीच्या ४० आमदारांच्या मौनावरही त्यांनी संशय व्यक्त केला. पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी अजित पवारांचा अपघाती मृत्यू, राष्ट्रवादीच्या आमदारांची भूमिका आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरील पंतप्रधानांच्या



दाव्यांवरून सरकारवर कडाडून टीका केली.

अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले. "अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आणि रास्त आहे."

"सध्या सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आमदार सत्तेत आहेत, त्यांनी या प्रकरणावर गुन्हा का दाखल झाला नाही, अशी कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. त्यांच्या आमदारांनी एफआयआरची साधी मागणीही केली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काय गोम दडली आहे, हे कळायला आता मार्ग नाही.

### ७.८ टक्के जीडीपीचा दावा खोटा आणि हास्यास्पद

देशाचा जीडीपी वाढल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'गुड न्यूज'वर नाना पटोले यांनी जोरदार टीका केली. "पंतप्रधानांनी सोशल मीडियावर जीडीपी वाढल्याचा आनंद व्यक्त केला, पण देशभरातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनीच या दाव्यांची पोलखोल करत त्यांना ट्रोल केले आहे." "जर भारताचा जीडीपी ७.८ टक्के इतका प्रचंड वाढला असेल आणि जागतिक पातळीवर देश अव्वल ठरत असेल, तर देशात महागाई का वाढत आहे? बेरोजगारी का संपलेली नाही? शेतकरी आत्महत्या का करत आहेत? जनतेसमोर खोटे आकडे फेकून दिशाभूल केली जात आहे," असा थेट निशाणा पटोले यांनी साधला.

# फडणवीस जिथे आहेत तिथेच आवश्यक

**राऊतांच्या दाव्यावर पंकजा मुंडेंचे स्पष्टीकरण**

**नाशिक / वृत्तसंस्था**



देवेंद्र फडणवीस हे अत्यंत प्रभावी नेतृत्व आहे. मी त्यांच्यासोबत गेली २५ वर्षे काम करत आहे. ते आज ज्या पदावर आहेत, तिथून अधिक मोठे व्हावेत अशी आमची प्रार्थना आहे. पण सध्या ते जिथे आहेत तिथेच राज्याला त्यांची गरज आहे, अशा शब्दांत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल संजय राऊतांनी केलेल्या दाव्यांतील हवा काढली आहे.

देवेंद्र फडणवीस यांना उपपंतप्रधान करायचे हे संघ किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः संजय राऊत यांनाच सांगितले असावे, त्याशिवाय ते एवढ्या आत्मविश्वासाने कसे बोलू शकतात? असा टोला पंकजा मुंडे यांनी राऊतांना लगावला आहे. तर मराठा आरक्षणसंदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांशी दर दोन तासांनी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेत आहे. संविधानाच्या चौकटीत राहून मराठा समाजाला कसा न्याय देता येईल, यासाठी सरकार सकारात्मक प्रयत्न करत आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या की, देशात गेल्या १० वर्षांत देशात रस्ते, हायवे, मेट्रो आणि रेल्वेचे जाळे निर्माण झाले आहे. मुद्रा योजनेच्या माध्यमातून नवीन उद्योग उभे राहत असून शेतकरी आनंदी आहे. तसेच लखपती दीदी आणि लाडकी बहीण यांसारख्या योजनांमधून महिलांचे सबलीकरण होत असून देश एका सकारात्मक प्रवासाकडे निघाला आहे.

# जरांगेंचे आंदोलन म्हणजे सीरिअलचा शो : सदावर्ते

**मुंबई / वृत्तसंस्था**



मराठा आरक्षणासाठी अंतरवली सराटीत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावरून ज्येष्ठ वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज्य सरकार आणि जरांगे यांच्यावर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. "हे आंदोलन नसून दरवर्षी येणारा टीव्ही सीरिअलचा शो आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या शोचे 'प्रोड्युसर' आहेत, उद्योगमंत्री उदय सामंत 'डायरेक्टर' आहेत, तर मनोज जरांगे हे केवळ स्क्रिप्टनुसार काम करणारे 'हेकडी कलाकार' आहेत," असा घणाघाती आरोप सदावर्ते यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

तसेच, महिला आयएएस अधिकाऱ्याशी असभ्य वर्तन करणे, मुंबईची शांतता भंग करणे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा अवमान केल्याप्रकरणी मनोज जरांगे पाटील यांना तत्काळ अटक करून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करावे, अशी थेट मागणी त्यांनी केली.

पत्रकार परिषदेत राजकीय स्थितीवर ताशेरे ओढताना सदावर्ते म्हणाले, "राज्यात सध्या जातीय राजकारणाचा एक सीझन सुरू आहे. टीव्हीवर जशा मालिकांचे एपिसोड सुरू असतात, तसाच हा 'जरांगे सीझन' आहे.

या सीझनचे प्रोड्युसर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत, डायरेक्टर उदय सामंत आहेत आणि मनोज जरांगे हे मुख्य कलाकार आहेत."

# आरोग्य विभागाकडून 'शहरी आरोग्य आयुक्तालय'ची स्थापना

**मुंबई / वृत्तसंस्था**

राज्यातील शहरी भागातील आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आणि राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून 'शहरी आरोग्य आयुक्तालय' स्थापन करण्यात आले आहे. या आयुक्तालयाची प्रशासकीय रचना सक्षम करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू करण्यात आले. त्यानंतर राज्यात 'राज्य आरोग्य अभियान' आणि त्याअंतर्गत 'राज्य आरोग्य सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत 'शहरी आरोग्य आयुक्तालय' स्थापन करण्यास मान्यता




### प्रशासकीय जबाबदाऱ्या अधिक स्पष्ट

शहरी आरोग्य आयुक्तालयाची प्रशासकीय संरचना निश्चित होईपर्यंत आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत विभाग प्रमुख, कार्यक्रम प्रमुख व क्षेत्रीय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाशी संबंधित मार्गदर्शक सूचना, धोरण आणि राज्य शासनाचे शहरी आरोग्यविषयक धोरण राबविण्यात येणार आहे.

देण्यात आली असून, त्याअंतर्गत शहरी आरोग्य आयुक्तांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, केंद्र व राज्य शासनाचे शहरी आरोग्यविषयक धोरण प्रभावीपणे राबविणे, शहरी आरोग्य सेवा बळकट करणे तसेच राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याद्वारे आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत व परिणामकारकतेत वाढ करण्यासाठी आयुक्तालयाची प्रशासकीय यंत्रणा सक्षम करण्यात येत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत खारपाडा टोल स्थगित करावा

**मुंबई / वृत्तसंस्था**



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत खारपाडा येथे होणारी टोल आकारणी स्थगित करावी, अशी मागणी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

कोकणातील रस्ते वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. सध्या रस्ता दुभाजक, उड्डाणपूल, साईड पट्टी इत्यादी कामे सुरू असल्याने काही ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू आहे. वाहतुकीसाठी अपेक्षित सोयी सुविधा पूर्ण झालेल्या नसताना खारपाडा येथे होणारी टोल आकारणी बंद व्हावी या कोकणवासीयांच्या भावनेचा आदर करत हा टोल स्थगित करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याकडे केल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

भविष्यात मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिक, व्यावसायिक यांना टोलमध्ये सवलत देण्याबाबतही विचार व्हावा, अशी विनंती ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलेल्या निवेदनात त्यांनी केली आहे.




## राशीभविष्य

- **मेष :** अनपेक्षित दिलासा मिळेल. नव्या योजना मार्गी लागतील. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ :** खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. कौटुंबिक समस्या संभवतात.
- **मिथुन :** मनात चिंता राहील. कायदेशीर प्रकरणांबाबत पुरेशी काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **कर्क :** कार्यात सातत्य राखावं. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. अनावश्यक ताण-तणाव दूर ठेवावेत.
- **सिंह :** महत्त्वाच्या भेटीगाठी होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल. जमिनीच्या प्रश्नात तडजोड हिताची ठरेल.
- **कन्या :** गृहसजावट, स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रियजनांच्या भेटी होतील. बाकी चिंता नसावी.
- **तूळ :** मोठे व्यवहार लांबणीवर टाकावे. सरकारी कामं मनाजोगी होतील. मुलांच्या प्रश्नातून मार्ग निघेल.
- **वृश्चिक :** वाढत्या खर्चाला आवर घालावा. सारं काही मनाप्रमाणे घडेल. विवाहातील अडचणी दूर होतील.
- **धनु :** धनलाभाचे योग आहेत. कौटुंबिक समस्यांवर मात कराल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर :** कार्यक्षेत्रात नव्या संधी लाभतील. गुंतवणूक तुर्तास नको. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळू शकेल.
- **कुंभ :** चिंता निर्माण करणारी वार्ता संभवते. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. बोलताना विचार करावा.
- **मीन :** घरगुती समस्यांचा ताण राहील. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल, नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.

## दिनविशेष

### ४ सप्टेंबर

**२०११ :** जगातील गतिमान धावपटू उसैन बोल्टच्या नेतृत्त्वाखाली जमैकाच्या पुरुष गटाने १०० मीटर स्पर्धेमध्ये ३७.०४ सेकंदात विश्वविक्रम प्रस्थापित केला.

**२०१३ :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर म्हणून रघुनाथ राजन यांनी सूत्रे स्वीकारली.

**२०१७ :** ध्वनीप्रदुषणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

## आरोग्यमंत्र

### ॲल्युमिनियम वापरताय ?

पूर्वी भारतामध्ये मातीची किंवा पितळ्याची कल्हई केलेली भांडी वापरली जायची. मात्र कालांतराने ॲल्युमिनियम आलं. आज ही भांडी प्रत्येकाच्या घरात पोहोचली आहेत. ॲल्युमिनियम किंवा हिंडालियमची भांडी आरोग्याला हानीकारक आहेत. विविध आजार बळावतात. ॲल्युमिनियमच्या भांड्यांवर स्टीलचा साधा चमचा जरी जोरात ओढला, तरी या धातूचे कण बाहेर पडतात. अशा भांड्यांत बनवलेले अन्न खाल्ल्यास धातूंचा अंश शरीरात जातो. भांड्यातील लोहतत्त्व अन्नात विरघळतं. लिंबू, टोमॅटो यांसारखे आम्लीय पदार्थ या भांड्यात शिजवले, तर भांड्यातील आयन्स (विद्युत्भारित कण) अन्नात लवकर विरघळतात. असे अन्न शरीरासाठी अपायकारक असते. मानवी शरीरामध्ये अशा धातूंना बाहेर काढून टाकण्याची मर्यादित क्षमता असते. त्यामुळे शरीरामध्ये असे धातू गेल्यास ते स्नायू,मूत्रपिंडे, यकृत (लिव्हर), हाडे इत्यादी ठिकाणी हळूहळू साठू लागतात. ॲल्युमिनियम मेंदूच्या पेशींवरही हानीकारक परिणाम करतो. अशा प्रकारे शरीरामध्ये साठत गेलेले ॲल्युमिनियम स्लो पॉयझन बनते.नैराश्य, चिंता, काळजी, स्मृतीलोप, हाडांशी संबंधित आजार, डोळ्यांचे विकार, मूत्रपिंडांची क्षमता घटणे, अतिसार, अतिआम्लता (हायपरॲसिडटी), अपचन, पोटदुखी, आतड्याला सूज येणे (कोलायटिस), वारंवार तोंड येणे, इसबसारखे (एक्झिमासारखे) त्वचारोग होतात. त्यामुळे ॲल्युमिनियमची भांडी टाळायला हवीत.



## सफर देशांची

### वनसंपदा जपणारा टांझानिया

टांझानिया हा पूर्व आफ्रिकेतला सर्वात मोठा देश आहे. 'डेडोमा' ही टांझानियाची राजधानी. स्वाहिली आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा आहेत. 'टांझानियन शिलिंग' हे या देशातलं चलन. 'झांझीबार', 'माफिया' आणि 'पेंबा' ही इथली प्रसिद्ध बेटं. या देशाच्या एका बाजूला हिंदी महासागर आहे. केनिया, युगांडा, रवांडा, बुरुंडी, कांगो, झांबिया, मलाबी आणि मोझांबिक हे टांझानियाचे शेजारी देश. 'माउंट किलिमांजारो' हे आफ्रिकेतलं सर्वात मोठं शिखर टांझानियामध्ये आहे. टांझानियामध्ये १२० जमातींचे लोक रहातात. 'सुकुमा' ही इथली सर्वात मोठी आदिवासी जमात आहे. या देशातले ९० टक्के लोक ग्रामीण भागात रहातात. बरेच लोक शेतीही करतात. आता इथले लोक शहरांकडे वळत आहेत. फूटबॉल आणि बॉक्सिंग हे इथले लोकप्रिय खेळ आहेत. टांझानियामध्ये झेब्रा, जिराफ, हत्ती, गेंडा, सिंह, बिबट्या, हिप्पोपोटॅमस, मगरी हे प्राणी मुक्तपणे फिरतात. इथल्या समुद्रात मोठ्या आकाराची कासवंही आढळतात. या देशात बरीच अभयारण्य आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर या देशावर ब्रिटनने सत्ता प्रस्थापित केली. १९६४ मध्ये या देशाला स्वातंत्र्य मिळालं.

## स्टाईल स्टेटमेंट

### जादू फ्रिलची...

फॅशनमध्ये सतत काही ना काही बदल होत असतात. सध्या फ्रिलची फॅशन इन आहे.पार्टी, सण, समारंभ अशा कोणत्याही ऑकेजनला तुम्ही फ्रिलवाले पेहराव कॅरी करू शकता.

* वेस्टर्न किंवा इंडो वेस्टर्न स्टाईलमध्ये फ्रील लूक हवा असेल तर फ्रिलवालं डेनिम जॅकेट कॅरी करा. हे जॅकेट तुम्हाला कूल लूक देईल. हे जॅकेट जीन्ससह कुर्त्यावरही कॅरी करता येईल.
* फ्रिलवाले टॉपही इन आहेत. पार्टी तसंच मैत्रिणींसोबत बाहेर जाताना तुम्ही असे टॉप्स कॅरी करू शकता. फ्रिलवाले क्रॉप टॉप शोभून दिसतात.
* तुम्ही फ्रिलवाल्या साड्याही कॅरी करू शकता. साड्यांचे पदर तसंच काठांना फ्रिल लूक दिला जातो. या साड्या पार्टीची शान ठरतात. बॉलिवूड सेलेब्जनाही अशा साड्यांची भुरळ पडली आहे.
* फ्रिलवाले लाँग ड्रेस कॅरी करता येतील. सिंगल फ्रिलपासून मल्टी फ्रिलपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे लाँग ड्रेस घालता येतील. ड्रेसच्या खालच्या बाजूला असे फ्रिल जोडलेले असतात. हे ड्रेस फारच सुंदर दिसतात.

## पंचांग

**शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
श्रावण कृ. ८ **(श्रीकृष्ण जयंती)**,
चंद्रराशी : वृषभ,
नक्षत्र : रोहिणी, योग : हर्षण,
सूर्योदय ६.२६, सूर्यास्त ६.४९

## फॉरवर्ड्स

**विरासतों में सिर्फ़ ज़मीन मिल सकतीं हैं...**

**आसमां अपनें हिस्सें क़ा ख़ुद बनाना होग़ा...!**

## भटकंती

फिरायला गेल्यावर गर्दी, गजबजाट नकोसा वाटतो. प्रसिद्ध पर्यटनस्थळांवर लोकांची गर्दी झालेली असते. त्यामुळे एखाद्या अपरिचित, ऑफबीट ठिकाणाचा शोध घेतला जातो. असंच एक थंड हवेचं ठिकाण म्हणजे तोरणमाळ. तोरणमाळ हे नंदुरबार जिल्ह्यातलं सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेलं निसर्गरम्य पर्यटनस्थळ आहे. इथे गोरक्षनाथाचं प्रसिद्ध मंदिर आहे. तोरणमाळच्या आसपास पहाण्यासारखं बरंच काही आहे. इथून दीड किलोमीटर अंतरावर सीता खाई आहे. ही दरी लक्ष वेधून घेते. इथला धबधबा हे पर्यटकांचं मुख्य आकर्षण आहे. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### करिअर फॅशन डिझायनिंगमधलं

वेगळ्या करिअर वाटेचे प्रवासी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी 'फॅशन डिझायनिंग' हा उत्तम पर्याय आहे. या क्षेत्रात येण्यासाठी आवश्यक गोष्ट म्हणजे कल्पकता. फॅशनच्या क्षेत्रात सतत नवनवे प्रयोग होत असतात. यात विविध रंग, फॅब्रिक्सशी खेळावं लागतं. जुन्याचा नव्याशी मेळ साधावा लागतो. यासाठी अचाट कल्पनाशक्तीची गरज असते. म्हणूनच सतत शिकत राहणं, नव्या गोष्टी आत्मसात करणं या गुणांची गरज भासते. संवाद आणि संपर्क कौशल्यही तुम्हाला या क्षेत्रात पुढे नेऊ शकतं. बारावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी फॅशन डिझायनिंगकडे वळू शकतात. गणित, फिजिक्स आणि केमिस्ट्री या विषयांसह बारावीत किमान ५० टक्के गुण असतील तर विद्यार्थी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. फॅशन डिझायनिंगचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था देशात आहेत. काही प्रमुख संस्था प्रवेश परीक्षा आणि मुलाखतींचं आयोजन करतात तर काही संस्थांमध्ये कलाशाखेच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश दिला जातो. 'बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग', 'बीएससी-फॅशन डिझायनिंग', 'बॅचलर ऑफ फॅशन कम्युनिकेशन', 'डिप्लोमा इन फॅशन डिझायनिंग' सारखे अभ्यासक्रम पूर्ण करून या क्षेत्रात करीअर करता येतं.



## खेचाखेची

### माफी !

नमस्कार, मी या विमानाचा पायलट बोलतोय. आपण सध्या ४०,००० फुटांवर असून बाहेरचं तापमान उणे ४० अंश आहे. अरेऽऽऽऽ बापरे............

(थोडा वेळ स्मशान शांतता पसरते. काही वेळाने पायलट परत बोलतो.)

माफ करा आपल्याला भिती वाटली असेल. पण माझ्या पायावर गरम कॉफी सांडली आणि त्याचा चटका बसला. आपण माझी पँट बघू शकता.

आपण बघू शकता, माझी तर माघून खराब झाली आहे, एक प्रवासी ओरडला.

## वेगळं काही

गुजरातमधल्या मोरबी जिल्ह्यातल्या खापर गावातल्या मेरजा कुटुंबाने परिसरातल्या रस्त्याची डागडुजी करून घरातल्या मुलाचा वाढदिवस साजरा केला. त्यांनी मुलाच्या एकोणीसाव्या वाढदिवसानिमित्ताने गावातला १०० मीटर रस्ता दुरुस्त केला. पावसामुळे हा रस्ता खराब झाला होता. जागोजागी खड्डे पडले होते. या मुलाचे वडील परेशभाई मेरजा स्वत: ट्रॅक्टरवर बसले होते. दोन ट्रॅक्टर आणि एका लोडरच्या मदतीने हा रस्ता दुरुस्त करण्यात आला. गावातले इतर लोकही त्यांच्या मदतीला आले. तीन तासांमध्ये हा रस्ता दुरुस्त झाला. सगळे खड्डेही बुजले. रस्ता दुरुस्त केल्याबद्दल मेरजा कुटुंबाचं खूप कौतुक होत आहे. प्रत्येक गोष्टीसाठी प्रशासनाला दोष देण्यात अर्थ नसतो.

## जाणून घ्या

### झटपट करा काम

बरेचदा छोटी छोटी कामं अथवा छोट्या छोट्या अडचणी कामात अडथळा आणतात. त्यावर तोडगा कसा काढायचा हे समजत नाही. मात्र काही टिप्स अनुसरुन ही कामं चुटकीसरशी पार पाडता येतात. यासंबंधी...



* बऱ्याच घरांमध्ये सजावटीसाठी काशाच्या मूर्ती आणल्या जातात. पण कालांतराने त्यांची स्वच्छता करणं जिकिरीचं होऊन बसतं. त्यासाठी सोपा उपाय म्हणजे मऊ कापडाने किंवा स्पंजने काशाच्या मूर्ती पुसून घ्याव्यात. स्पंज मऊ असेल तर कोपरे स्वच्छ करणं सहजशक्य होतं. या वस्तू स्वच्छ करण्यासाठी बाजारात मिळत असलेल्या रसायनांची मदत घेणं शक्यतो टाळा. काशाच्या मूर्ती स्वच्छ करण्यासाठी लिंबाचा वापर करता येईल.

* स्मोकिंगमुळे ओठ काळे पडण्याची समस्या जाणवते. ओठांवरचे हे डाग दूर करायचे तर टूथपेस्टची मदत घेणं शक्य आहे. एक मऊ ब्रश घ्या. त्यावर थोडी पेस्ट घेऊन ओठांवरही रगडा. हा उपाय नियमितपणे केल्यास काळपटपणा दूर होईल. बीटाचा रसदेखील काळ्या पडलेल्या ओठांचा रंग बदलू शकतो.

दैनिक महाभूमि

# बुलढाणा भूमि

शुक्रवार । ४ सप्टेंबर २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

## सोने-चांदी

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १३९३५०
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १५२१३०
चांदी (प्रति किलो) २६५९००

## दखल...

### कृष्णावतार..!

अर्जुनाचा सारथी बनुनी
तु दिलेस अध्यात्माचे धडे
तुझ्या राजनीतीचे आजही
त्रिभूवनी वाजती चौघडे..!

भ्रष्टाचाराने बरबटलेले
प्रजेचे काय करतील भले
देश गहाण टाकण्यासही
हे न पाहती मागे पुढे..!

दिशाहीन राज्यकर्ते
रथ हाकती विनाशाकडे
हे कृष्णा, डोळस दृष्टी देण्या
तू ये सत्वर गडे..!

राजनितीज्ञांचा पितामह तू
वंदन करती जग सारे
पण नेते आमचे स्वार्थापायी
आज 'राजधर्म' विसरले रे..!

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**(९४२१३९४३३९)**

## ऋषिकेशचा सत्कार

**मलकापूर :** यशोधाम परिसरातील ऋषिकेश बोदवडे यांना एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्याबद्दल सम्राट प्रबोधन विचार मंचाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवून ऋषिकेश बोदवडे यांनी नावलौकिक वाढविला आहे.

### राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ पुकारणार एल्गार

# जुन्या पेन्शनसाठी आवळली वज्रमूठ!



बुलढाणा/प्रतिनिधी

जिल्ह्यात जुन्या पेन्शनसाठी शिक्षक व शिक्षकेतर बांधवांनी वज्रमूठ आवळली आहे. हक्काची जुनी पेन्शन घेतल्याशिवाय थांबायचे नाही, असा निर्धार करण्यात आला आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ५ सप्टेंबर रोजी मूकमोर्चा काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ जिल्हा शाखेची बैठक पार पडली. यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. ५ सप्टेंबर शिक्षक दिनी आयोजित मूक मोर्चाबाबत नियोजन करण्यात आले. बैठकीमध्ये जिल्ह्यातील २००५ पूर्वी नियुक्त व तदनंतर शंभर टक्के अनुदानित झालेले सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनींनी आवर्जून उपस्थित राहून जास्तीत जास्त संख्या मोर्चासाठी कशी आणता येईल यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. मूक मोर्चासाठी जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातून सर्वांनी उपस्थित राहावे.

मोर्चाचा नेता कोणीही नसणार आहे. सहभागी सर्वच नेते आणि आपले भाग्यविधाते असणार आहेत. कितीही महत्त्वाचे काम असले तरी ते बाजूला ठेवून सर्वांनी मोर्चात सहभागी होण्याबाबत सांगण्यात आले आहे. शक्य झाल्यास सहकुटुंब उपस्थित रहावे. मूक मोर्चा असल्यामुळे अत्यंत शिस्त आणि शांतता ठेवण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### काळ्या टोप्या ठरणार लक्षवेधी

■ जिजामाता प्रेक्षागारापासून संगम चौक, जयस्तंभ चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे. दुपारी साडेबारा ते एक या वेळेत प्रेक्षागार मैदानावर मोर्चेकरी एकत्र जमणार आहेत. सोबत काळे मास्क, काळी रिबीन, काळे शर्ट, काळी टोपी, एकच मिशन जुनी पेन्शन लिहिलेली टोपी सोबत आणण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. मूकमोर्चातून आपल्या भावना शासनदरबारी मांडण्यात येणार आहेत.

## काळ्या फिती लावून निषेध



बिबी/प्रतिनिधी

जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसाठी वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बिबी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांनी १ सप्टेंबरपासून काळ्या फिती लावून अध्यापनाचे काम करत शासनाचा तीव्र निषेध नोंदवला. महाराष्ट्रात अशा वंचित शिक्षक व कर्मचारी यांची संख्या २६००० च्या आसपास आहे. एवढ्या कमी संख्येमुळे शासनावर कोणताही मोठा आर्थिक बोजा पडत नाही. तरीही शासनाने कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेपासून वंचित ठेवले आहे. या शिक्षकांनी पंतप्रधान, राष्ट्रपती आणि सनदी अधिकारी घडवले. आज त्या शिक्षकावर सेवानिवृत्तीनंतर अन्याय होत आहे. सेवानिवृत्तीनंतर हातात काही शिल्लक राहत नसल्यामुळे अनेक ज्येष्ठ शिक्षकांना वयाच्या उत्तरार्धात कामे करावी लागत आहेत. शेतात मजुरी, रोजंदारीची कामे करावी लागत आहे. जुनी पेन्शन ही केवळ रक्कम नसून म्हातारपणीचा मुख्य आधार आहे. तिच हिरावून घेतल्याने जगायचे कसे? असा मोठा प्रश्न शिक्षकांना पडला आहे. त्वरित जुनी पेन्शन योजना लागू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात उपोषण

मोताळा/प्रतिनिधी




महावितरणच्या मनमानी कारभारामुळे त्रस्त झालेल्या शेतकरी, ग्राहक आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी धर्मवीर युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष पृथ्वीराज संजय गायकवाड यांनी ३ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषणाला सुरुवात केली.

आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांनी आपल्या वीजविषयक समस्या व अडचणी मांडल्या. शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नाची दखल घेत, त्यांच्या मागण्यांसाठी हे आंदोलन ठामपणे पुढे नेण्याचा निर्धार करण्यात आला. उपोषणाची पुढील दिशा, आंदोलनाची भूमिका आणि शेतकरी बांधवांच्या प्रश्नांसाठी करण्यात येणाऱ्या पाठपुराव्याबाबत पृथ्वीराज गायकवाड यांनी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी शिवसेना, युवासेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते. यावेळी अनेक गावातील नवीन डीपी, डीपीवरील लोड कमी करावा, विद्युत पुरवठा सुरळीत करावा, शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी अखंड विद्युत पुरवठा उपलब्ध व्हावा अशा प्रकारच्या मागण्या पृथ्वीराज गायकवाड केल्या. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## अवैध धंद्यांविरोधात मोहिम; २९ लाखांचा मुद्देमाल जप्त

जळगाव जामोद/प्रतिनिधी

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी जानेवारी २०२६ पासून विविध अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाया केल्या आहेत. दारू, जुगार, गांजा, प्रतिबंधित गुटखा तसेच चोरीच्या गुन्ह्यांवर कठोर पावले उचलत पोलिसांनी एकूण २९ लाख रुपयांहून अधिकचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अवैध दारूविक्री व वाहतुक विरोधात सातत्याने कारवाई करत पोलिसांनी १३६ गुन्हे दाखल केले असून, २ लाख ९० हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. जुगार प्रकरणांत ६२ गुन्हे दाखल करून १ लाख ९४ हजार ५१० रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. अंमली पदार्थांविरोधातही पोलिसांनी कारवाई करत एका प्रकरणात २ लाख ५० हजार ५१५ रुपयांचा गांजा जप्त केला. विशेष म्हणजे प्रतिबंधित गुटख्याविरोधातील कारवाईत तब्बल २२ लाख ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. गुन्हे उघडकीस आणण्याच्या बाबतीतही पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी करत चोरीचे सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत. यामध्ये दोन चेन स्नॅचिंग, तीन चोरी आणि एका जबरी चोरीच्या गुन्ह्याचा समावेश आहे. जानेवारीपासून ९३ हरवल्याच्या तक्रारी नोंद झाल्या असून, त्यापैकी ६० व्यक्तींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. उर्वरित ३३ व्यक्तींचा शोध सुरू आहे. अवैध धंद्यांविरोधातील कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## दुचाकी अपघातात दोघा जिवलग मित्रांचा मृत्यू

डोणगाव/प्रतिनिधी

येथील लक्ष्मी नगरमध्ये राहणारे दोन मित्र शाकिब आणि साहिल यांचा २ सप्टेंबरच्या रात्री अपघात झाला. या अपघातामध्ये गंभीर जखमी होऊन दोघांचाही जागेवरच मृत्यू झाला. दोघांचाही अंत्यविधी ३ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजेदरम्यान झाला.

डोणगाव येथून जवळच मुंबई- नागपूर राज्य महामार्गावर २ सप्टेंबरच्या रात्री पावणे आठ वाजेच्या दरम्यान शेख साहिल शेख जफर व शेख शाकिब शेख शकील कुरेशी हे दोघे मित्र दुचाकी टी. एन. ०१ ई. जी. १४७६ ने मेहकरकडे जात होते. यादरम्यान नागपूर समोरील पुलाजवळ ते काही कारणाने थांबले होते. त्याचवेळी मेहकरकडून येणाऱ्या एनएल ०१ एससी ३९८२ क्रमांकाच्या कंटेनरने जोरदार धडक दिली. यामध्ये दोघे मित्र गंभीर जखमी झाले. मेहकरकडून डोणगावला येणाऱ्या अमोल धोटे व त्यांच्या मित्रांनी जखमींना बाहेर काढले. १०८ वर कॉल करून ॲम्बुलन्स बोलावली. तसेच पोलिसांना माहिती दिली. डोणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. कंटेनर चालकाने



स्वतःहून पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावली. शाकीब व साहिल दोन्ही एकाच परिसरात राहणारे व जिवलग मित्र होते. दोघे नाशिक येथे सोबतच शिक्षण व काम सुद्धा करत होते. तीन-चार दिवसापूर्वी ते गावी आले होते. त्यांच्यावर काळाने घाला घातला. दोन्ही मित्रांचा दफनविधी एकाच वेळी ३ सप्टेंबरच्या दुपारी जोहरच्या नमाजनंतर झाला. यावेळी हजारोंच्या संख्येने लोक अंत्ययात्रेमध्ये सहभागी झाले. साहिलच्या दफनविधीसाठी येणाऱ्या त्याच्या आत्याचा पती मेहकर येथील शेख अशपाक वय ३२ यांचा सुद्धा सत्यजित कॉलेजसमोर अपघात झाला आहे. त्यात ते गंभीर जखमी झाले त्यांची प्रकृती सुद्धा चिंताजनक आहे.

## मेहकर रस्ता सुरक्षा व डिव्हायडर समितीची स्थापना

### जनहिताच्या प्रश्नांवर आंदोलनाची दिशा ठरणार

मेहकर/प्रतिनिधी

शहरातील विविध सामाजिक व नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी नव्या चळवळीची सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी 'मेहकर रस्ता सुरक्षा व डिव्हायडर समिती' स्थापन करण्यात आली आहे. समितीला शहरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत मेहकर शहरातील रस्ता सुरक्षा आणि विविध नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लोणार फाटा ते खंडाळा, जानेफळ रोड ते कांचनीचा महाल



तसेच जिजाऊ चौक ते सोनाटी चौफुली या प्रमुख मार्गांवर तातडीने डिव्हायडर उभारण्यात यावेत, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. मेहकर शहरात वाढत असलेले अपघात लक्षात घेता डिव्हायडरची नितांत गरज असून, हा प्रश्न प्राधान्याने मार्गी लागला पाहिजे, अशी भूमिका समितीच्या सदस्यांसह परिसरातील नागरिकांनी मांडली.

डिव्हायडरचा प्रश्न हा समितीचा प्रमुख विषय असून, त्यासाठी लवकरच आंदोलनाची दिशा निश्चित करून ती शहरातील नागरिकांसमोर जाहीर करण्यात येणार आहे. हे आंदोलन कोणत्याही व्यक्ती किंवा पक्षापुरते मर्यादित नसून, नागरिकांच्या सहभागातून उभे राहणारे जनआंदोलन असेल. यावेळी समितीचे सदस्य विजय पवार, गजानन गारोळे, जयचंद बाठीया, मारुतीराव सुरोशे, लक्ष्मण जाधव, पत्रकार दत्ता उमाळे, संतोष मलोसे, उद्धव फंगाळ, सुनील मोरे, डॉ .गजानन बाजड, तोफिक कुरेशी, प्रदीप इलग, आरती दीक्षित, श्याम दीक्षित, डॉ. आशिष अवस्ती, आशिष देशपांडे, विनोद पऱ्हाड, निसार अन्सारी, शेख युनूस पटेल, ॲड. विनोद नरवाडे, राजेश वानखेडे, अशोक तुपकर, विनोद भिसे, विजय घायाळ उपस्थित होते.

## सेस फंड योजना अंतर्गत अर्ज करावा

**मलकापुर :** जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत वितरित करावयाच्या वस्तूच्या लाभासाठी अर्ज करण्याची आवाहन गटविकास अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी पंचायत समिती मलकापुर यांच्याकडून करण्यात आले आहे. जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत ७५ टक्के अनुदानावर पाच एचपी मोटार पंप, ट्रॅक्टरचलित रोटावेटर, ट्रॅक्टरचलित बीबीएफ प्लांटर ट्रॅक्टरचे पेरणी यंत्र साहित्य पुरवणे प्रस्तावित आहे.

## महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात

बुलढाणा/प्रतिनिधी

प्रशासनाच्या इशाऱ्यानंतर ३ सप्टेंबर रोजी मलकापूर- चिखली महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यास नागरिकांकडून स्वयंस्फूर्तीने सुरुवात करण्यात आली.

मलकापूर -चिखली या राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी सर्वोच्च न्यायालय आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अतिक्रमण धारकांना नोटीस देण्यात येत आहे. अतिक्रमणधारकांनी स्वयंस्फूर्तीने आपले अतिक्रमण हटवावे अन्यथा प्रशासनाकडून कारवाई केली जाईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली. अनेक नागरिकांनी स्वतः आपली अतिक्रमणे




हटविण्यास सुरुवात केली. मलकापूर रोडवरील अनेक अतिक्रमणे काढली जात आहेत. महामार्गाच्या मध्यभागापासून चाळीस फूट जागेत असणारे अतिक्रमण काढून घ्यावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

### महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचे यश

# सामंजस्याने मिटला शेतरस्त्याचा जुना वाद

मलकापूर/प्रतिनिधी

महसूल विभागाच्यावतीने १ सप्टेंबरपासून राज्यभर सुरू करण्यात आलेल्या 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाला' मलकापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभियानाच्या पहिल्याच दिवशी शेत रस्त्याचा जुना व संवेदनशील वाद सामंजस्याने निकाली काढण्यात तहसील प्रशासनाला यश आले आहे.

झोडगा येथील गट क्रमांक २५६ मधील शेतजमिनीच्या रस्त्याबाबतचा हा वाद मामलेदार न्यायालय कायदा कलम ५(२) अन्वये मलकापुर तहसील कार्यालयात दाखल होता. या प्रकरणात प्रल्हाद संपत पारधी व दिलीप हरी भारंबे हे अर्जदार, तर किशोर मुकुंद खडसे, अजयसिंग लालसिंग चव्हाण आणि रूख्माबाई आशिराम चव्हाण हे गैरअर्जदार होते.या प्रकरणाची पहिली सुनावणी १ सप्टेंबर रोजी झाली. सुनावणीदरम्यान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी समाधान सोनवणे यांनी शासनाच्या लोक अदालत अभियानाचे महत्त्व स्पष्ट करून दोन्ही पक्षांना सामंजस्याने वादातून मार्ग काढण्याचे आवाहन केले.



> कोर्टाच्या फेऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे वेळ वाया घालविण्यात अर्थ नाही. शासनाच्या लोक अदालत अभियानाचा लाभ घेऊन आपापसात सामंजस्याने वाद मिटविणे किती फायदेशीर ठरते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. पक्षकार व वकिलांनी घेतलेल्या या पुढाकाराचा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आदर्श घ्यावा.
>
> - **समाधान सोनवणे,** तहसीलदार

**वेळ, श्रम, खर्चाची बचत..** न्यायालयीन प्रक्रियेत बराच वेळ जातो. तसेच पैसा सुध्दा खर्च होतो. दोन्ही बाजूंचे नुकसान होते. त्यामुळे सामंजस्याची भूमिका घेणे गरजेचे आहे. महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाच्या निर्णयामुळे न्यायालयाचा अमूल्य वेळ वाचण्यासोबतच पक्षकारांचा वेळ, श्रम आणि खर्चाचीही बचत झाली. पक्षकारांमधील वैमनस्य कायमचे संपुष्टात येण्यास मदत झाली. शासनाच्या अभियानाचा हेतू साध्य झाल्याबद्दल तहसीलदारांनी अर्जदार, गैरअर्जदार तसेच त्यांचे विधीज्ञ ॲड. नीलेश तायडे व ॲड. एस. डी. मराठे यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला.

अर्जदारांचे वकील ॲड. नीलेश एस. तायडे तसेच गैरअर्जदारांचे वकील ॲड. एस. डी. मराठे यांनी सकारात्मक भूमिका घेत दोन्ही पक्षकारांना शेजारधर्म आणि आपापसातील समन्वयाचे महत्त्व पटवून दिले. वकिलांच्या मार्गदर्शनाखाली गैरअर्जदारांनी अर्जदारांच्या मागण्या मान्य करत शेत रस्त्यावरील अडथळा दूर करून रितसर रस्ता खुला करून देण्याचे लेखी मान्य केले. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला व संवेदनशील स्वरूपाचा वाद पहिल्याच सुनावणीत सामोपचाराने मिटला.

## अग्रसेन चौकात मृतदेह आढळला

**खामगाव :** शहरातील अग्रसेन चौकात गुरुवारी सकाळी एका ४३ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. विकास रामदास वाणी रा. गुलमंडी, छत्रपती संभाजीनगर असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

विकास वाणी हे मूर्ती घेण्यासाठी खामगाव येथे आले होते. ३ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ५ वाजता त्यांनी शहरातील लॉजमध्ये राहण्यासाठी खोली घेतली होती. काही वेळाने ते लॉजमधून बाहेर गेले. दरम्यान, सकाळी सुमारे ६ वाजता लॉजमधील कर्मचारी संजय धनसिंग राठोड हे साफसफाईसाठी बाहेर गेले असता अग्रसेन चौकात एक व्यक्ती पडलेली दिसली. जवळ जाऊन पाहिले असता ती व्यक्ती विकास वाणी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन रुग्णवाहिकेने वाणी यांना साामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.









# महिला आरक्षणावरुन संघर्ष !

महिला आरक्षणाच्या नावावर राजकारण चांगलेच तापले आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजप आणि काँग्रेस आपले मुद्दे रेटत आहेत. राहुल गांधी यांच्या नाशिक दौऱ्याविरोधात भाजपच्या नेत्यांनी निदर्शने केली. संसदेत आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांच्या प्रतिनिधित्वाला काँग्रेसचा विरोध असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी या आरोपावर पलटवार करत म्हटले की, सत्ताधारी पक्षाने आधी आरएसएसच्या मुख्यालयात महिलांचा प्रवेश सुनिश्चित करावा. यापूर्वी, नाशिकच्या महापौर हिमागौरी आहेर-अडके, भाजपच्या इतर महिला नेत्या आणि समर्थकांनी राहुलग गांधींच्या दौऱ्याविरोधात मोर्चा काढला. आंदोलनातील अनेक महिलांनी काळ्या साड्या नेसून गांधींविरोधात "मागे जा" अशा घोषणा दिल्या. नाशिकच्या भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी सांगितले की, माझा राहुल गांधींना प्रश्न आहे की, तुमचा पक्ष लोकसभा आणि विधानसभेतील महिलांच्या प्रतिनिधित्वाला का विरोध करतो? राहुल गांधींनी याचे उत्तर द्यावे. संसद आणि विधानसभेत महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे आणि लोकसभेच्या जागांची संख्या वाढवणारे घटनादुरुस्ती विधेयक यावर्षी एप्रिलमध्ये लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही. या विधेयकात लोकसभा आणि राज्य विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद होती. जर देशाला आर्थिकदृष्ट्या मजबूत व्हायचे असेल, तर आपण पाहिले आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण मिळाल्यानंतर महिला मोठ्या प्रमाणावर सक्षम झाल्या आहेत. महिला आपल्या हक्कांबाबत जागरूक झाल्या आहेत. भारताच्या इतिहासात महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी राहुल गांधींवर 'नारी शक्ती वंदन' कायद्याला विरोध केल्याचा आरोप केला. दरम्यान, पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपचे आरोप "पूर्णपणे खोटे" असल्याचे सांगत फेटाळून लावले. २०२३ मध्ये जेव्हा भाजपने संसदेत महिला आरक्षण विधेयक आणले, तेव्हा काँग्रेसने त्याला पाठिंबा दिला नव्हता का? तुम्हाला नवीन विधेयक आणायचे असेल, तर त्याला पाठिंबा देऊ. काँग्रेस आणि राजीव गांधी हे महिला आरक्षण विधेयक आणणाऱ्या पहिल्या काही नेत्यांपैकी होते. 'साऊंड ऑफ स्टुडंट्स' कार्यक्रमामुळे भाजप नाराज झाला आहे. मोहन भागवत (आरएसएस प्रमुख) एक कार्यक्रम घेत आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याच वेळी कार्यकारिणी समितीची बैठक आयोजित केली आहे जेणेकरून राहुल गांधी टीव्हीवर दिसू नयेत! असे हे भाजप आणि काँग्रेसमधील राजकारण आता पेट घेत आहे. महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न हा केवळ आरोप-प्रत्यारोपांचा किंवा निवडणुकीच्या राजकारणाचा विषय राहता कामा नये. महिलांना संसद आणि विधानसभांमध्ये समान संधी देण्याबाबत सर्वच राजकीय पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याची वेळ आली आहे. महिला आरक्षणाच्या विधेयकाला कोणी कधी पाठिंबा दिला, कोणी विरोध केला, यापेक्षा प्रत्यक्षात महिलांना निर्णयप्रक्रियेत किती प्रभावी स्थान मिळणार? हा खरा प्रश्न आहे. भाजप आणि काँग्रेसमधील आरोप-प्रत्यारोप सुरूच राहतील; मात्र या राजकीय कलगीतुऱ्यात महिलांच्या प्रतिनिधित्वाचा मूळ मुद्दा हरवू नये. कारण महिला सक्षमीकरण घोषणांमधून नव्हे, तर सत्तेच्या निर्णयप्रक्रियेत त्यांना समान आणि प्रभावी वाटा मिळाल्यानेच खऱ्या अर्थाने साध्य होईल. महिला आरक्षणावरून सुरू असलेला संघर्ष केवळ राजकीय रणकंदन न ठरता महिलांना न्याय देणारा ठरावा, हीच अपेक्षा!

# आदिवासी आश्रमशाळांचे मरणप्राय वास्तव

**सामाजिक**

**- जनार्दन पाटील**

आश्रमशाळेतील निष्पाप मुलींचा सर्पदंशाने झालेला मृत्यू ही फक्त एक दुर्दैवी घटना नाही, तर प्रशासकीय आणि सामाजिक व्यवस्थेच्या तोंडावर मारलेली जोरदार चपराक आहे. परिस्थिती अशीच राहणार असेल, तर येणारा काळ आपल्याला कधीही माफ करणार नाही. या उपेक्षित बाल्याची अंत्ययात्रा थांबवायची असेल, तर आश्रमशाळांमधील भ्रष्ट, बेदरकार व्यवस्थेवर तातडीने आणि कठोर शस्त्रक्रिया व्हायला हवी.

आदिवासी समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची, निवासाची आणि पोषणाची जबाबदारी पेलणाऱ्या राज्यातील आश्रमशाळा आज ज्ञानाची मंदिरे न राहता मृत्यूचे आणि उपेक्षेचे केंद्र बनल्या आहेत, हे वास्तव पुन्हा एकदा एका अत्यंत वेदनादायी घटनेने समोर आणले आहे. मध्यरात्रीच्या गाढ झोपेत असलेल्या निष्पाप विद्यार्थिनींना सर्पदंश होतो आणि वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा जीव जातो, ही घटना केवळ एक अपघात किंवा नैसर्गिक आपत्ती मानून सोडून देता येण्यासारखी नाही. हा थेट प्रशासकीय निष्काळजीपणा आणि व्यवस्थेचा अमानुषपणा आहे. ज्या वयात या मुलींच्या हातात पुस्तके, स्वप्ने आणि उज्ज्वल भविष्याची उमेद असायला हवी होती, त्या वयात त्यांना सर्पाच्या दंशाने आणि व्यवस्थेच्या थंडपणाने मृत्यूच्या दाढेत ढकलले. या दुर्दैवी बलिदानानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळांची भीषण, जीर्ण आणि दुरवस्था चव्हाट्यावर आली. पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रात आदिवासींच्या जीवाचे मूल्य शून्य मानले जाते का, असा संतापजनक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध राज्य मानले जाते. राज्याच्या बजेटमध्ये आदिवासी विकासासाठी विशेष निधीची तरतूद असते. नियमानुसार राज्याच्या तिजोरीतील तब्बल सात टक्के निधी हा आदिवासी घटकांच्या विकासासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. कागदावर अब्जावधी रुपयांच्या योजना आखल्या जातात. 'शबरी आदिवासी घरकुल योजना', 'भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना', मोफत शैक्षणिक साहित्य आणि आरोग्य तपासणीच्या गप्पा विधिमंडळात आणि सरकारी जाहिरातींमध्ये मोठ्या दिमाखात मारल्या जातात; परंतु प्रत्यक्षात हा सात टक्के निधी जातो कुठे? तिजोरीतून निघालेला हा पैसा आदिवासींच्या पाड्यांपर्यंत आणि आश्रमशाळांच्या दरवाजांपर्यंत पोहोचेपर्यंत नक्की कोणाच्या घशात जातो? सरकारचा या संपूर्ण व्यवस्थेकडे होणारा कानाडोळा आता निव्वळ निष्काळजीपणा राहिला नसून एक गंभीर गुन्हा बनला आहे. आज आश्रमशाळांची परिस्थिती पाहिली तर कोणाच्याही




अंगावर काटा येईल. बहुतांश सरकारी आणि अनुदानित आश्रमशाळांच्या इमारती अत्यंत जीर्ण झाल्या आहेत. छत गळणारे, भिंतींना भेगा पडलेल्या, दरवाजे-अंथरूण नसलेले हे वर्ग आणि वसतिगृहे म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक प्रकारे छळछावण्याच ठरत आहेत. आजूबाजूला घनदाट जंगल, झुडपे आणि सांडपाण्याची डबकी असतात; पण सुरक्षेच्या नावाखाली अनेक शाळांना साधी संरक्षक भिंत किंवा भक्कम दरवाजेही नाहीत. रात्रीच्या वेळी वीज गायब असणे ही तर रोजचीच बाब.

अशा अंधाऱ्या आणि असुरक्षित वातावरणात ही मुले आणि मुली जमिनीवर चटई टाकून किंवा पोत्यांवर झोपतात. अशा वेळी विषारी साप, विंचू किंवा अन्य प्राणी वसतिगृहात शिरणे अतिशय सोपे जाते. प्रशासनाला या गोष्टींची पूर्ण कल्पना असते. दर वर्षी पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटना घडतात; पण तरीही कोणतीही पूर्वकल्पना किंवा सुरक्षेची काळजी घेतली जात नाही. सर्पदंश ही केवळ एक घटना झाली; पण त्याहून भयानक वास्तव म्हणजे आश्रमशाळांमध्ये मूळ धरून बसलेले कुपोषण आणि आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा.

शासकीय कागदपत्रांमध्ये मुलांना रोज अंडी, दूध, भाजी-भाकरी आणि पोषक आहार दिला जात असल्याचे दाखवले जाते; पण प्रत्यक्ष पाहणी केल्यास, अत्यंत सुमार दर्जाचे धान्य, किडलेले अन्न आणि चवहीन जेवण या मुलांना दिले जाते. परिणामी, आश्रमशाळांतील हजारो मुले आज तीव्र कुपोषणाने ग्रस्त आहेत. शारीरिक आणि मानसिक वाढ अपेक्षित असणाऱ्या वयात ही मुले रक्ताल्पता (ॲनिमिया) आणि कुपोषणाशी झुंजत आहेत. वसतिगृहात एखादा विद्यार्थी आजारी पडला, तर प्रथमोपचार पेटीत साधी पॅरासिटामॉलची गोळीही उपलब्ध नसते. प्राथमिक आरोग्य केंद्र मैलोनमैल दूर असतात आणि तेथे वेळेवर रुग्णवाहिका मिळणे म्हणजे एक आश्चर्य मानले जाते. सर्पदंश झाल्यानंतर ज्या पहिल्या 'गोल्डन अवर'मध्ये (सुवर्ण तास) अँटी-व्हेनोम (विषरोधक लस) मिळणे गरजेचे असते, ते न मिळाल्यामुळेच या विद्यार्थिनींचा जीव गेला. जर शाळेत किंवा जवळच्या आरोग्य केंद्रात लस उपलब्ध असती आणि वाहतुकीची सोय असती, तर आज त्या निष्पाप मुली जिवंत असत्या. परवाची घटना घडल्यानंतर नेहमीप्रमाणे सरकारी यंत्रणा जागी झाली.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# तालिबानची पाच वर्षे: महिलांचे संपलेले स्वातंत्र्य

**आंतरराष्ट्रीय**

**- आरीफ शेख**

आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक

तालिबानला सत्ता मिळवता आली; पण महिलांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन आधुनिक राष्ट्र उभे करता येत नाही. बंदुकीच्या बळावर सत्ता टिकवता येते, समाजाचे भविष्य घडवता येत नाही. काबूलच्या रस्त्यांवर महिला निर्भयपणे चालतील, मुलींच्या हातात पुस्तके असतील, तेव्हाच अफगाणिस्तानचे खरे पुनर्निर्माण सुरू होईल. तोपर्यंत तालिबानचे पाच वर्षांचे 'स्थैर्य' प्रत्यक्षात लाखो अफगाण महिलांची कैदच मानावे लागेल.

१५ ऑगस्ट २०२१. अफगाणिस्तानच्या इतिहासातील हा दिवस केवळ सत्तांतराचा दिवस नव्हता, तर तो लाखो अफगाण नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या आणि मुलींच्या स्वातंत्र्यावर पुन्हा पडलेल्या अंधाराचा दिवस होता. अमेरिकन सैन्याच्या माघारीनंतर तालिबानने काबूलवर ताबा मिळवला आणि दोन दशकांनंतर पुन्हा अफगाणिस्तानची सत्ता आपल्या हातात घेतली. आता या सत्तेला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. या पाच वर्षांत तालिबानने देशावर आपली पकड मजबूत केली, सुरक्षा यंत्रणा उभी केली, प्रशासन चालवले आणि अनेक देशांशी राजनैतिक व आर्थिक संबंध वाढवले; मात्र या तथाकथित स्थैर्याच्या बदल्यात अफगाण महिलांना आपल्या स्वातंत्र्याची किंमत मोजावी लागली आहे.

तालिबानच्या पाच वर्षांच्या राजवटीचे मूल्यमापन करताना एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल, ती म्हणजे केवळ एका सरकारची धोरणात्मक चूक नाही, तर एका संपूर्ण समाजातील अर्ध्या लोकसंख्येला



सार्वजनिक जीवनातून जवळजवळ हद्दपार करण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते, तालिबानने सत्तेवर आल्यानंतर महिलांच्या अधिकारांवर शंभरहून अधिक निर्बंधात्मक आदेश लागू केले आहेत.

शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, प्रवास, सार्वजनिक ठिकाणी वावरणे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अशा जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात महिलांचे अधिकार संकुचित करण्यात आले आहेत. सर्वांत भयावह बाब म्हणजे मुलींच्या शिक्षणावर घातलेली बंदी. आज अफगाणिस्तान हा जगातील एकमेव देश आहे, जिथे मुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षणापासून औपचारिकरीत्या दूर ठेवण्यात आले आहे.

'युनेस्को'च्या ताज्या आकडेवारीनुसार, सुमारे २४ लाख अफगाण मुली माध्यमिक शिक्षणापासून वंचित आहेत. २०२१ मध्ये तालिबानने सत्ता हाती घेतली, तेव्हा जवळपास दहा लाख मुली माध्यमिक शाळांमध्ये शिकत होत्या. पाच वर्षांत एका पिढीचे शैक्षणिक भविष्य उद्ध्वस्त करण्याइतका हा मोठा उलटफेर आहे. याचा परिणाम आज दिसत नसला, तरी पुढील दशकात त्याची किंमत अफगाणिस्तानला मोजावी लागणार आहे. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासक, पत्रकार, वकील आणि अन्य व्यावसायिक निर्माण करण्याची प्रक्रिया थांबवून कोणताही देश आधुनिक होऊ शकत नाही. मुलींना शिक्षणापासून दूर ठेवणे म्हणजे केवळ त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आणणे नव्हे, तर देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक क्षमतेवरच कुऱ्हाड चालवणे होय. याची जाणीव आर्थिक आकडेवारीतूनही होते. 'युनिसेफ'च्या २०२६ च्या विश्लेषणानुसार, मुलींच्या शिक्षणावर आणि महिलांच्या रोजगारावर निर्बंध कायम राहिल्यास २०३० पर्यंत अफगाणिस्तानमध्ये सुमारे २० हजार महिला शिक्षक आणि ५,४०० महिला आरोग्य कर्मचारी गमावले जाऊ शकतात. महिलांच्या शिक्षण आणि रोजगारावरील निर्बंधांमुळे देशाला दरवर्षी सुमारे ८४ कोटी डॉलरच्या आर्थिक उत्पादनाचे नुकसान होत असल्याचेही या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे. **(क्रमशः)**

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# शेतकऱ्यांचा पशूपालन व दुग्ध व्यवसाय धोक्यात



**भुमिपूत्र भाग - ९**

- डॉ. करमसिंग आर. राजपूत
प्राचार्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारे संचालित
श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा (रेल्वे),
जिल्हा बुलढाणा मो. क्र. ९९२२५४८०८४



> भारताच्या स्वातंत्र्य काळापासून तर आजपर्यंत भारतीय शेतीचे व शेती प्रश्नांचे स्वरूप कसे बदलत गेले यासंबंधीची मांडणी आपण **'भूमिपुत्र'** या सदरांतर्गत पाहणार आहोत. डॉ. करमसिंग आर.राजपूत यांनी या विषयाची मांडणी तीन टप्प्यांमध्ये केली आहे. ते पुढील प्रमाणे - (१) स्वातंत्र्योत्तर हरितक्रांतीपूर्व काळः १९४७-१९६६, (२) हरितक्रांती ते नवीन आर्थिक धोरणापर्यंतचा काळः १९६६-१९९१ आणि (३) नवीन आर्थिक धोरणानंतरचा काळः १९९१-२०२३. या तीन टप्प्यांमध्ये भारतीय शेती व शेती प्रश्नांचे स्वरूप कसे बदलत गेले हे आपण या सदरांतर्गत पाहूया.

भारतातील वन खात्याने ग्रामीण भागातील शेतीजवळील लहान लहान चराऊ कुरणे नष्ट केल्याने शेतकऱ्यांचा पशूपालन व्यवसाय धोक्यात आला. चराऊ कुरणांच्या अभावी गुराढोरांची, शेळ्या मेंढ्यांची निगा राखणे कठीण झाल्याने शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात आणखीच भर पडली. दूधदुभत्याच्या कमतरतेमुळे शेतकरी वर्गाची विपन्नता अधिक वाढली. वाढत्या औद्योगिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर चराऊ कुरणांचा वापर झाल्याने पशूपालन व दुग्ध व्यवसाय धोक्यात आला व शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेत भर पडली.

**शेतमालाच्या आधारभूत किमती किफायतशीर नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला:** शेतकऱ्यांना आपल्या शेतमालासाठी वाजवी किंमत मिळावी व व्यापाऱ्यांच्या शोषणातून त्यांची सुटका व्हावी यासाठी केंद्र सरकारने १ जानेवारी १९६५ रोजी कृषीमाल किंमत आयोग स्थापन केला. सन १९८५ पासून या आयोगाचे नाव बदलवून कृषी माल खर्च व किंमत आयोग (CACP-Commis-sion for Agricultural Costs & Prices) असे करण्यात आले. या आयोगाच्या शिफारशी विचारात घेऊन केंद्रसरकार दर वर्षी शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती (MSP-Minimum Support Prices) जाहिर करते. CACP कडून शेतमाल उत्पादनाचा खर्च पुढील तीन पद्धतीने काढण्यात येतो.

**अ.** A२ खर्चः यात शेतमालाचे उत्पादन घेण्यासाठी आवश्यक असणारे बियाणे, रासायनिक खते, रासायनिक कीटकनाशके, तणनाशके, मजुरी, सिंचन, इंधन इत्यादी खर्चाचा समावेश होतो.

**ब.** A२+FL खर्चः यात A२ मधील सर्व खर्च तसेच शेतकरी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी आपल्या शेतीत केलेल्या कामाच्या मजुरी खर्चाचा (FL-Family Labour) समावेश होतो.

**क.** C२ खर्चः यात A२+FL मधील सर्व खर्च तसेच जमिनीचे भाडे (खंड) व शेतकऱ्यांनी आपल्या शेतात जो भांडवली खर्च केला असेल त्यावरील व्याजाचा समावेश होतो.

सन २००४ मध्ये केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना केली. डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी अध्यक्ष या नात्याने २००६ मध्ये सादर केलेल्या आपल्या राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या अंतिम अहवालात शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी C२+५० टक्के नफा एवढ्या किमान हमीभावाची शिफारस केली आहे. परंतु शासन मात्र त्यानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी किमान हमीभाव देत नसल्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत.

**शेती व्यवसायात राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय महाकाय कंपन्यांचा शिरकाव झाल्याने शेतकरी संकटात सापडला:** जागतिकीकरणानंतर शेती व्यवसायात राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांचा मोठ्याप्रमाणावर शिरकाव झालेला आहे. करार शेतीच्या माध्यमातून शेतमालाच्या लागवडीत तर या कंपन्यांचा शिरकाव झालाच परंतु शेतमाल प्रक्रियाउद्योगांतही या महाकाय कंपन्यांनी शिरकाव केल्याचे दिसून येते. भारतातच नव्हे तर जगात सुद्धा करार शेतीचा अनुभव फार चांगला नाही. ब्रिटिश काळाप्रमाणेच सध्या शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योग महाकाय कंपन्यांच्या ताब्यात गेल्याने हा एक नववसाहतवादच आहे. या नववसाहतवादात शेतकरी मात्र होरपळून निघत आहे.

**तरुण पिढीमध्ये शेती करण्यासंबंधी उदासीनता:** भारतात जागतिकीकरणानंतर मोठ्या प्रमाणावर भौतिकवादाला प्रोत्साहन मिळाले आहे. भारतातील सुमारे ६० टक्के शेती निसर्गाच्या पावसावर अवलंबून असून अलीकडील काळात निसर्ग बेभरवशाचा झाल्याने शेतीतून खात्रीशीर उत्पादन व उत्पन्न मिळत नाही. दुसरे म्हणजे एखाद्या वर्षी उत्पादन चांगले झाले तरी बाजारात शेतमालाला किफायतशीर भाव मिळत नसल्यामुळे तरुण पिढी शेती व्यवसायात येऊ इच्छित नाही. जागतिकीकरणानाच्या काळात कमी श्रमात झटपट पैसा कमविण्याचा विचार सातत्याने तरुण पिढीवर बिंबविल्या जात असल्यामुळे तरुणांमध्ये शेती व्यवसाय करण्यासंबंधी उदासीनता, निर्माण झाली आहे. परिणामी शेती व्यवसाय संकटात सापडला आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# आपुलिया बळे नाही मी बोलत



**॥ मना पाहिजे अंकुश ॥**

डॉ. विकास बाहेकर
बुलढाणा
मो.नं ९४२२१८१३२५

गाथेतील 'प्रेरणा'चे स्वरूप -आंतरिक शक्तीचे ज्या ज्या कारणामुळे सबलीकरण होते आणि एक नवीन उर्मी घेऊन ती शक्ती त्या व्यक्तीला अधिक कार्यप्रवण करते, तिला प्रेरणा म्हणतात. प्रेरणांची अनेक रूपे आहेत. तुकारामांच्या जीवनामधील घटना क्रमांचा अभ्यास प्रेरणांच्या दृष्टिकोनातून केला पाहिजे. त्यांच्या जीवनात एका घटनेच्या दुःखातून सावरून लगेच दुसरे दुःख झेलणे, इतकाही वेळ मिळाला नाही. अशा दुःखाच्या लाटांवर लाटा आल्यात, त्यातून उठून अवघ्या 42 वर्षांच्या वयात ते आभाळाएवढे झालेत. अभंग गाथेची रचना करून जगद्गुरू झालेत. यामागील प्रेरणाची तपासणी केली असता त्यांची प्रेरणा स्वयंमेव पांडुरंगच होता. याची त्यांनी वारंवार पुष्टी सुद्धा केली आहे. आता या प्रेरणास्रोतांचे अभंगांतून व्यक्त झालेले स्वरूप पाहू या.

**विश्वास तो देव।**
**म्हणूनि धरियेला भाव।।**
**माझी वदवितो वाणी।**
**ज्याने धरिली धरणी।।**
**जोडिली अक्षरे।**
**नव्हती बुद्धीची उत्तरे ।।**
**नाही केली आटी।**
**काही मानदंभासाठी।।**
**कोणी भाग्यवंत।**
**तया कळेल उचित ।।**
**तुका म्हणे झरा।**
**आहे मुळीचा चि खरा।।**

"त्या सर्वसाक्षी सर्वशक्तिमान ईश्वरावर माझा संपूर्ण विश्वास आहे. म्हणूनच त्याच्या पायी सर्व भावभावना अर्पण केलेल्या आहेत. ह्या पृथ्वीला धारण करणारा तोच माझ्याही वाणीतून प्रकटतो आहे. म्हणून माझे शब्द माझे नव्हते तर त्याचीच कृपा आहे... अभंगरचनेचा प्रपंच काही पद प्रतिष्ठा मिळवण्यासाठी नव्हे. मात्र मी हे जे सांगतो




त्याची सत्यता आणि योग्यता एखाद्या भाग्यवंतालाच समजेल. कारण माझा अंतरंगात असलेल्या भक्तिभावाचा झरा मुळचाच आहे. भक्ती हाच माझा पिंड आहे व त्यातून प्राप्त झालेल्या कृपेनेच माझे हे अभंग निर्माण झालेले आहेत."

या पांडुरंगाच्या पायांशी भक्तिभाव अर्पण करण्यासाठी भजने, कीर्तन, नर्तन आणि आषाढी-कार्तिकीची पायी वारी हीच बहुजनांची मिरासी आहे. सामान्य माणसाच्या सुखदुःखाने रंगलेल्या जीवनपटाची खरी प्रेरणा या भक्तिप्रवाहातून वाहाते. तिचे वर्णन करताना तुकारामांची वाणी त्याच भगवंतांच्या प्रासादिक प्रज्ञेने सिद्ध होऊन अभंगरूप होते आणि म्हणते की-

"माणसाची अभिव्यक्ती त्याच्यामधील सत्व, रज अथवा तम गुणाच्या प्राबल्यावर आधारलेली असते. पैकी मी सत्त्वगुणी झाल्यामुळे भगवंताच्या नामस्मरणातच मला नाचावेसे वाटते, यादृष्टीने माझ्या वृत्तीचा एवढा ताबा घेतला आहे की, माझ्या सर्व इंद्रियांवर त्याचीच सत्ता असून मी कळसूत्री बाहुलीसारखा त्याच्या अधीन झालो आहे. खरे तर रंगांत मी रंगलेलो असणे स्वाभाविक आहे. इतके त्या पांडुरंगाने मला त्यांच्या अंगासी कवटाळून एकरूप केले आहे. या एकरूपतेची एक नशाच माझ्या आचरणाला लागली आहे. या नशेमुळे माझी लाजलज्जा, सामाजिक संकेत सर्व लयास गेली आहे. इतका तुझ्या प्रेमरंगात मी दंग झालो आहे.

आता माझी ताल, गायन, नर्तन यामध्ये थोडी प्रगती झाली आहे, असे वाटते. कारण नामस्मरणामध्ये तल्लीन होऊन माझा देहभाव जेव्हा हरपतो तेव्हा माझ्या वृत्ती-प्रवृत्ती आणि गतीमध्ये एकतानता येते व त्यामुळे मी माझ्याच शब्दाच्या गंगेतून अवतरलेल्या अभंगावर कीर्तनाच्यारंगात न्हाऊन निघतो. कारण या कीर्तनाने मला शूचिर्भूत केले आहे."

हरिकीर्तनाने सर्व दोष आणि विघ्ने नष्ट होतात. इतके हे बलवान आहे. हाती "वीणा, टाळ घेऊन मृदंगासोबतीने दिंडीसमोर नाचून, गाऊन, कीर्तनातून आनंदोत्सव साजरा करू या. कळी हा प्रत्यक्ष पापाची मूर्ती असला तरी नामरूपी तलवारीने त्याला नेस्तनाबूत करू या. या नाम सामर्थ्याने वैकुंठाप्रतीसुद्धा जाऊ या. वैकुंठ आणि वैकंठनाथ याला प्राप्त करण्यासाठी नामसंकीर्तन ही सोपी पायवाट आहे. हे नगारे पिटून, दवंडीपिटून लोकांना सांगू या."

भजन-गायन, नर्तन-कीर्तन यासर्वांची परिपूर्णता त्या भगवंताच्या पायाशी जाणाऱ्या दिंडीमध्ये आहे. प्रत्यक्ष डोळा त्या भगवंताचे दर्शन हे परब्रह्मीचे सुख या भूतलावर आहे. त्यामुळे आम्हाला त्या पंढरीरायाचे दास असण्याचा, भक्त असण्याचा सार्थ अभिमानच आहे. या भावनात्मक प्रेरणांना तुकाराम शब्दरूप देतात. नामस्मरण, भजन, कीर्तन, पंढरीची वारी, एकादशी या जीवनसूत्राला तुकारामांनी प्रेरणेच्या स्वरूपातच अभंगरूप दिलेले आहे. बरे या विठ्ठलानेच तर नामदेवासोबत येऊन ही काव्यप्रेरणा दिली. मला आदेशच दिला. याचा साक्षीदारही संत नामदेव आहे. याची नोंद करणारा अभंग म्हणतो की-

**नामदेवे केले स्वप्नमाजी जागे।**
**सवे पांडुरंगे येऊनिया।।**
**सांगितले काम करावे कवित्व।**
**वाऊगे निमित्य बोलो नको।।**
**माप टाकी सळ धरिली विठ्ठले ।**
**थापटोनि केले सावधान।।**
**प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी।**
**उरले शेवटी लावी तुका ।।**

तुकारामांनी यात माझे काहीही नाही, ही सर्व त्याच भगवंताच्या असीम कृपेची निर्मिती आहे, असे प्रांजळपणे या **अभंगातून कबूल केले.**

**आपुलिया बळे नाही मी बोलत।**
**सखा भगवंत वाचा त्याची ।।**
**साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी।**
**शिकविता धनी वेगळाची ।।**
**काय म्या पामरे बोलावी उत्तरे।**
**परि त्या विश्वंभरे बोलविले ।।**
**'तुका म्हणे' त्याची कोण जाणे कळा।**
**चालवी पांगळा पायावीण।।**

तुकाराम महाराज म्हणतात की, लोकहो मी माझ्या शक्तीने, बुद्धीने बोलत नसून त्या कृपाळू सखा पांडुरंगाची वाणी असून तीच मला बोलते करीत आहे. तशी साळुंकी गोड वाणीने बोलते. परंतु तिला शिकविणारा मालक वेगळाच असतो. त्याचप्रमाणे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीने उपदेशाचे शब्द काय बोलावे ? परंतु तो विश्वंभर हरी मला तसे बोलते करतो आहे. त्या हरिच्या कृपादृष्टीची कोणी काय कल्पना करू शकेल? तो त्याच्या या कलेने पायावाचून पांगळ्याला सुद्धा चालवू शकतो. म्हणून त्याला पूर्णपणे मी शरण गेलो आहे. म्हणजे त्याची यथार्थ शक्ती वेळोवेळी मला मदतीस प्रेरणा म्हणून येते. हा आशय व्यक्त करणारा अभंग त्यांच्या प्रेरणाशक्तीचा आविष्कार आहे.

"खरा भक्त संसारात राहून सर्व प्रकारचे संसार सोहळे भोगून ईश्वराप्रतीच्या निःस्वार्थ भक्तीमुळे आसक्तीपासून अलिप्तच असतो. हे बळ त्यास साक्षात विठोबापासून प्राप्त होते. हे खात्रीने ठाऊक असल्यामुळे त्याला कुणाचेही भय, कसलीही चिंता किंवा कुणाचाही धाक वाटत नाही. इतके ते निर्भय झालेले असतात. भक्तीच्या आवरणामुळे निर्माण झालेल्या शक्तीमुळे तसेच श्रीरंगाच्या खंबीर रक्षक कड्यामुळे पापपुण्य त्याच्यापुढे कोठेही टिकाव धरू शकत नाही. त्याच्या अंगासही लागत नाही. घर, गृहस्थी, पुत्र, दारा, हे सर्व अशा भक्तांना आवडते. पण त्याचा भार देवच वाहतो.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-dainikmahabhoomi@gmail.com. कार्यालय मोबा. 8960040018/19 (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

दैनिक महाभूमि

शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

# छत्रपती संभाजीनगर भूमि


न्यूज ब्रीफ

### घाणेगावातून चार बकऱ्या लंपास

**वाळूज महानगर :** घाणेगावच्या जिल्हा परिषद शाळेच्या मागील बाजूस राहणाऱ्या आम्रपाली बनसोडे यांच्या १४ बकऱ्यांपैकी चार बकऱ्या चोरीला गेल्या आहेत, ज्यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे. बनसोडे यांच्या घरामागे मंगळवारी रात्री १४ बकऱ्या बांधलेल्या होत्या. चोरट्यांनी संधी साधून त्यापैकी चार बकऱ्या लंपास केल्याचा प्रकार घडला. सकाळी बकऱ्या मोजताना चार बकऱ्या गायब असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर परिसरात शोध घेऊनही बकऱ्यांचा ठावठिकाणा लागला नाही. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बकऱ्या चोरी करणाऱ्या चोरट्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### तरुणीचा पाठलाग; गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** प्रेमसंबंध तोडल्यानंतर तरुणीचा पाठलाग करून तिच्यावर पुन्हा संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकल्याप्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी २ सप्टेंबर रोजी पीडित तरुणीने तक्रार दिली. आरोपी महेंद्र राजेंद्र झिने, रा. गिरोली बु., ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा आणि तक्रारदार तरुणी एकाच गावातील असून त्यांची ओळख होती. एप्रिल २०२६ पासून दोघांमध्ये प्रेमसंबंध होते.

### केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात

**गंगापूर :** तालुक्यातील ढोरेगाव जि.प. शाळेत मंगळवार, १ सप्टेंबर रोजी केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत निपुण महाराष्ट्र अभियान आणि अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर सखोल विचारमंथन करण्यात आले. जि.प. सदस्य कृष्णा डोणगावकर, रावसाहेब टेके व गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. केंद्रप्रमुख डमाळे यांच्या अध्यक्षस्थानी होते. सूत्रसंचालन नीलिमा कुलकर्णी यांनी, तर मनोज घुले यांनी आभार मानले.

जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे निर्देश: मतदार याद्यांचे विशेष पुनर्रिक्षण

# मतदारांच्या हक्काचे संरक्षण करा; सुनावणीची संधी द्या



**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात प्रारुप मतदार याद्यांच्या प्रसिद्धी पश्चात आता जुळवणी न झालेले, विसंगती वा तफावत असणाऱ्या मतदार तपशिलाबाबत संबंधित प्रत्येक मतदाराला सुनावणीची संधी द्या. त्यांच्या मतदान हक्काचे संरक्षण करा. कोणताही पात्र मतदार वगळला जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत.

मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पुढच्या म्हणजेच सुनावणीच्या टप्प्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडले. यावेळी अपर आयुक्त मनपा रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी रुपेश सिनगारे, नम्रता चाटे, डॉ. निलेश अपार, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, नीलम बाफना, डॉ. व्यंकट राठोड, अरुण जऱ्हाड यांच्यासह सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी आदी उपस्थित होते. डॉ. निलेश अपार यांनी साधन व्यक्ती म्हणून प्रशिक्षण दिले. त्यात प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी नंतर राबवावयाच्या सुनावणी प्रक्रियेसंदर्भात प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमानुसार, मतदार यादी तयार करण्यासाठी १ ऑक्टोबर रोजी या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करता येईल. तसेच मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावाबाबत अथवा नोंदीतील तपशीलाबाबत आक्षेप असल्यास ३० सप्टेंबर पर्यंत विहित नमुन्यात दावा अथवा हरकत दाखल करता येईल असे यावेळी सांगण्यात आले.

**प्रारूप मतदार यादीतील नोंदणीची पडताळणी करा**

प्रारूप मतदार यादी प्रत्येक पात्र नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यामुळे नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव आणि अन्य तपशील तपासावेत. पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास विहित कालावधीत दावा दाखल करावा. तसेच आक्षेपार्ह अथवा अपात्र नोंद आढळल्यास त्याबाबत हरकत नोंदवावी असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. तसेच प्रारूप मतदार यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे पाहता येईल. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टल वरही मतदार यादीची पडताळणी करता येईल असे त्यांनी सांगितले.

## मराठा समाजाच्या आवाहनाला प्रतिसाद : करमाड बंद



**करमाड / प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी करमाड बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला व्यापारी, व्यावसायिकांसह नागरिकांनी प्रतिसाद दिल्याने शहरातील बाजारपेठ कडकडीत बंद राहिली.

गुरुवारी सकाळपासून शहरातील प्रमुख बाजारपेठेसह विविध भागांतील दुकाने, हॉटेल्स व व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट होता. अत्यावश्यक सेवा मात्र सुरू होत्या. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, तसेच जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली. आरक्षणाचा प्रश्न मार्गी न लागल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला. बंदच्या पार्श्वभूमीवर करमाड शहरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिवसभर शहरातील परिस्थिती शांततापूर्ण राहिली. करमाड बंदच्या काळात छत्रपती संभाजीनगर ते जालना महामार्गावरील बससेवा सुरळीतपणे सुरु होती.

## घरकुल, सिंचन विहीर योजनांच्या कामांना गती द्या : सभापती बनकर

**सिल्लोड / प्रतिनिधी**

तालुक्यातील घरकुल व सिंचन विहीर योजनांच्या कामांना गती देण्याचे निर्देश पंचायत समितीच्या सभापती अनिता सुरेश बनकर यांनी दिले आहेत. सभापती अनिता बनकर यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात ग्रामविकास अधिकारी व रोजगार सेवकांची आढावा बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये सिल्लोड तालुक्यातील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या घरकुल व सिंचन विहीर योजनांच्या कामांची सद्यस्थिती, मंजूर कामे, प्रलंबित कामे, पात्र लाभार्थी तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी याबाबत माहिती घेण्यात आली. प्रत्येक गावातील योजनांची प्रगती तपासून ज्या ठिकाणी कामे संथ गतीने सुरू आहेत, त्या कामांना तातडीने गती देण्याच्या सूचना करण्यात आल्या. विशेषतः नवीन घरकुल व सिंचन विहीर योजनांमध्ये जी राम जी योजना अंतर्गत लाभ घेऊ इच्छुक लाभार्थ्यांनी सूचविलेल्या कामांचे जिओ-टॅगिंग व मॅपिंगची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश सभापती अनिता बनकर यांनी संबंधित ग्रामविकास अधिकारी व रोजगार सेवकांना दिले.

योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची कोणत्याही कारणास्तव कामे प्रलंबित राहू नयेत, यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रशासकीय प्रक्रिया व तांत्रिक बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच मंजूर झालेल्या कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी वेळेत होऊन लाभार्थ्यांना त्याचा प्रत्यक्ष फायदा मिळणे आवश्यक असल्याचे सभापतींनी स्पष्ट केले. यावेळी उपसभापती भगवान आहेर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्यासह ग्रामविकास अधिकारी, रोजगार सेवक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जरांगे यांचे उपोषण सोडवण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा समाजाच्या विविध मागण्यांकरिता आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे. मराठा समाजाच्या मागण्या तातडीने सोडवून हे उपोषण लवकरात लवकर सोडवावे, अशी मागणी मराठा मावळा संघटनेच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे बुधवार, २ सप्टेंबर रोजी केली. संघटनेचे अध्यक्ष प्रा. माणिकराव शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने बुधवारी शहरात विखे पाटील यांची भेट घेतली. शिष्टमंडळात भरत कदम, संदीप काळे-पाटील, अशोक वडकर आदी सहभागी होते.

## रेल्वे स्टेशन परिसरात सिटी बसला आग
### २० ते २५ प्रवाशांची सुखरूप सुटका

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



रेल्वे स्टेशन परिसरातील स्मार्ट सिटी बस स्टँडवर उभ्या असलेल्या सिटी बसला गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी सकाळी अचानक आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पदमपुरा अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. या घटनेत बसमधील सुमारे २० ते २५ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

रेल्वेस्टेशन परिसरातील स्मार्ट सिटी बस स्टँडवर सिटी बस क्रमांक (एमएच-२०-ईएल-१९१४) सकाळी आठ वाजेच्या सुमारस उभी होती. त्यावेळी बसच्या बोनेटमध्ये स्पार्कींग होऊन बसला आग लागली. सिटी बसला आग लागल्याची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक एन. खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन केंद्र अधिकारी विजय राठोड, उप अग्निशमन केंद्र अधिकारी संजय कुलकर्णी, हरिभाऊ घुगे, ड्युटी अधिकारी सुरज राठोड, अग्निशामक जवान अक्षय नागरे, विनोद बमने, मोहम्मद मुजफ्फर व गोपीचंद मोरे, किशोर कोळी यांनी घटनास्थळी धाव घेत अवघ्या १० ते १५ मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवत बसमधील २० ते २५ प्रवाशांना सुखरुपरित्या बाहेर काढले. सिटी बसला लाग लागल्यामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. या घटनेची नोंद वेदांतनगर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अजिंठा-अंधारी मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ३ कोटी ५४ लाखांची प्रशासकीय मान्यता
### आमदार अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश

**सोयगाव / प्रतिनिधी**



अजिंठा-अंधारी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याच्या दृष्टीने मुख्य कालव्याच्या विशेष दुरुस्तीच्या कामास ३ कोटी ५४ लाख ६१ हजार ६५० रुपयांची प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. या निर्णयामुळे कालव्याची वहन क्षमता वाढण्यासह सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होण्यास मोठी मदत होणार आहे.

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्प हा वाघूर नदीवर अजिंठा गावाच्या दक्षिणेस बुलढाणा रोडवर सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असून सन १९८४ मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाची पूर्ण जलाशय पातळी ८.४३ दलघमी असून पूर्ण जलाशय पातळीचा निव्वळ साठा १.६५ दलघमी, तर मृत साठा ०.८८ दलघमी इतका आहे. प्रकल्पाच्या सांडव्याची लांबी ३०० मीटर असून सांडव्याचा संबंधित विसर्ग ७८१.१७ घ.मी सेकंद इतका आहे. प्रकल्पांतर्गत ५.२ किलोमीटर लांबीचा उजवा कालवा असून त्याची विसर्ग क्षमता १.७२ घ.मी सेकंद इतकी आहे. कालव्याची सर्व बांधकामे सन १९८४ पूर्वीच पूर्ण करण्यात आली आहेत.

मात्र, मुख्य कालव्याची अनेक वर्षांपासून दुरुस्ती झालेली नसल्याने कालव्याची वहन क्षमता कमी झाली होती. त्यामुळे कालव्याचे अस्तरीकरण करणे, भराव दुरुस्ती करणे, कालव्यावरील विमोचक दुरुस्ती करणे, तसेच कालव्यावरील नाला क्रॉसिंग व रोड क्रॉसिंगची दुरुस्ती करणे आदी कामे प्रस्तावित करण्यात आली होती. आमदार अब्दुल सत्तार यांनी या महत्त्वपूर्ण कामासाठी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केल्याने अखेर हा निर्णय घेण्यात आला असून, या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक प्रभावीपणे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## एक हजार रुपयांची लाच घेणारा पोलिस अंमलदार गजाआड

**पैठण / प्रतिनिधी**



बिडकीन पोलिस ठाण्याच्या हद्दीत खडी व विटांचे टिप्पर सुरळीत सुरू ठेवण्यासाठी वाहनमालकाकडे दरमहा एक हजार रुपयांच्या हप्त्याची मागणी करून, प्रत्यक्षात लाचेची रक्कम स्वीकारताना एका पोलिस हवालदारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने बुधवार, २ सप्टेंबर रोजी दुपारी रंगेहात पकडले. भारत लालचंद चव्हाण (नेमणूक बिडकीन पोलिस ठाणे) असे लाचखोर पोलिस अंमलदाराचे नाव आहे.

तक्रारदाराच्या मालकीच्या टिप्परमधून खडी व विटांची वाहतूक केली जाते. दरम्यान, वाहन थांबवून चव्हाण यांनी हप्त्याची मागणी केली होती. तक्रारदाराच्या एका टिप्परला सूट देऊन उर्वरित एका गाडीसाठी १ हजार रुपयांचा मासिक हप्ता ठरविण्यात आला होता. याबाबत मिळालेल्या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने पैठण-बिडकीन रोडवरील मुधलवाडी परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे हप्त्याची रक्कम स्वीकारताना पोलिस हवालदार भारत चव्हाण यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही पोलिस अधीक्षक माधुरी केदार कांगणे व अपर पोलिस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली.

### दौलताबादमधील चायनीज सेंटर सील

**छत्रपती संभाजीनगर :** दौलताबाद बसस्थानक परिसरातील बॉम्बे चायनीज सेंटर या खाद्यपदार्थ विक्री केंद्रावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने बुधवार, २ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास धडक कारवाई करत हे केंद्र सील केले. परवान्याचे नूतनीकरण न करता विनापरवाना व्यवसाय सुरू ठेवणे आणि परिसरात गंभीर स्वरूपाच्या स्वच्छतेच्या त्रुटी आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर हॉटेल्स व खाद्यपदार्थांची दुकाने आहेत. प्रशासनाची कारवाई सुरू असल्याचे समजताच परिसरातील इतर हॉटेल व पानटपरी चालकांनी खबरदारीचा उपाय म्हणून दुकाने तातडीने बंद केली होती.

## प्रतिबंधित ३० लाखांचा गुटखा जप्त; चालक जेरबंद

**वडोद बाजार / प्रतिनिधी**



समृद्धी महामार्गाच्या सावंगी मुंबई एन्ट्री पॉईंटवर महामार्ग पोलिसांनी केलेल्या कारवाईत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तब्बल ३० लाख ७० हजार रुपयांचा गुटखा व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी टाटा टेम्पो चालकाला अटक करण्यात आली असून, रात्री उशिरा फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावंगी प्रवेशद्वारावर महामार्ग पोलिसांनी वाहनांची तपासणी सुरू असताना (एमएच ०४ एनबी ४९४३) क्रमांकाचा संशयित टेम्पो अडवला. वाहनाची झडती घेतली असता त्यात गुटखा, सुगंधित सुपारी, पानमसाला आणि जर्दा असा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी राजू दिनेश चौहान (रा. खंडवा, मध्य प्रदेश) या चालकाला ताब्यात घेतले. जप्त केलेल्या ३० लाख ७० हजार रुपयांच्या प्रतिबंधित गुटख्यासह १५ लाख रुपयांचा टेम्पो असा एकूण ४५ लाख ७० हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलिस अधिकारी नागरे, सहाय्यक निरीक्षक नवघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गजानन लहासे, सहाय्यक निरीक्षक सुग्रीव चाटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## २०० टन ओल्या कचऱ्यापासून होणार गॅस निर्मिती; प्रकल्पासाठी जागेचा शोध सुरू

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

शहरातील दररोज निघणाऱ्या सुमारे २०० टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यातून कॉम्प्रेस बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारण्याची तयारी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने (बीपीसीएल) दर्शविली आहे. यासाठी महापालिकेसोबत कंपनीचे अधिकारी बैठका घेत असल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिली.

शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेला मोठा खर्च करावा लागतो. काही वर्षांपूर्वी शासन निधीतून महापालिकेने चिकलठाणा, हसूल, पडेगाव येथे ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प सुरू केले केले आहेत. या तीन प्रकल्पांची क्षमता प्रत्येकी १५० टन एवढी आहे. दररोज ४५० टन कचऱ्यावर याठिकाणी प्रक्रिया होऊ शकते. हॉटेल्समधून निघणाऱ्या सुमारे ३५ टन कचऱ्यावर कांचनवाडी येथे प्रक्रिया केली जाते. कचरा संकलनाचे काम गुजरातच्या कंपनीला दिल्यापासून कचरा संकलनात दररोज १०० टनाने वाढ झाली आहे.

भांबर्डा येथे बेबाकी प्रमाणपत्रांसह कर्ज मंजुरी पत्रांचे वाटप

# कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यांना नव्या पीक कर्जाचा आधार

**करमाड / प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या करमाड शाखेच्या कार्यक्षेत्रातील भांबर्डा येथे पात्र शेतकऱ्यांना बेबाकी प्रमाणपत्रांसह नवीन पीक कर्ज मंजुरी पत्रांचे वाटप बुधवार, २ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

बुधवारी भांबर्डा येथे झालेल्या कार्यक्रमात शेतकऱ्यांना आगामी हंगामासाठी नव्याने आर्थिक आधार देण्यात आला. फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार अनुराधा चव्हाण, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे जनरल मॅनेजर श्रीराम भोर, छत्रपती संभाजीनगर क्षेत्रीय व्यवस्थापक मनोहर वाडकर यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांना प्रमाणपत्रे व मंजुरी पत्रे देण्यात आली. कर्जमुक्तीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा पीक कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांना शेतीसाठी भांडवलाची अडचण भासू नये, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.



यावेळी बाजार समितीचे सभापती श्रीराम शेळके, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामराव शेळके, देवगिरी बँकेचे संचालक सजनराव मते, बाजार समितीचे संचालक दत्ताभाऊ उकर्डे, सुदाम ठोंबरे, डॉ. जिजा कोरडे, माजी पंचायत समिती सभापती विठ्ठल सादरे, खरेदी-विक्री संघाचे संचालक भावराव मुळे, राजेंद्र काळे, बळीराम काळे, सरपंच इंदूबाई पठाडे, महाराज रावसाहेब फूकटे, संतराम फूकटे यांच्यासह बँकेचे अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणार चालना**

कर्जमुक्तीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा पीक कर्ज मिळाल्याने आगामी हंगामातील शेतीच्या खर्चासाठी मोठा आधार मिळणार आहे. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्याच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

## न्यूज ब्रीफ

### गोवंश मांससह सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी :** सेलू-देवगावफाटा मार्गावरील एका पेट्रोलपंपासमोर ३१ ऑगस्ट रोजी पोलिसांनी ऑटोवर छापा टाकून तब्बल १ क्विंटल २० किलो संशयित गोवंश मांस असा वाहनासह २ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयास्पद रिक्षाची पोलिस निरीक्षक नागरे, उपनिरीक्षक बलभीम राऊत, हवालदार जानगर यांच्या पथकाने तपासणी केली. दरम्यान ऑटोमध्ये तीन गोण्यांमध्ये गोवंश मांस आढळले. पोलिसांनी १ क्विंटल २० किलो मांस व २ लाखांचा ऑटो असा एकूण २ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. ऑटोचालक मुस्ताक अब्दुल्ला कुरेशी, रा. शिवाजीनगर, सेलू याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वेरूळ ते शिवतलाव कावड यात्रेचे आयोजन

**पाचपीरवाडी :** सालाबाद प्रमाणे चंदा राजपुत यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, ७ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजता वेरूळ ते गंजेश्वर महादेव मंदीर शिवतलाव कावड यात्रा काढण्यात येणार आहे. या कावड यात्रेत खुलताबाद तालुक्यासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून शिवभक्त पवित्र जलकलश घेऊन सहभागी होणार आहेत. कावड यात्रेत जास्तीत जास्त शिवभक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन चंदा राजपुत यांनी केले आहे.

## निधनवार्ता

### चंद्रभागाबाई साळवे



**जाफ्राबाद :** चंद्रभागाबाई दौलत साळवे (९० वर्ष), रा. रास्तळ, ता. जाफ्राबाद यांचे वृध्दापकाळाने बुधवार, २ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रास्तळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे.

## भटके विमुक्त दिनानिमित्त विद्यापीठात व्याख्यान

# भटके विमुक्तांसाठी गोपीनाथ मुंडे यांचे योगदान : पद्मश्री भिकू इदाते

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



भटके विमुक्त समाज ही एकेकाळी देशातील राज्यकर्ती जमात होती. मात्र कालौघात समाज मागे पडला. या समाजाच्या प्रगतीसाठी व मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी मोठे योगदान दिले, असे प्रतिपादन राष्ट्रीय भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री भिकू रामजी इदाते यांनी मंगळवार, १ सप्टेंबर रोजी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेच्या वतीने (जीएमएनआरडी) भटके विमुक्त दिनानिमित्त विशेष व्याख्यान मंगळवारी घेण्यात आले. प्रकुलगुरू डॉ प्रवीण वक्ते अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. संजय पुरी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.व्यंकटेश लांब, संचालक डॉ संग्राम गुंजाळ, अधिसभा सदस्य अॅड. अरविंद केंद्रे, अॅड. संतोष केंद्रे यांची उपस्थिती होती. ग्रामीण विकासासाठी भटक्या विमुक्तांचे योगदान या विषयावर पद्मश्री भिकू रामजी इदाते यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानात भटक्या व विमुक्त समाज दिन का व कश्या साठी साजरा करायचा. ज्या समाजांना आज गुन्हेगार समजल्या जाते ते एकेकाळी या देशातील राज्यकर्ते होते. या संदर्भात उपस्थिताना ऐतिहासिक दाखले दिले. पारधी समाज, वडार समाज अशा सर्व भटक्या,मागास समाजातील दयनिय अवस्थेचे विदारक चित्र सर्वांसमोर मांडले. भटके व विमुक्त समाजाच्या उद्धारासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी केलेल्या कार्याचा गौरव देखील त्यांनी आपल्या व्याख्यानात केला.

दुसरे वक्ते डॉ. संजय पुरी यांनी आदिवासी व भटक्या समाजाच्या समस्या जसे मुलांचा आहार, आधार कार्ड व या समाजांना लागणारे इतर कागदपत्रे उपलब्ध करून देण्यामध्ये भटके विमुक्त विकास परिषदेतर्फे केल्या गेलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रा.व्यंकटेश लांब यांनी १९५२ च्या पारधी समाजाच्या साठीचे कायदे आणि सामाजिक ऐतिहासिक प्रथा यावर भाष्य केले. प्र-कुलगुरु प्रा. प्रवीण वक्ते सर यांनी अध्यक्षीय समारोप केला, त्यांनी पद्मश्री दादा इदाते यांच्यामार्फत जोपासले गेलेल्या पारंपरिक कलांचा उल्लेख केला, भटक्या विमुक्त समाजात कौशल्य आधारित शिक्षण आधीपासूनच रुजलेले असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेचे संचालक प्रा (डॉ). संग्राम गुंजाळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

### जी. एम.एन.आय.आर. डी. संस्थेस भेट

गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेस पद्मश्री भिकू इदाते यांनी सदिच्छा भेट दिली, यावेळेस त्यांनी जी. एम.एन. आय.आर.डी संस्थेत उपलब्ध असणाऱ्या सर्व सोयी सुविधांचा आढावा घेतला व त्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी डॉ. संग्राम गुंजाळ यांच्यासह डॉ. रमेश पांडव, अॅड.अरविंद केंद्रे, अॅड. संतोष केंद्रे यांची उपस्थिती होती.

## ‘काँग्रेस आपल्या गावात’ उपक्रमास प्रतिसाद

### १०० पैकी ८२ गावांचा दौरा पूर्ण



**अकोलादेव / प्रतिनिधी**

जनतेच्या समस्या थेट जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी जाफराबाद तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अजय पाटील बनकर यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या ‘काँग्रेस आपल्या गावात जनसंपर्क दौऱ्याला’ तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तालुक्यातील १०० गावांपैकी आतापर्यंत ८२ गावांचा जनसंपर्क दौरा पूर्ण करण्यात आला आहे.

या दौऱ्यादरम्यान काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गावागावात नागरिकांशी थेट संपर्क साधून त्यांच्या समस्या, अडचणी आणि विकासाच्या प्रश्नांची माहिती जाणून घेतली. नागरिकांनी रस्ते, पाणी, वीज, शेती, शासकीय योजना, रोजगार, महागाई तसेच गावातील विविध मूलभूत प्रश्न काँग्रेस पदाधिकाऱ्यांसमोर मांडले. दौऱ्यादरम्यान शेतकरी, महिला आणि युवकांमध्ये सरकारच्या कारभाराबाबत नाराजी असल्याचे जाणवत आहे, असा दावा अजय पाटील बनकर यांनी केला. वाढता शेती उत्पादन खर्च, शेतमालाच्या दराचे प्रश्न, महागाई आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता असल्याचे त्यांनी सांगितले. जनसंपर्क दौरा हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्षाची सुरुवात आहे. गावकऱ्यांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची दखल घेऊन संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे अजय पाटील बनकर यांनी सांगितले. या जनसंपर्क दौऱ्यात पंचायतराज जिल्हाध्यक्ष जालना भरत अंभोरे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष रघुनाथ पाचे, जाफ्राबादचे शहराध्यक्ष महबूब टेलर, सरचिटणीस सुनील गाडेकर, ठाले, विनोद सुरडकर, मोळवंडे, मुरली भोपळे, भगवान भोपळे यांच्यासह काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाफ्राबाद तालुका बंदच्या हाकेला प्रतिसाद; शहरात शुकशुकाट

### व्यापारी महासंघासह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**जाफ्राबाद / प्रतिनिधी**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जाफ्राबाद तालुका बंदला गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जाफ्राबाद शहरातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग नोंदवत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला.

बंदच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी सकाळपासूनच शहरातील बाजारपेठेत शुकशुकाट पहायला मिळाला. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील प्रमुख बाजारपेठांमधील बहुतांश दुकाने बंद होती. नेहमी नागरिकांची आणि वाहनांची वर्दळ असणाऱ्या मुख्य बाजारपेठेसह बसस्थानक परिसर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि महाराणा प्रताप चौक परिसरात दिवसभर मोठ्या प्रमाणात शुकशुकाट दिसून आला. बाजारपेठेतील प्रमुख व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद असल्याने बंदचा परिणाम दिसून आला. जाफ्राबाद शहरातील व्यापारी महासंघानेही बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वतःहून आपली दुकाने बंद ठेवली. तर मुस्लिम समाज बांधवांसह विविध व्यापारी आणि व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभागी होत मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला आपला पाठिंबा दर्शविला. व्यापाऱ्यांच्या या सहभागामुळे बंदला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

सकाळी ठीक ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात तालुक्यातील विविध गावांमधून शेकडो तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. तालुक्यातील तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी चौकात झालेल्या सभेत विविध वक्त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर आपली भूमिका मांडली. आमची मागणी आरक्षणाची आहे, भांडणाची नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सरकारने गांभीर्याने घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी सरकारकडे केलेल्या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सभेदरम्यान ‘‘एक मराठा, लाख मराठा’’, ‘‘जय शिवराय’’ अशा घोषणांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर दणाणून गेला.

## तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत राजर्षी शाहु विद्यालयाचे यश

**पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी**




तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत राजर्षी शाहू विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले. या स्पर्धेत विद्यालयाची इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी लावण्या राहुल शेळके हिचा प्रथम क्रमांक आला. या स्पर्धेचे आयोजन भोकरदन येथील शिवाजी विद्यालयात करण्यात आलेले होते.

या स्पर्धेकरीता जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा समन्वयक देवा चित्राल, तालुकास्तरीय समन्वयक नंदकिशोर शेटे, विस्तार अधिकारी डी. पी. वाघ, एस. बी. नेवार, केंद्रप्रमुख राजेश बावस्कर, केंद्रप्रमुख आर. एच. सोनवणे, शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास वाघ, नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक शिमरे, परीक्षक प्रा. पंडित, आंधळे, जिजा वाघ, ए.ए. शेरताते उपस्थित होते. स्पर्धेत एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. तालुकास्तरीय वत्कृत्व स्पर्धेत यश मिळविणाऱ्या लावण्या शेळके हिचे संस्थेचे संस्थापक सचिव प्रा. डॉ. सुगदेव मांटे, अध्यक्षा रेवती मांटे, मुखाध्यापक विवेक अवसरमोल, प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे, ज्ञानेश्वर आल्हाट, कनिष्ठ विद्यालयाचे प्राचार्य अमोल बांडगे, महर्षी पराशर ऋषी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अमोल लोखंडे, कार्यालयीन अधीक्षक किशोर वाघ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक चे केंद्र संयोजक राजू धनवई, सहकेंद्र संचालक दिलीप सोनुने, विलास लोखंडे, विवेक पऱ्हाड, स्वप्नील वाघ, निलेश लोखंडे, अनिल लक्कस, अनिल मगर, रवींद्र पानपाटील, धनराज भोसले, लक्ष्मण खरात, मंगेश लोखंडे, दिनेश कापरे, संजय तबडे, विश्वास लोखंडे, वैभव भोरकडे, विठ्ठल बोडखे, भागवत पानपाटील, गजानन लोखंडे, कृष्णा आल्हाट, अधिकार पाटील, राहुल सुरडकर आदींनी कौतुक केले आहे.

## दारु दुकान बंद करण्यासाठी स्मशानभूमीत उपोषण



**परभणी / प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे जांब (रेंगे) गावात बेकायदेशीररित्या सुरु असलेले दारु दुकान बंद करण्यात यावे या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गजानन भास्करराव यादव यांनी जांब येथील स्मशानभूमीत सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून प्रशासनाने या उपोषणाची दखल न घेतल्याने जांब परिसरातील नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील मौजे जांब (रेंगे) गावात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर आणि जिल्हा जिल्हा परिषद शाळेजवळ बेकायदेशीररित्या सुरु असलेले दारु दुकान बंद करण्यात यावे या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गजानन यादव यांनी परभणीच्या पोलिस अधिक्षकासह दैठना पोलिसांकडे वारंवार तक्रार केली होती.

परंतु पोलिसांनी कारवाई न केल्यामुळे गजानन यादव यांनी अवैध दारु विक्री बंद न केल्यास स्मशानभूमीत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता.

## पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात चित्रकला स्पर्धा उत्साहात



**पैठण / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांना वाव मिळावा तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध शाळांतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत परिसरातील विविध शाळांमधील तब्बल १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यामध्ये जिल्हा परिषद शाळा ढोरकिन, जिल्हा परिषद शाळा जायकवाडी, नागनाथ विद्यालय वाहेगाव, भीमाशंकर विद्यालय जैन स्पिनर, तुकाराम हायस्कूल ढाकेफळ, आर्यनंदी पब्लिक स्कूल ढोरकिन आणि जिल्हा परिषद शाळा बालानगर या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील उत्कृष्ट चित्रांची निवड करून क्रमांक प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या या

कार्यक्रमास पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे, उपनिरीक्षक दशरथ बुरकुल, उपनिरीक्षक कविता जगताप, राहुल मोतमल, कर्तारसिंग सिंघल, दिनेश दाभाडे, कृष्णा उगले, भवर, पंडित, दिलवाले यांच्यासह पोलीस कर्मचारी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## वाळू वाहतूक करणाऱ्या दोघाविरुध्द गुन्हा दाखल

**वैजापूर :** बेकायदेशीररित्या वाळुची वाहतूक करणाऱ्या दोन जणा विरूद्ध पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तालुक्यातील झोलेगाव शिवारात मंगळवार, १ सप्टेंबर रोजी रात्री पोलीसांनी ही कारवाई केली. झोलेगाव शिवारात वाळू घेऊन टिप्पर जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.त्या आधारे झोलेगाव शिवारात पोलीसांनी टिप्पर पकडला. या टिप्पर मधून दीड ब्रास वाळूची वाहतूक करण्यात येत होती. टिप्पर व त्यात भरलेली वाळु १६ लाख ९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे.या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक चाँद मेंडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रदीप साहेबराव दिवेकर, रा. देवगाव रंगारी व टिप्पर मालक या दोन जणांविरुद्ध शिवूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार राहुल थोरात हे करीत आहेत.

## पोलिस मित्र संघटनेची कार्यकारिणी जाहीर





**पाचपीरवाडी / प्रतिनिधी**

पोलीस मित्र या राष्ट्रीय संघटनेच्या महाराष्ट्र सचिवपदी कैलास गाडेकर यांची तर महिला जिल्हाध्यक्षपदी बबीता केशव सोनवणे, फुलंब्री तालुकाध्यक्षपदी मनोज सोनवणे यांची नुकतीच निवड जाहीर करण्यात आली आहे.

पोलिस मित्र या राष्ट्रीय संघटनेची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह राज्यात विस्तार करुन पोलिस आणि जनतेमध्ये समन्वयक म्हणून काम करु असे आश्वासन यावेळी नवनियुक्त प्रदेश महासचिव कैलास गाडेकर यांनी दिले. तर महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल असे महिला जिल्हाध्यक्ष बबीता सोनवणे यांनी सांगितले.

### न्यायालयाने केली पोलिस कोठडीत रवानगी

## समृद्धी महामार्गावर लुटमार : चार आरोपी गजाआड

**वैजापूर / प्रतिनिधी**



समृद्धी महामार्गावर उद्योजकाला मारहाण करून सोन्याची साखळी लुटल्या प्रकरणातील चार आरोपींना पोलिसांनी पाच वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक केली. अटकेत असलेल्या चोरट्यांना पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांची पोलिस कोठडीत रवानगी केली असल्याचवी माहिती वैजापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी दिली आहे.

राहुरी तालुक्यातील टाकळीमीया येथील उद्योजक साहील सतीश सोनवणे यांना समृद्धी महामार्गावर २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास हडस पिंपळगाव शिवारात मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी बळजबरीने काढून घेतली होती. या प्रकरणात पोलिसांनी यापुर्वी यातील आरोपी किरण अजिनाथ गायकवाड, रा. हिवरसिंगा ता.शिरुर कासार जि.बीड यास अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी उर्वरित आरोपींना दिल्ली, नाशिक, सोलापूर,बीड, पुणे जिल्ह्यातुन जेरबंद केले. त्यात परशुराम मोहन गायकवाड, रा.एकनाथवाडी, ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर, परशुराम मोहन गायकवाड, करण भरत जाधव, रा.मिडसावंगी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर ह.मु.बीड, अनिल जयराम जाधव, रा.ह.मु.नाईकनगर बीडबायपास छत्रपती संभाजीनगर, पंडीत उर्फ चन्नाअप्पा सखाराम लष्करे, रा.सैनीक विद्यालय,बीड या आरोपींचा समावेश आहे. अटकेत असलेल्या आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेली एक चारचाकी जप्त केली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे, परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक विनय सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयसिंग राजपुत, सहाय्यक निरीक्षक वैभव रणखांब, लहु घोडे, महेश घुगे, भरत निकाळजे, थोटे, विष्णु गायकवाड, रविंद्र लोखंडे, अशोक वाघ,शिवानंद बनगे, विठ्ठल डोके, गोपाल पाटील, सुनिल गोरे, सचिन राठोड, सचिन सोनार, संतोष डोंगरे, विजय धुमाळ दिपक सुरोशे, भागीनाथ आहेर, महेश बिरुटे, अनिल काळे, सनि खरात, बलविरसिंग बहुरे, कविता पवार, निलेश कुडे, शिवाजी मगर, संदीप कोळगे, संजय तांदळे, युवराज पाडळे, अमोल कांबळे, प्रशांत गित्ते, ज्ञानेश्वर मेटे, सायबरचे सहाय्यक निरीक्षक समाधान पवार, मुकेश वाघ, राजेश राठोड, तांत्रीक उपनिरीक्षक मेघा माळी, योगेश तरमळे, जिवन घोलप यांनी ही कारवाई केली.

### दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई

लुटमारीची घटना घडल्यानंतर पोलीसांनी गुन्हा दाखल करण्यास दोन दिवस लावले.फिर्यादी साहील सोनवणे हे घटना घडल्यानंतर विरगाव, वैजापूर, कोपरगाव व शिर्डी या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी गेले.मात्र पोलीसांनी हद्दीच्या वादातून तक्रार दारांना पिटाळून लावले.त्यामुळे दोन दिवस तक्रार धारकांस विनाकारण त्रास झाला.तसेच आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले.या प्रकरणी विरगाव पोलीस ठाण्याचे हवालदार गुणवंत थोरात व वैजापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार सुनिल थोरात यांची मुख्यालयात रवानगी करण्यात आली आहे.

## विमुक्त दिनानिमित्त भोकरदनमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सत्कार

**धावडा / प्रतिनिधी**



विमुक्त जमातींच्या ऐतिहासिक संघर्षाची आठवण जागवणारा ३१ ऑगस्ट हा ‘विमुक्त दिन’ म्हणून देशभर साजरा केला जातो. यानिमित्ताने भोकरदन तालुक्यात छप्परबंद फकीर समाजाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यावेळी तालुक्यात नुकताच पदभार स्वीकारलेले एसडीएम आय. एस. कार्तिक पाणिग्रही, तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे, जिल्हा परिषद सदस्य आशा पांडे, नायब तहसीलदार बालाजी पंपुलवाड, नायब तहसीलदार अविनाश पाटील, भोकरदन पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक राहुल बांगर, पारध पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संतोष माने यांचा सत्कार करण्यात आला.

छप्परबंद फकीर समाजाचे जिल्हा उपाध्यक्ष राजू जाफर शहा यांच्या नेतृत्वाखाली आजम शहा, अकील, सामाजिक कार्यकर्ते जबीउल्ला खान आदींच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांवर प्रशासनाशी चर्चा करण्यात आली. तत्कालीन ब्रिटिश सरकारने १८७१ मध्ये ‘क्रिमिनल ट्राइब्स अॅक्ट’ लागू करून अनेक जाती-जमातींना जन्मजात गुन्हेगार म्हणून घोषित केले होते. या कायद्यामुळे छप्परबंद, रामोशी, पारधी, कंजारभाट, भामटा यांसह अनेक समाजांना विविध सेटलमेंटमध्ये कठोर नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होते. त्यांच्या हालचालींवर निर्बंध होते आणि नियमित हजेरी लावण्याची सक्ती करण्यात आली होती.

स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी हा अन्यायकारक कायदा रद्द करण्याच्या प्रक्रियेत या समाजांना ‘गुन्हेगार जमाती’ या कलंकित ओळखीतून मुक्त करण्यात आले. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस ‘विमुक्त दिन’ म्हणून स्मरणात ठेवला जातो. विमुक्त दिनाच्या कार्यक्रमात छप्परबंद फकीर समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रमाणपत्रांच्या प्रश्नावर विशेष चर्चा करण्यात आली. तसेच गरजू आणि गरीब कुटुंबांना राशनकार्ड, घरकुल योजना, संजय गांधी निराधार योजना यांसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची मागणी करण्यात आली.

## न्यूज ब्रीफ

### वीजचोरीप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा

**दारव्हा :** तालुक्यातील कळसा येथे वीजमीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी केल्याप्रकरणी किशोर पुंडलिक चोरे (४७) यांच्याविरुद्ध २ सप्टेंबर रोजी दारव्हा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणचे सहायक अभियंता अलोक भास्करराव भोयर यांच्या तक्रारीवरून भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली. १३ जुलै रोजी वीज तपासणीदरम्यान चोरे यांच्या घरातील मीटरच्या मागील बाजूस छिद्र करून कॉपर पट्टीच्या साहाय्याने मीटरची गती कमी केल्याचे आढळले. ॲक्युचेक मशीनने तपासणी केली असता मीटर ७९.१७ टक्के मंदगतीने सुरू असल्याचे निष्पन्न झाले.

### वसतिगृह प्रवेशासाठी मुदतवाढ

**अमरावती :** इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. बारावीनंतर व्यावसायिक व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर अर्ज करावा. अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित शासकीय वसतिगृहात सादर करणे आवश्यक आहे.

### बाल हक्क आयोगाचा अमरावती दौरा

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाचा ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान अमरावती जिल्हा दौरा होणार आहे. या काळात जिल्ह्यातील बालगृहांची पाहणी, बालकांच्या हक्कांशी संबंधित प्रकरणांची सुनावणी तसेच विविध विषयांचा आढावा घेण्यात येणार आहे. ६ सप्टेंबर रोजी बालगृहांना भेटी, ७ सप्टेंबर रोजी प्रकरणांची सुनावणी व आढावा बैठक, तर ८ सप्टेंबर रोजी मेळघाट क्षेत्राला भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार आहे.

### रोहित्रावरील भार कमी करण्याचे महावितरणचे आवाहन..

# पिकांना सिंचनाची गरज; कॅपेसिटरचा वापर ठरेल फायदेशीर

**वाशिम/प्रतिनिधी**

महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यात कृषीपंपांच्या वापरात मोठी वाढ झाली आहे. वीजपुरवठा सुरू होताच पंप सुरू करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी ऑटोस्विच बसविले आहेत. मात्र, एकाच रोहित्रावरील अनेक कृषीपंप ऑटोस्विचमुळे एकाच वेळी सुरू होत असल्याने रोहित्रावर अचानक मोठा भार येतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्यांवरील तारा तुटणे, एलटी लाईन ट्रिप होणे यांसारख्या तांत्रिक अडचणी निमर्ाण होत आहेत. या पार्श्वभूमीवर कृषीपंपांना योग्य क्षमतेचे कॅपेसिटर बसविण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

कृषीपंपांच्या वाढलेल्या वापरामुळे सध्या वीज वितरण यंत्रणेवरही अतिरिक्त ताण येत आहे. विशेषतः पावसाचा खंड पडल्याने शेतकऱ्यांकडून पिकांना पाणी देण्यासाठी कृषीपंप सातत्याने सुरू ठेवले जात आहेत. त्यातच ऑटोस्विचमुळे एका रोहित्राला



> ऑटोस्विचमुळे एकाच वेळी कृषीपंप सुरू झाल्यास रोहित्रावर अचानक अतिरिक्त भार येतो. त्यामुळे रोहित्र बिघाडासह वीजपुरवठ्यात व्यत्यय येण्याची शक्यता असते. शेतकऱ्यांनी ऑटोस्विच काढून कृषीपंपाच्या क्षमतेनुसार योग्य कॅपेसिटर बसवावा. यामुळे रोहित्रावरील भार कमी होऊन पंपाची कार्यक्षमताही सुधारण्यास मदत होईल.
>
> - **दत्तात्रय बनसोडे,** मुख्य अभियंता, महावितरण

जोडलेले अनेक पंप एकाच वेळी सुरू झाल्यास सुरुवातीच्या क्षणी मोठ्या प्रमाणात विद्युत प्रवाहाची मागणी निर्माण होते. यामुळे रोहित्रावर तसेच वीजवाहिन्यांवर अतिरिक्त भार पडतो. शेतातील कृषीपंपांमध्ये इंडक्शन मोटारींचा वापर केला जातो. या मोटारी सुरू असताना अतिरिक्त 'इंडक्टिव्ह करंट' खेचला जातो. त्यामुळे वीजवाहिन्यांवर सुमारे ३० टक्के अधिक भार येतो. परिणामी मोटार जळणे, ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होऊन नादुरुस्त होणे, वारंवार फॉल्ट होणे आणि एलटी लाईन ट्रिप होण्यासारखे प्रकार घडतात. याचा फटका शेतकऱ्यांसह महावितरणच्या यंत्रणेलाही बसतो.

#### कॅपेसिटरमुळे अतिरिक्त भार कमी

■ कॅपेसिटर कृषीपंपाला आवश्यक असलेली 'रिॲक्टिव्ह पॉवर' थेट पुरवितो. त्यामुळे वीजवाहिन्यांमधून वाहणारा अतिरिक्त विद्युत प्रवाह सुमारे ३० टक्क्यांनी कमी होण्यास मदत होते. परिणामी विद्युत यंत्रणेवरील ताण कमी होऊन ग्राहकांना योग्य दाबाने वीजपुरवठा देणे सुलभ होते. तसेच रोहित्र जळणे, वीजवाहिन्या तुटणे आणि कृषीपंप नादुरुस्त होण्याच्या घटना कमी करण्यास मदत होते.

#### पंपाच्या क्षमतेनुसार कॅपेसिटर आवश्यक

■ कृषीपंपाच्या क्षमतेनुसार कॅपेसिटरची क्षमता निवडणे आवश्यक आहे. ३ एचपी मोटारीसाठी १ केव्हीएआर, ५ एचपीसाठी २ केव्हीएआर, तर ७.५ एचपी मोटारीसाठी ३ केव्हीएआर क्षमतेचा कॅपेसिटर पुरेसा ठरतो. बाजारात विविध नामांकित कंपन्यांचे कॅपेसिटर उपलब्ध असून, साधारण ३०० ते ५०० रुपयांच्या खर्चात हे उपकरण मिळते. कमी खर्चातील या उपायामुळे महागड्या कृषीपंपाच्या मोटारीचे नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते.

#### कॅपेसिटर योग्य ठिकाणी बसविणे महत्त्वाचे

■ कॅपेसिटर बसविताना तो इनकमिंग साईडला न लावता स्टार्टर आणि मोटारीला जोडलेल्या वायरला, मोटारीपूर्वी बसविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा पद्धतीने जोडणी केल्यास मोटार सुरू झाल्यावरच कॅपेसिटर कार्यरत होईल आणि मोटार बंद झाल्यानंतर कॅपेसिटरही बंद राहील.

# अमरावती विभागात २९६ उमेदवारांची निवड

### शिक्षक भरतीसाठी कागदपत्रे पडताळणी सुरू

**अमरावती /प्रतिनिधी**

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त शासकीय आश्रम शाळांमधील शिक्षक संवर्गातील ४६८ रिक्त पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. या भरतीच्या मुलाखतीशिवाय निवड प्रक्रियेत २९६ शिफारसप्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी २७ ऑगस्ट रोजी पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी ३ ते ५ सप्टेंबरया कालावधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयात सुरू आहे. उमेदवारांनी निर्धारित दिनांक व वेळेनुसार उपस्थित राहून कागदपत्रांची पडताळणी करून घेण्याचे आवाहन विभागाने केले आहे.

पदनिहाय व माध्यमनिहाय शिफारसप्राप्त उमेदवारांची यादी तसेच पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक आदिवासी विकास विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. पडताळणीसाठी

> शिफारसप्राप्त उमेदवारांनी निर्धारित दिनांक व वेळेनुसार कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अनुपस्थित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. त्यामुळे उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावरील सूचना व वेळापत्रकाची नोंद घेऊन आवश्यक मूळ कागदपत्रांसह वेळेत उपस्थित राहावे.
>
> - **श्रीकांत धोटे,** उपआयुक्त, आदिवासी विकास, अमरावती

उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या माहितीनुसार आवश्यक स्व-प्रमाणपत्र, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भातील लागू प्रमाणपत्रे, अधिवास, जात व जात वैधता प्रमाणपत्र, लागू असल्यास नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, टीईटी/सीटीईटी प्रमाणपत्र, दिव्यांगत्व प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती आणि एक स्वयंसाक्षांकित छायाप्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

# अमरावती शहरात मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी

### पोलीस प्रशासनाची अंतिम अधिसूचना जारी

**अमरावती/प्रतिनिधी**

वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन अमरावती शहरातील प्रमुख मार्गांवर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी २ सप्टेंबर रोजी याबाबत अंतिम अधिसूचना जारी केली.

मालविरहित अवस्थेतील वजन २ टनांपेक्षा अधिक असलेली व्यावसायिक वाहने, भारसहित वहन क्षमता दोन टनांपेक्षा अधिक असलेली वाहने आणि मल्टी-ॲक्सल वाहनांना सकाळी ६.३० ते रात्री ९.३० या वेळेत प्रवेशबंदी राहणार आहे. गौरी इन पॉइंट, वेलकम टी पॉइंट, पंचवटी, इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गद्रे चौक, नवाथे चौक, बेनाम चौक, अलमास गेट तसेच बडनेरा ते यवतमाळ वाय पॉइंटसह राजुरा नाका, विद्यापीठ चौक, बियाणी चौक, दीपक चौक, चित्रा चौक आणि नागपुरी गेट ते ट्रान्सपोर्ट नगर या मार्गांवर निर्बंध लागू राहतील.

गांधी चौक ते रविनगर, राजापेठ, अंबापेठ तसेच परकोटातील दाट लोकवस्तीच्या अंतर्गत मार्गांवर कायमस्वरूपी प्रवेशबंदी राहणार आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, शासकीय धान्य, कचरा संकलन, पोलीस, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या वाहनांना सूट देण्यात आली आहे. अन्नधान्य व कृषी माल वाहतुकीसाठी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत निर्धारित मार्गांवर परवानगी राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

#### ११०८ अपघात; २४६ जणांचा बळी

■ शहरात २०२४ ते जुलै २०२६ या कालावधीत १ हजार १०८ अपघात झाले. यातील २१२ अपघात प्राणघातक असून त्यात २४६ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ९१३ जण जखमी झाले. शहरातील गर्दीच्या मार्गांवर अवजड व मालवाहू वाहनांची वाढती वर्दळ लक्षात घेऊन अपघातांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवेशबंदीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ नुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

### प्रारूप मतदार यादी तपासा : हिवराळे

**वाशिम :** विशेष सघन पुनरीक्षण प्रक्रियेंतर्गत महाराष्ट्रातील प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या असून, नागरिकांनी स्वतःसह कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत का, याची तातडीने तपासणी करावी, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी केले आहे. नाव वगळले असल्यास किंवा नाव, वय, पत्ता, जन्मतारीख आदी तपशिलात त्रुटी असल्यास मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी. संबंधित नोंद तपासून आवश्यक कार्यवाही करावी. नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म ६, तर तपशिलातील दुरुस्तीसाठी फॉर्म ८ दाखल करता येतो. ज्येष्ठ नागरिक, बाहेरगावी नोकरी किंवा शिक्षणासाठी गेलेले सदस्य तसेच एसआयआर प्रक्रियेत पडताळणी न झालेल्या मतदारांची नावे विशेष काळजीपूर्वक तपासावीत.

# एमपीएससीत यशस्वी झेप; दोघांचा सत्कार

**वाशिम/प्रतिनिधी**

संतोषीमाता नगरातील अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालयात एमपीएससी परीक्षेत यश मिळवून विविध पदांवर निवड झालेल्या नामांतर सोनोने व प्रज्ञा अंबादास सरकटे यांचा १ सप्टेंबर रोजी सत्कार करण्यात आला.

फाळेगाव थेट येथील नामांतर सोनोने यांची उपअभियंता (यांत्रिकी), ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद वाशीम या पदावर, तर एकबुर्जी येथील प्रज्ञा सरकटे यांची सहाय्यक कर निरीक्षक पदावर निवड झाली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान होते. से.नि.उप मुख्य कार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनोद पट्टेबहादूर, प्रवीण




पट्टेबहादूर, से.नि.केंद्रप्रमुख उंदरे व ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दोघांचा शाल, पुष्पगुच्छ व भारतीय संविधान देऊन सत्कार करण्यात आला. विलास खिल्लारे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत वाचनावर भर देण्याचे आवाहन केले. राजकुमार पडघान यांनी यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या पदाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असे सांगितले. प्रास्ताविक प्रवीण पट्टेबहादूर, सूत्रसंचालन प्रभू कांबळे यांनी केले. आभार राजेंद्र अहीर यांनी मानले. कार्यक्रमाला आर.पी. कांबळे, अरविंद एस. पडघान, अशोक अडागळे, प्रा.अंबादास सरकटे, डॉ. संजय पडघान, संतोष इंगळे, प्रमोद खडसे, अजय अवचार, भगवान पडघान उपस्थित होते.

# खरबी शिवारातून दोन म्हशी, वासरू चोरीला

### अज्ञात व्यक्तीविरुद्ध दराटी पोलिसांत गुन्हा दाखल

**यवतमाळ/प्रतिनिधी**

यवतमाळ : दराटी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खरबी शेतशिवारातून दोन म्हशी आणि एक वासरू चोरीला गेल्याची घटना ३० ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी सदानंद नारायण पांडे यांच्या तक्रारीवरून २ सप्टेंबर रोजी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पांडे हे शेतीसोबत खरबी ते किनवट रोडलगत दूध डेअरी चालवितात. त्यांच्या मालकीची जनावरे पैनगंगा नदीपात्रालगत चरावयास नेण्यासाठी रामेश्वर नागोराव डवरे यांच्याकडे ठेवण्यात आली होती. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी जनावरे चरायला नेल्यानंतर त्यापैकी दोन म्हशी व एक वासरू आढळून आले नाही. त्यानंतर पांडे, त्यांचा गडी व ग्रामस्थांनी खरबी शेतशिवार तसेच जंगल परिसर आणि नदीच्या दोन्ही काठांवर शोध घेतला. मात्र जनावरे सापडली नाहीत. चोरीस गेलेल्या जनावरांची एकूण किंमत ८५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार गजानन सिताराम डोंगरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

### बायपाससाठी व्यापाऱ्यांची खासदारांकडे धाव



**मानोरा :** व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ३ सप्टेंबर रोजी खासदार संजय देशमुख यांची भेट घेऊन मानोरा शहराबाहेरून बायपास मार्ग काढण्याबाबत निवेदन दिले. यावेळी व्यापारी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# वाळू चोरीप्रकरणी एकास अटक; ३.८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**यवतमाळ :** दिग्रस तालुक्यातील आष्टा फाटा येथे अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या एकास पोलिसांनी पकडून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मोहम्मद इरफान मोहम्मद इसराईल (५५, रा. कलगाव) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७)(८) अन्वये कारवाई करण्यात आली.

पोलिसांना कलगाव येथील नदीपात्रातून गौण खनिज वाळू चोरी करून ट्रॅक्टरद्वारे आष्टा फाटामार्गे वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी आष्टा फाटा येथे सापळा रचला. रात्रीच्या सुमारास लाल रंगाचा ट्रॅक्टर-ट्रॉली येताना दिसताच पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र चालकाने वाहन न थांबवता पळ काढला. पुढे शेतरस्त्यावर ट्रॉलीचे बॅलन्स बिघडल्याने ती पलटी झाली. पोलिसांनी चालकाची चौकशी केली असता त्याने कलगाव येथील नाल्यातून वाळू चोरी केल्याचे सांगितले. ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास वाळू आढळून आली. कारवाईत सुमारे ३ लाखांचा ट्रॅक्टर, ८० हजारांची ट्रॉली आणि ८ हजार रुपयांची वाळू, असा एकूण ३ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार रविंद्र शिराम मोळेवार करीत आहेत.

### विभागांनी समन्वयाने काम करण्याचे नीलेश हेलोंडे यांचे निर्देश

# आत्महत्यांचा कलंक दूर करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करा

**यवतमाळ/प्रतिनिधी**

जिल्ह्यावरील 'शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा' हा कलंक दूर करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे व समन्वयाने काम करावे, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी विभागप्रमुखांना दिले.

बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात मिशनशी संबंधित विविध योजनांचा जिल्हास्तरीय आढावा घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, प्रकल्प संचालक आनंद इंगळे,



जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त मंगेश काळे, जिल्हा उपनिबंधक अर्चना माळवे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. हेलोंडे यांनी प्रेरणा प्रकल्पांतर्गत शिबिरे घेणे, आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वारसांना शासकीय मदत व कौशल्य प्रशिक्षण देणे, कृषी यंत्रे उपलब्ध करून देणे आणि पीक कर्ज वाटपाला गती देण्याचे निर्देश दिले. तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना आणि चारा लागवडीचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्याच्या सूचना केल्या. आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या शिधापत्रिका अद्ययावत करणे आणि ग्रामीण भागातील मुलांसाठी क्रीडांगणे उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. सर्व विभागांनी एकजुटीने काम केल्यास जिल्ह्यात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा विश्वास हेलोंडे यांनी व्यक्त केला.

#### 'मिशन उभारी'चे कौतुक

■ शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी व आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'मिशन उभारी' उपक्रमाची माहिती हेलोंडे यांनी घेतली. शेतकरी कुटुंबांना आधार देणारा हा नाविन्यपूर्ण उपक्रम असल्याचे सांगत त्यांनी त्याचे कौतुक केले.

#### शेतकरी स्वावलंबन केंद्राला भेट

■ आढावा बैठकीनंतर हेलोंडे यांनी वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन केंद्र तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.

# वार्षिक योजनेच्या कामांना वेग देण्याचे निर्देश



**यवतमाळ/प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले.

महसूल भवन येथे बुधवारी जिल्हाधिकारी मीना यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत ऑगस्टअखेरच्या खर्चाचा तसेच विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपजिल्हाधिकारी पूनम आहिरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

२३ ऑगस्ट रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधींनी दिलेल्या सूचना व निर्देशांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असून विभागांनी संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करावेत. तसेच नाविन्यपूर्ण कामांचे प्रस्तावही सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजनेचा निधी कालमर्यादेत शंभर टक्के खर्च करावा. कोणत्याही विभागाचा निधी समर्पित होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

## न्यूज ब्रीफ

### खडसेंच्या तत्परतेने मिळाली कागदपत्रे



**अंढेरा :** शासकीय अधिकारी केवळ कार्यालयीन कामकाजापुरते मर्यादित न राहता एखाद्या गरजू व्यक्तीची अडचण समजून घेऊन तत्परतेने मदत करतात, तेव्हा त्याचा थेट फायदा संबंधित व्यक्तीच्या भवितव्याला होतो. याचा प्रत्यय एसडीओ प्रा. संजय खडसे यांच्या कार्यातून पुन्हा एकदा आला. संकेत श्रीकांत तायडे याची स्टेट बँक ऑफ इंडियामधील मुलाखत निश्चित झाली होती. या मुलाखतीसाठी जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक होते. मात्र मुलाखतीची वेळ जवळ आल्याने ही कागदपत्रे वेळेत मिळतील का ? याची चिंता संकेतला होती. अशा परिस्थितीत त्याने आपली अडचण एसडीओ प्रा. संजय खडसे यांच्यासमोर मांडली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत खडसे यांनी तत्परतेने सहकार्य केले. परिणामी कमी वेळेत आवश्यक कागदपत्रे मिळाल्याने युवकाची मोठी अडचण दूर झाली. याबद्दल संकेत तायडे याने एसडीओ खडसे यांचे आभार मानले. अत्यंत कमी वेळेत आवश्यक कागदपत्रे मिळाल्याने त्याला मोठा दिलासा मिळाला.

### लांडकर भावंडांची शिक्षकपदी निवड



**चिखली :** मनात जिद्द आणि अभ्यासू वृत्ती असेल तर हमखास यशाचे शिखर गाठता येते हे लांडकर भावंडांनी दाखवून दिले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या शिक्षक भरतीमध्ये पोर्टलद्वारे शिवदीप लांडकर व अंजली लांडकर या बहिण- भावाची निवड झाली आहे. चिखली तालुक्यातील शिवशंकर विद्यालय भरोसा येथील सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक तसेच राज्यस्तरीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्राप्त क्रीडा शिक्षक दिलीप लांडकर यांनी मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार दिले. मुलांनीही त्यांच्या परिश्रमाचे चीज केले. नुकताच मुलगा शिवदीप लांडकर यांची पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषद अमरावती येथे शिक्षक म्हणून निवड झाली. तर मुलगी अंजली लांडकरची पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषद पुणे येथे शिक्षिका म्हणून निवड झाली. दोन्ही भावंडे हे एमएससी भौतिकशास्त्र विषयात उच्चशिक्षित आहेत. त्याचबरोबर सेट परीक्षा सुद्धा उत्तीर्ण झालेले आहेत. दोघांचेही प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा मेरा भरोसा येथे झालेले आहे.

### काम बंद आंदोलन स्थगित

**अंढेरा :** अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदारांसह महसूल पथकावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ महसूल कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले काम बंद आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. मुख्य आरोपीला १० सप्टेंबरपर्यंत अटक करण्याचे पोलिस प्रशासनाने आश्वासन दिल्यानंतर संघटनांनी हा निर्णय घेतला. त्यामुळे २ सप्टेंबरपासून महसूल कर्मचारी नियमितपणे कामकाजावर रुजू झाले आहेत. अवैध रेती वाहतुकीविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई सुरू असतांना तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या नेतृत्वाखालील महसूल पथकावर हल्ला करण्यात आला होता.

**CHANGE OF NAME**
MY OLD NAME
**NILRATAN UPENDRANATH BARAI**
NOW MY NEW NAME IS
**NILRATAN BARAI**
PASSPORAT
NO. N8370943
ADDRESS: MAULANA AZAD CHOWK, MULYAD HOSPITAL, DHAD, TQ.,DIST.BULDHANA - 443106

## पावसाने दडी मारल्यामुळे पिके सुकण्याच्या मार्गावर

# राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा : रविकांत तुपकर

**बुलढाणा, प्रतिनिधी**

पावसाने पाठ फिरवल्याने पिके धोक्यात आली असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. ही गंभीर अवस्था लक्षात घेऊन शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्य शिष्टमंडळाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे राज्यात निर्माण झालेली विदारक परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देत तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करण्यासह इतर मागण्यांचे निवेदन बुधवारी सुपूर्द केले. यावेळी चर्चा करताना तुपकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अत्यंत गंभीर संकटातून जात आहे. चालू खरीप हंगामात अनेक भागांत पावसाने दडी मारल्यामुळे पिकांना आवश्यक पाणी मिळत नाही. परिणामी सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, तूर, मका यांसह विविध खरीप पिके पाण्याअभावी वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांवर मानसिक व आर्थिक ताण निर्माण होत आहे, पिकांची आणि शेतकऱ्यांची ही गंभीर अवस्था पाहता शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू करावी अशी मागणी रविकांत तुपकर यांनी केली. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, युवा प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण मोरे, मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर टाले, अमोल मोरे, ॲड. प्रवीण सुरडकर, सुनिल मिसाळ, बाळू पाटील, नितीन सोनटक्के, नीलेश राजपूत, रामेश्वर अंभोरे, श्रीराम चलवाड, विठ्ठल खेडेकर, हरिभाऊ उबरहांडे, भागवत धोरण, अरबाज खान, हनुमान मिसाळ, लक्ष्मण भगत, संजय काकडे, मंगेश मिसाळ, पवन काकडे, यांच्यासह क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### खरीप हंगाम धोक्यात

■ जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पावसाचे प्रमाण अत्यल्प झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम धोक्यात आला आहे. पिकांची वाढ खुंटली असून पिके करपण्यास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत व इतर शेती खर्चासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे. आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता पिके हातातून जाण्याचे आणखी मोठे संकट उभे ठाकले आहे. दोन दिवसात समाधानकारक पाऊस न झाल्यास संपूर्ण पिके नष्ट होऊन खरीप हंगाम हातातून जाण्याची दाट शक्यता आहे. यामुळे शेतकरी पुरते खचले आहेत.

## विद्यार्थिनींनी वृक्षांना बांधल्या स्वहस्तनिर्मित राख्या

**देऊळगाव राजा , प्रतिनिधी**



पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन व संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. या उदात्त भावनेतून क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले नगरपरिषद मराठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त स्वतः तयार केलेल्या राख्या शाळेतील वृक्षांना बांधून वृक्ष रक्षणाचा संदेश दिला.

विद्यार्थिनींच्या या अभिनव उपक्रमातून 'वृक्ष हेच आपले खरे मित्र' असा संदेश देत वृक्ष संवर्धन व संरक्षणाचा संकल्प करण्यात आला. देऊळगाव राजा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरुण मोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मुख्याध्यापिका राजमाने यांनी विद्यार्थिनींना वृक्ष संवर्धनाचे महत्त्व विषद करून पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षांची भूमिका स्पष्ट केली.

शिक्षिका संगिता कुमठे यांनी, भविष्य उज्वल ठेवायचे असेल तर पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना प्रत्येकाने अंगीकारणे आवश्यक आहे. वृक्षांचे संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असे आवाहन केले. या उपक्रमावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच सर्व सदस्य, शिक्षक मंगल गाडगे, शिक्षिका जिजा जेठे, समाजसेवक अरविंद खांडेभराड यांची उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्षांना राख्या बांधत त्यांचे संगोपन व संरक्षण करण्याचा संकल्प केला. झाडे लावा झाडे जगवा पर्यावरणाचे रक्षण करा या घोषणांनी शाळेतील परिसर दुमदुमून गेला होता.

## पर्यावरणपूरक उत्सवाकडे गणेशभक्तांचा कल

**चिखली , प्रतिनिधी**

गणेशोत्सव दहा दिवसांवर येऊन ठेपला असून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडे गणेश भक्तांचा कल वाढला आहे. गणेश भक्तामध्ये पर्यावरणवषयक जागृती होत आहे. शाडूपासून तयार केलेल्या गणेश मूर्तींची मागणी वाढत आहे. यावर्षी चिखली तालुक्यातील जवळपास ४५ गणेश भक्तांनी पर्यावरणपूरक मूर्तीची मागणी केली.

गणेशोत्सव जवळ आल्याने गणेश मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे. कच्च्या मूर्ती तयार करण्यात आल्या असून आता मूर्ती व रंगरंगोटीसह दागिने चढवण्याचे काम सुरू आहे. आपल्याला हवी असलेल्या गणेश मूर्तीची आगाऊ नोंदणी भक्त करत असल्याचेही दिसून येत आहे. मागील काही वर्षांपासून चिखली



तालुक्यातील भरोसा गावातील गणेश मूर्तीची मागणी वाढली आहे. त्यामुळे अनेक गणेश मूर्ती शाडू, कागदी लगदा आणि इतर नैसर्गिक सामग्रीपासून गणेश मूर्ती तयार केल्या जातात. गणेश भक्त आपल्या पसंतीनुसार आगाऊ सांगून गणेश मूर्ती तयार करून घेत आहेत. नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूकता वाढत असल्यामुळे ते पर्यावरण पूरक पर्याय निवडणे पसंत करत आहेत.

## शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी बापाचे उपोषण

**मेहकर, प्रतिनिधी**

दहावी उत्तीर्ण झालेल्या लेकीला पुढे शिकवायचे पण शाळा सोडल्याचा दाखलाच मिळत नसल्याने बापाला उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचा धक्कादायक प्रकार मेहकरमध्ये समोर आला आहे. फी भरुनही मुलीचा शाळा सोडल्याचा दाखला देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप करीत पंढरीनाथ डिघोळे यांनी १ सप्टेंबरपासून उपोषण सुरु केले आहे.

शिक्षण विभाग आणि प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, पल्लवी पंढरीनाथ डिघोळे हिने सत्यजीत इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमधून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात दहावी उत्तीर्ण केली. पुढील शिक्षणासाठी अन्य शाळेत प्रवेश घ्यायचा आहे. मात्र, फी थकीत असल्याचे कारण पुढे करत शाळेकडून टीसी देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. कोरोना काळातील फी वेळोवेळी भरल्याचे, तसेच नववी आणि दहावीची फी सुध्दा भरली असल्याचे डिघोळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.




त्यामुळे शाळेची थकबाकीची मागणी नेमकी कशाच्या आधारे आहे, याची चौकशी करुन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी त्यांची मागणी आहे. फी च्या वादात मात्र विद्यार्थिनीच्या प्रवेशाचा खोळंबा का व्हावा, हा प्रश्न या प्रकरणातून पुढे येतो. शाळा सोडल्याच्या दाखल्या अभावी मुलीच्या प्रवेशात अडथळा निर्माण होत असून तिचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी तातडीने दाखला मिळवून द्यावा, अशी मागणी डिघोळे यांनी केली आहे. मुलीला न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरु ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीच्या बैठकीत चर्चा



**सिंदखेड राजा, प्रतिनिधी**

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सुव्यवस्था व उत्सवाचे वातावरण कायम राहावे, यासाठी शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी गणपती उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी ठोसरे, ठाणेदार इंगळे, ठाणेदार मारतोंडकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे, उपनगराध्यक्ष संगिता म्हस्के तथा नगरसेवक, नगरपरिषद कर्मचारी, महावितरण कर्मचारी, शांतता कमिटीचे सदस्य तसेच शहरातील सर्व गणपती मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. यावेळी गणपती उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे नियोजन, ध्वनिप्रदूषण तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सव हा सामाजिक सलोखा व एकोप्याचा संदेश देणारा उत्सव असून सर्व गणपती मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे असील श्री. मोहन प्रभाकर माहुरकर (रा.सिद्धीविनायक नगर, घाटपूरी रोड, खामगाव, मो.नं. ९४२२५२० ४२०) यांच्या मालकीची व ताब्यात असलेली मालमत्ता खालीलप्रमाणे आहे:

**मालमत्तेचे वर्णन:-** प्लॉट नंबर:- नजूल शिट नं.२ Ipn २४A२७B दि. १०/०६/२०२२ सदर मालमत्ता माझे असील यांनी १) लक्ष्मण शामराव साटोटे व २) रामदास शामराव साटोटे यांच्याकडून खरेदी केली आहे. या मालमत्तेची पूर्वीची साखळी खरेदीखते (Chain Deeds) खालीलप्रमाणे आहेत: १) श्रीमती यशोदाबाई साबणे यांच्याकडून श्री.प्रदीप श्रीधर शुक्ल यांनी केलेले खरेदी. २) श्री.प्रदीप श्रीधर शुक्ल यांच्याकडून श्री.नितीन रमेशचंद्र डीडवाणीया व श्री. मनोज मधुसूदन अग्रवाल यांनी केलेले खरेदी. ३)श्री.नितीन रमेशचंद्र डीडवाणीया व श्री. मनोज मधुसूदन अग्रवाल यांच्याकडून राहुल संतोष शर्मा यांनी केलेले खरेदी. ४) राहुल संतोष शर्मा यांच्याकडून लक्ष्मण शामराव साटोटे व रामदास शामराव साटोटे यांनी केलेले खरेदी.

**कारण:-** वरील चारही खरेदीखतांची मूळ प्रत लक्ष्मण शामराव साटोटे व रामदास शामराव साटोटे यांनी माझ्या असीलांना दिली होती. सदर मूळ खरेदीखते दि.२१/०७/२०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजताच्या दरम्यान सुटाळपुरा ते घाटपूरी नाका, खामगाव या दरम्यान कोठेतरी गहाळ झाली आहेत. या संदर्भात शिवाजी नगर पोलीस स्टेशन, खामगाव येथे दि.२१/०८/२०२६ रोजी तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**आवाहन:-** सदर मूळ खरेदीखते कोणास सापडल्यास त्यांनी ती वरील पत्यावर किंवा खालील स्वाक्षरी करणाऱ्यांच्या पत्यावर आणून द्यावीत. तसेच या मालमत्तेवर किंवा गहाळ झालेल्या खरेदी खतांच्या आधारे कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध, गहाण, दान किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही आणि माझे असील पुढील शासकीय कामकाजाची प्रक्रिया पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक:-
पत्ता:- खामगाव
शिक्का
**स्वाक्षरी**
**ॲड.अमित शर्मा**

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 1080



**—: आडवी विधाने :—**

1) मूळ रकमेवर शासनाद्वारे लावला जाणारा अधिकचा कर
4) बक्षीस, पारितोषिक
7) भारतीय क्रिकेट संघातीलं बंगाली टायगर म्हणून प्रसिद्ध झालेला एक भूतपूर्व संघनायक
11) स्त्रियांनी नाकात घालावयाचा एक दागिना
12) त्रिकूट 13) दिवस
14) निष्कपटी, अनलंकृत
15) दागिना, पर्वत
16) ....तो कापूस जसा, त्याने कासवाशी पैज लाविली.....या गीतातील प्राणी
18) ताजा, टवटवीत
20) मिश्र डाळींचा एक खमंग रुचकर पदार्थ
22) वधूवरांनी तांदुळाच्या राशीवरुन सात पावले बरोबर चालण्याचा विधी
24) अनावर आनंदाने होणारा वातविकार
26) मेघ, आकाश
28) दास्यत्व
29) आसक्ती, छंद
31) करुणास्पद रीतीने मागणे
33) लेखणी
36) मनात कपट ठेवून बाहेरुन गोड बोलणारा
38) 26 जानेवारी, प्रजासत्ताक दिन
40) शंभरचा आकडा
41) वडिलोपार्जित मालमत्तेचा हकदार
42) नदी नाल्यांवरील तकलादू पूल
43) काव्य गायन, शिल्प, चित्रलेखन इत्यादी कौशल्याची कामे
44) संगीतातील सताल रचना
47) वेदांचे ज्ञान असणारा, पंडित, ज्ञाता
48) दक्ष, जागरूक
50) गोड, रसाळ
52) प्रसिद्ध समाजसेवी बाबा आमटे यांची कुष्ठ रोग्यांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत एक प्रसिद्ध सामाजिक संस्था
54) दुसऱ्याच्या अधीन असलेले, परतंत्र
57) हरीण, पाचवे नक्षत्र
59) एक पौराणिक आयुध
60) तक्ता, वाफा 61) बळकट
62) कोणत्याही पक्षास न मिळालेला
63) पैसा, संपत्ती 64) पदर
65) साठ मिनिटांचा अवधी
66) स्वतःच्या हाताने लिहिलेले स्वतःचे नाव
67) लढाईत जिवंत धरलेले लोक
69) उत्कृष्ट, अत्युच्च 71) सूर्य
72) सारखे, समान 74) पळणे, मजल
75) सुरेल आणि मधुर कंठ स्वर (हिं)
77) पूजासाहित्यातील एक प्रकारचे गवत
78) तुझे
80) आपल्यातर्फे न्यायालयात बाजू मांडण्यासाठी नेमलेली अधिकृत व्यक्ती
82) ...... धन, सर्वस्व
83) पतिव्रता, साध्वी
84) कल्याणकारक
87) संदिग्ध, अस्पष्ट
88) येणे जाणे
89) शिफारस पत्र
91) राज कपूर, नरगिसचा एक जुना भावनात्मक चित्रपट
92) दिमाख, ऐट, डौल
93) एक सारखे तेच ते बोलणे
94) पोट भरेपर्यंत
95) सोशिक, सहन करणारा

**—: उभी विधाने :—**

1) वरून काटेरी पण आतून गोड व रसाळ असलेले एक फळ
2) चैतन्य, शुद्धी
3) माघ शु सप्तमी
4) मुलगा 5) प्रजा
6) मार्गस्थ
7) पृथ्वीस सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास लागणारा काळ, हा काळ 365 दिवस 6 तास 9 मिनिटे साडेदहा सेकंद इतका असतो
8) स्वीकारलेले व्रत
9) महाभारतात धृतराष्ट्राची पत्नी
10) हत्ती, घोडा, उंट इ. ची विष्ठा
17) सर्प
19) एक उपदिशा
21) उजव्याच्या विरुध्द, वाम
22) मुसलमानांचा नमस्कार
23) एखाद्या धर्माचा विधिपूर्वक नियमांचा स्वीकार
24) वध, ठार मारणे
25) मोठा कालविभाग
26) नवीन
27) उजाडपणामुळे भय वाटण्याजोगे, भयावह
28) एक भूतपूर्व कार्यकारी पंतप्रधान
30) सारखे, तुल्य
32) बेतास बेत
34) टिकाऊ, मजबूत
35) पूजनीय, शून्य
37) एक मराठी महिना
39) दीपक 41) वक्रता
42) सूर्य
44) सर्व बाजूंनी, चोहीकडे
45) दुःख (हिं.) 46) भ्रमर
47) कोटी रूपयांचा स्वामी
49) पूर्वी कधी न घडलेली व नंतर कधी न घडणारी अलौकिक घटना
51) सुवर्णमंदिराकरिता प्रसिद्ध
52) आदरातिथ्य 53) नटात श्रेष्ठ
55) गवळ्यांचे वर्तुळाकार नृत्य
56) दिवसभर उपोषण करुन रात्री भोजन करण्याचे व्रत
58) समुदाय, चमू 64) सहाण
65) उष्णतेचे प्रमाण
67) उजळणीचा एक प्रकार
68) अरण्य
70) जुन्या चित्रपटसृष्टीतील एक प्रतिभावान सुप्रसिद्ध संगीतकार
73) मनातील इच्छा
74) धाव घेणारा, धावणारा
76) मृत, मरण पावलेला
79) भोगवटा, राबता
81) होणारा फार मोठा फायदा
83) सारख्या वजनाचे
85) टिकाव, निभाव 86) धाव (इं.)
88) इंग्रजीतील एक वर्णाक्षर
89) ब्राम्हण, भिक्षुक
90) आशीर्वाद
91) दुःखाचा सुस्कारा (हिं.)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कु | ल | दी | प | क | | सु | धा | र | स | | ज | री | प | ट | का |
| ल | | न | त | म | स्त | क | | सा | र | थी | | म | | व | |
| स्वा | मी | | | कु | | न्या | रा | | ळ | | शं | | ज | का | त |
| मि | | शं | | व | ध | | स्त | | व्या | हि | भो | ज | न | | र्ज |
| नी | | का | लां | त | रा | ने | | र | ज | त | | मा | न | हा | नी |
| | ए | | छ | | त | म | स्वी | | | चिं | त | न | | जि | |
| का | कु | | न | व | ल | | का | ड | वा | त | | त | या | र | |
| म | ल | म | | र्च | | प | र | म | | क | स | | ग | ज | रा |
| ना | ता | ळ | | स्व | ग | त | | ड | क | | ज | प्त | | वा | स |
| | ए | व | ढा | | र | न | | म | ल | म | ल | | तं | बी | |
| नि | क | ट | | का | वा | | कै | | म | म | | क्षे | त्र | | सा |
| पु | | | सा | | र | त | | ए | क | ता | | | ज्ञ | | व |
| त्रि | का | ल | द | र्शी | | | पं | | सा | | धू | र | | अ | ज |
| क | न | क | | | | कु | च | रा | ई | | रं | ग | मं | च | |
| | व | | क | ल्प | त | रू | | क्ष | | म | ध | | ग | ल | का |
| र | सा | त | ळ | | म | | का | स | व | | र | वा | ळ | | म |

uday munde - 8446302691

दैनिक
महाभूमि

# अकोला भूमि

शुक्रवार । ४ सप्टेंबर २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com




## ‘त्या’ दरोड्यातील टोळीचा ४८ तासांत छडा

### घनतेतील आरोपीला हैदराबादेतून अटक

**अकोला / प्रतिनिधी**

मोहता मील परिसरात वृद्ध दाम्पत्याला लोखंडी कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करत २६ लाख ५० हजार रुपयांची रोकड व सोन्याचे दागिने लुटल्याच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या ४८ तासांत छडा लावला. पोलिसांनी मुख्य आरोपी मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा उर्फ राजा उर्फ गंगा याला हैदराबाद येथील लॉजमधून अटक केली. त्याच्याकडून २०८.९३७ ग्रॅम सोन्याचे दागिने व २ लाख २८ हजार १०० रुपयांची रोकड, असा एकूण ३३ लाख ६२ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

३१ ऑगस्ट रोजी सकाळी मोहता मील रोडवरील चिरणिया कम्पाऊंडसमोर राहणारे ६७ वर्षीय विजयकुमार रामकरणदास गुप्ता गोदामात काम करीत असताना काही इसम आत शिरले. त्यांनी गुप्ता व त्यांच्या पत्नीला कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करून हातपाय बांधले. त्यानंतर कपाटातील २२४ ग्रॅम सोन्याचे दागिने व ४ लाख ५० हजार रुपये रोकड घेऊन आरोपी पसार झाले. याप्रकरणी रामदासपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. कारवाई अर्चित चांडक, बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन लेव्हरकर, गोपाल जाधव, अनिल चव्हाण तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली.

**११० पेक्षा अधिक सीसीटीव्ही तपासले**

- पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी तीन पथके तयार केली. पथकांनी ११० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास केला. तपासात चार वर्षांपासून दुकानात काम करणाऱ्या सलीमखान गुलखान याच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याने मोहम्मद रफीक व एका अज्ञात साथीदारासोबत कट रचल्याचेही समोर आले.

## न्यूज ब्रीफ

### ताडी दुकानांचा ई-लिलाव

**अकोला :** जिल्ह्यातील सन २०२६-२७ वर्षासाठी ताडी विक्री दुकानांचा लिलाव ‘ई-लिलाव नि निविदा’ पद्धतीने होणार आहे. संपूर्ण जाहीरनामा महाटेंडर्स डॉट जीओव्ही डॉट इन वर २ ते १६ सप्टेंबरपर्यंत उपलब्ध राहील. इच्छुकांनी २१ सप्टेंबर रोजी याच संकेतस्थळावरून बोली लावावी. अधिक माहितीसाठी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रक्रियेचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत.

### ७ सप्टेंबर रोजी लोकशाही दिन

**अकोला:** जिल्हास्तरीय लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिन जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात तिसऱ्या माळ्यावरील बैठक कक्षात होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे, प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन तहसील स्तरावर होते.

### ‘भटके विमुक्त दिवस’ उत्साहात

**अकोला:** इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या वतीने सामाजिक न्याय विभागाच्या सांस्कृतिक भवनात ‘भटके विमुक्त दिवस’ अत्यंत उत्साही वातावरणात नुकताच साजरा करण्यात आला. भटके विमुक्त समाजाचा इतिहास, संघर्ष आणि सांस्कृतिक वारशाची जाणीव निर्माण करणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन.एस.जी. कमांडो व माजी सैनिक राजेश यमगवळी हे होते.

### ५९,८७७ मालमत्तांमध्ये बांधकाम ; १२,९५८ नवीन मालमत्ता कराच्या कक्षेत

# शहरातील जीआयएस सर्वेक्षणाचा ‘कर’दात्यांना बसणार झटका!

**सुनिल डिडोळकर**

**अकोला :** शहरातील मालमत्ताधारकांसाठी महापालिकेच्या जीआयएस आधारित मालमत्ता सर्वेक्षणाचे परिणाम आता थेट कराच्या पावतीत दिसणार आहेत. शहरातील जवळपास दोन लाख मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, त्यापैकी तब्बल ५९ हजार ८७७ मालमत्तांमध्ये बांधकाम अथवा वापरात बदल आढळून आले आहेत. त्यामुळे संबंधित मालमत्तांची नव्याने कर आकारणी करण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. सर्वेक्षणा दरम्यान जुन्या कर नोंदी आणि मालमत्तेची प्रत्यक्ष स्थिती यामध्ये मोठी तफावत आढळली.

वाढीव बांधकाम, क्षेत्रफळातील वाढ, मंजूर बांधकामापेक्षा अतिरिक्त मजले, निवासी मालमत्तेचा व्यावसायिक वापर तसेच जुन्या नोंदीत नसलेल्या मालमत्ता निदर्शनास आल्या आहेत. अमरावती येथील स्थापत्य कंपनीमार्फत हे सर्वेक्षण करण्यात येत असून, मालमत्तांचे जीआयएस टॅगिंग व जिओ सिक्वेन्सिंग केले जात आहे. दरम्यान, जुन्या मनपा नोंदीत नसलेल्या १२ हजार ९५८ नवीन मालमत्ता सर्वेक्षणात आढळल्या आहेत. त्यांची नोंद कर विभागाकडे झाल्यानंतर नियमानुसार कर आकारणी केली जाणार आहे.



**सहा वर्षांचा कर एकरकमी**

- वाढीव बांधकाम अथवा वापरातील बदलाची नोंद जुन्या कर आकारणीत नसल्यास केवळ चालू वर्षापासूनच वाढीव कर आकारला जाणार नाही. नियमांनुसार मागील सहा वर्षांचा कर एकत्रितपणे आकारण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. त्यामुळे जुन्या कर आकारणीवर कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर एकरकमी आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे.

**सर्वेक्षणातील महत्त्वाचे आकडे**

- ५९,८७७ बांधकाम अथवा वापरात बदल
- १२,९५८ जुन्या नोंदीत नसलेल्या मालमत्ता
- २ लाखांच्या आसपास पूर्ण झालेले सर्वेक्षण
- ६ वर्षे मागील कर आकारणीचा संभाव्य कालावधी

> वाढीव बांधकाम, अतिरिक्त मजले किंवा वापरातील बदल आढळलेल्या मालमत्तांवर नियमानुसार सुधारित कर आकारला जाईल. वाढीव बांधकामाची नोंद जुन्या कर आकारणीत नसल्यास मागील कालावधीतील कराचीही वसूली केली जाणार आहे.
>
> – **विजय पारतवार,** उपायुक्त, मनपा, अकोला

> मनपा मधील भाजपा प्रणीत सत्ताधारी पक्ष शहराला शून्य टक्के विकास व शंभर टक्के करवाढ या पध्दतीने करीत आहे. जी आय एस द्वारे मालमत्ता सर्वेक्षण केल्यानंतर मनपा वाढीव बांधकाम मालमत्ता धारकांकडून सहा वर्षाचा एकत्रित कर वसूल करण्याचा विचार करीत आहे. हे अन्यायकारक असून यावर मनपा कर विभागाने पुनर्विचार करावा.
>
> – **डॉ. जिशान हुसेन,** विरोधी पक्षनेता, मनपा, अकोला

## सेंट्रल बँकेत ७१५ ग्रॅम सोन्याची अफरातफर

**अकोला / प्रतिनिधी**

शहरातील महात्मा गांधी रोडवरील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या गांधी रोड शाखेतील लॉकरमध्ये ठेवलेले ७१५.०४४ ग्रॅम सोन्याचे दागिने गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या सोन्याची किंमत १ कोटी ७ लाख २५ हजार ६६० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी बँकेच्या कंत्राटी तत्त्वावर क्लिनर पदावर कार्यरत असलेल्या वैभव धनराज कोल्हे (वय २९, रा. बोरगाव खुर्द, अकोला) याच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.बँकेतील सोन्याची अफरातफर झाल्याचे लक्षात येताच गांधी रोड शाखेचे क्षेत्रिय प्रमुख पंकज कमला प्रसाद यांनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनुसार, बँकेत कंत्राटी तत्त्वावर क्लिनर म्हणून कार्यरत असलेल्या वैभव कोल्हे याने बँकेतील सोन्याची अफरातफर केली. पोलिसांनी संबंधित खासगी फायनान्स बँकेसोबत याबाबत पत्रव्यवहार केला.




**आरोपीने दिली कबुली**

- उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी वैभव कोल्हे याला अटक करून त्याची प्राथमिक चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याने बँकेतील सुमारे ७१५ ग्रॅम सोने, अंदाजे १ कोटी ७ लाख २५ हजार रुपये किमतीचे, खासगी फायनान्स बँकेकडे गहाण ठेवून पैसे घेतल्याची कबुली दिली.

### विद्युत रोषणाईने उजळले श्रीकृष्ण मंदिर





**अकोट :** गोकुळ जन्माष्टमीनिमित्त दर्यापूर रोडवरील श्रीकृष्ण मंदिर विद्युत रोषणाईने उजळून निघाले असून, रंगीबेरंगी रोषणाईने मंदिर परिसराचे रूप अधिकच खुलले आहे. ही आकर्षक विद्युत सजावट परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. **( छाया : अक्षय पाटील, अकोट प्रतिनिधी)**

## महसूल पथकाच्या वाहनाला धडक ; आरोपीला अटक

### माना पोलिसांची कारवाई ; तीन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार

**माना / प्रतिनिधी**

अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाच्या शासकीय वाहनाला धडक देऊन घटनास्थळावरून फरार झालेल्या सराईत वाळू तस्कराला माना पोलिसांनी वाहनासह अटक केली. ही घटना १ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे १२.३० वाजता लोणसना परिसरात घडली.

तहसील कार्यालय, मूर्तीजापूर येथील महसूल पथक अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरुद्ध गस्त घालत असताना टाटा ४०७ मधून वाळू वाहतूक करताना नयन महल्ले (रा. कोळसरा) आढळून आला. पथकाने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या शासकीय वाहनाला धडक दिली आणि वाहनासह पसार झाला. यात शासकीय वाहनाचे नुकसान झाले असून ट्रकमध्ये अंदाजे १ ब्रास वाळू, किंमत सुमारे ६ हजार रुपये, असल्याचे तक्रारीत नमूद आहे. महसूल अधिकारी श्रीमती रेणुका अरविंद उंबरकर यांच्या तक्रारीवरून माना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तातडीने तपास करून नयन महल्लेला अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेडडी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गणेश नावकार, मनोहर इंगळे व सुशील आठवले यांनी केली.



**तीन जिल्ह्यांतून तडीपार**

- नयन महल्ले हा अवैध वाळू चोरी व वाहतुकीच्या प्रकारांत सक्रिय असल्याने माना पोलिसांनी यापूर्वीच त्याच्याविरुद्ध तडीपार प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी, मूर्तीजापूर यांनी त्याला अकोला, अमरावती व वाशिम या तीन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

### कावड - पालखी मंडळांना क्रमांकांचे वितरण सुरु

**अकोला / प्रतिनिधी**

अंतिम श्रावण सोमवारी शहरात होणाऱ्या कावड पालखी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालखी मंडळांना बुधवार, २ सप्टेंबरपासून क्रमांक वितरण सुरू करण्यात आले आहे. राज राजेश्वर शिवभक्त मंडळ, जुने शहर, अकोला येथे नोंदणी असलेल्या पालखी मंडळांना पालखी क्रमांक वितरित केले जाणार आहेत.

पालखी क्रमांकाचे वितरण दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत करण्यात येणार आहे. क्रमांक घेताना संबंधित पालखी मंडळांनी जुना पालखी क्रमांक सोबत आणणे अनिवार्य आहे.

## धनुर्विद्या स्पर्धेत सानिध्य हनवतेचे यश

### पहिल्या चार स्पर्धकांमध्ये स्थान ; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**अकोला / प्रतिनिधी**

महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट अकोला द्वारा संचालित नॅशनल मिलिटरी स्कूल अँड जुनिअर कॉलेज ऑफ सायंस, अकोला (गायगाव) येथील विद्यार्थी सानिध्य हनवते याने अकोला येथे झालेल्या जुनिअर राज्यस्तरीय धनुर्विद्या चाचणी स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत पहिल्या चार स्पर्धकांमध्ये स्थान मिळविले. या कामगिरीच्या जोरावर त्याने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.

या स्पर्धेत अकोला जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शाळेचे धनुर्विद्या प्रशिक्षक मनोज पायघन यांच्या मार्गदर्शनाखाली सानिध्यने हे यश मिळविले. त्याच्या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. सानिध्यच्या या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री सुधाकराव गणगणे, सचिव सुरेखाताई गणगणे, व्यवस्थापकीय संचालक महेशजी गणगणे, संचालिका मुक्ताताई गणगणे, प्राचार्या संगीता बघेले (सिसोदिया), पर्यवेक्षक किशोर पवार, क्रीडा विभाग प्रमुख दीपक शिरसाट, राहुल पुरी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सैनिकी अधिकारी व क्रीडा प्रशिक्षक यांनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले, अशी माहिती सुमेघ वानरे यांनी दिली.



### ‘टेक्नोब्लिट्झ २के’मध्ये विविध तांत्रिक स्पर्धा ; संशोधकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# श्री शिवाजी अभियांत्रिकीमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**अकोला / प्रतिनिधी**

श्री शिवाजी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयातील संगणक विभागातर्फे १ व २ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय परिषद ‘आयसीसीसीएसएस’ तसेच ‘टेक्नोब्लिट्झ २के’ या तांत्रिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय परिषदेत देश-विदेशातील संशोधकांनी प्रत्यक्ष तसेच आभासी पद्धतीने आपले संशोधन सादर केले.

यातील निवडक संशोधनाला ‘स्कोपस इंडेक्स’ या संशोधन पत्रिकेत स्थान देण्यात येणार आहे. ‘टेक्नोब्लिट्झ २के’मध्ये ‘गुगलर’, ‘कोएटाज गॉट लेटंट’, ‘ब्लाइंड रेसिंग’, ‘पेपर प्रेझेंटेशन’ आणि ‘कोड क्वेस्ट’ यांसह विविध तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य सुरेशजी खोटरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ए. एल. कुलट, व्ही. पी. ठोकळ, डॉ. एस. एम. खेरडे, डॉ. एस. आर. काळपांडे, प्रा. एन. एन. कासट, डॉ. पी. एस. वटाणे, डॉ. के. एन. खांडेकर, डॉ. आर. एन. काळे, रामेश्वरजी वाकोडे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. थोरात, संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एल. सातारकर आणि समन्वयक डॉ. सचिन अग्रवाल उपस्थित होते. डॉ. सचिन अग्रवाल यांनी प्रस्तावना केली, तर डॉ. सातारकर यांनी विभागातील उपक्रमांचा आणि डॉ. पी. व्ही. थोरात यांनी महाविद्यालयातील उपक्रमांचा आढावा सादर केला.

सुरेशजी खोटरे यांनी आयोजन चमूचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. श्री शिवाजी शिक्षण संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, सर्व कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य तसेच प्राचार्य डॉ. पी. व्ही. थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा. शर्वरी दीक्षित यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संगणक विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



**प्रा. गजानन भारसाकळे यांचा सत्कार**

- संशोधन कार्याबद्दल प्रा. गजानन भारसाकळे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ‘सूर नवा ध्यास नवा’ फेम गोपाल गावंडे यांनी गायन सादर करून ‘कोएटाज गॉट लेटंट’ कार्यक्रमाची शोभा वाढविली.

**विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण**

- समारोपप्रसंगी कार्यक्रमाचे प्रायोजक गणेश देशमुख, हरसिम्रन बिंद्रा आणि निलेश बजाज यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. राजहंस सेलिब्रेशन, विस्टेरिया अकादमी, हुशे ज्वेलर्स, दास मोबाईल्स आणि छगनलाल शू सेंटर यांच्याकडूनही प्रायोजकत्व लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

## एसआयआरनंतर जिल्ह्यात १ हजार ७४० मतदान केंद्रे

**अकोला / प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित घोषित केलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमात मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणाचाही समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार अकोला जिल्ह्यातील मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणानंतर एकूण १ हजार ७४० मतदान केंद्रे राहणार आहेत.

अकोला जिल्ह्याच्या मतदान केंद्र सुसूत्रीकरण प्रस्तावाला भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ३२-मुर्तिजापूर (अजा) विधानसभा मतदारसंघातील शेलू बाजार येथील एकाच इमारतीतील दोन मतदान केंद्रांपैकी मतदान केंद्र क्रमांक २१ हे क्रमांक २० मध्ये पूर्णपणे समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यात एक मतदान केंद्र कमी झाले आहे. याबाबत १७ ऑगस्ट रोजी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांची बैठक घेऊन माहिती देण्यात आली होती. जिल्ह्यातील १,७४० मतदान केंद्रांची अद्ययावत यादी मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक नोंदणी अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती, अकोला महानगरपालिका, नगर परिषद व नगर पंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवर तसेच अकोला डॉट जीओव्ही डॉट इन या शासकीय संकेतस्थळावरील विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) टॅबवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# ग्लॅम वर्ल्ड




## आमिर 'रेस'मध्ये

बॉलीवूडच्या पडद्यावर 'रेस' नाव येतं, तेव्हा डोळ्यांसमोर येतात वेगवान गाड्या, धक्कादायक ट्विस्ट, फसवाफसवी आणि शेवटच्या क्षणी बदलणारा खेळ! आता याच लोकप्रिय ॲक्शन-थ्रिलर फ्रँचायझीला नव्या रूपात आणण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे या नव्या पर्वात आमिर खान, सिद्धार्थ मल्होत्रा आणि टायगर श्रॉफ हे तीन दिग्गज कलाकार पहिल्यांदाच एकत्र दिसण्याची शक्यता आहे. 'रेस रिबूट' या नावाने चर्चेत असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन विजय कृष्ण आचार्य करणार असल्याचे वृत्त आहे. 'रेस'च्या पहिल्या दोन चित्रपटांमध्ये सैफ अली खानने प्रेक्षकांना वेगळ्याच थराराची सफर घडवली होती, तर तिसऱ्या भागात सलमान खान दिसला. आता मात्र निर्माते जुन्या कथानकाला पुढे नेण्याऐवजी संपूर्ण फ्रँचायझीलाच नवा चेहरा देण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे.

या चर्चेतील सर्वात मोठं नाव अर्थातच आमिर खानचं! मिळालेल्या माहितीनुसार, आमिरला चित्रपटाची कथा पसंत पडली असून तो केवळ अभिनय करण्यापुरता या प्रकल्पाशी जोडला जाणार नाही, तर पटकथेच्या विकासातही सक्रीय सहभाग घेत असल्याचे सांगितले जाते. आमि रच्या बाबतीत पटकथेला असलेले महत्त्व पाहता ही बाब विशेष लक्षवेधी ठरते. दुसरीकडे सिद्धार्थ मल्होत्रा याचे नाव या प्रकल्पाशी आधीपासून जोडले जात आहे, तर ॲक्शन आणि स्टंट्ससाठी ओळखला जाणारा टायगर श्रॉफही या टीममध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एका बाजूला आमिरचा अभिनयाचा अनुभव, दुसरीकडे सिद्धार्थचा स्टायलिश अंदाज आणि तिसरीकडे टायगरचा धडाकेबाज ॲक्शन अवतार, अशी भन्नाट जुगलबंदी पडद्यावर पाहायला मिळू शकते. मात्र या कलाकारांची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. त्यामुळे सध्या या बातमीकडे 'रिपोर्ट' म्हणूनच पाहावे लागणार आहे.

'रेस रीबूट'बाबत आणखी एक उत्सुकता म्हणजे हा चित्रपट भारतीय प्रेक्षकांनी यापूर्वी पाहिलेल्या थ्रिलरपेक्षा वेगळा करण्याचा निर्मात्यांचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे. विजय कृष्ण आचार्य आणि आमिर खान यांची यापूर्वी 'धूम ३' आणि 'ठग्स ऑफ हिंदोस्तान'मध्ये जोडी जमली होती. आता या दोघांची ॲक्शन-थ्रिलरमधील तिसरी साथ रंगली, तर त्यात सिद्धार्थ आणि टायगरची भर पडणार आहे. ■

# करीनाचा पोलिसी अवतार



करीना कपूरचा पडद्यावरचा अंदाज म्हटला की ग्लॅमर, रोमँटिक भूमिका किंवा कौटुंबिक कथा डोळ्यांसमोर येतात. मात्र यावेळी करीना चक्क पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे आणि तिचा हा अंदाज प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा ठरत आहे. मेघना गुलजार दिग्दर्शित 'दायरा' या आगामी क्राइम ड्रामाचे नवे पोस्टर नुकतेच समोर आले असून त्यात करीना आणि पृथ्वीराज सुकुमारन दोघेही डीसीपीच्या भूमिकेत दिसत आहेत. विशेष म्हणजे दोघांचे स्वतंत्र पोस्टर प्रदर्शित करण्यात आले असून करीना पोस्टरमध्ये अत्यंत गंभीर आणि इंटेन्स लूकमध्ये दिसते. चेहऱ्यावर कोणताही ग्लॅमरचा आव न ठेवता तपास अधिकाऱ्याची कडक नजर आणि जबाबदारीचा भार तिच्या व्यक्तिमत्त्वातून जाणवतो. त्यामुळे 'दायरा'मध्ये करीना नेमकी कोणत्या प्रकारची पोलिस अधिकारी साकारणार, याची उत्सुकता आता वाढली आहे.

'दायरा' ही मेघना गुलजार यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणारी क्राइम ड्रामा असल्याने चित्रपटाच्या कथेबाबत सुरुवातीपासूनच उत्सुकता आहे. नव्या पोस्टरमुळे या उत्सुकतेला आणखी धार मिळाली आहे. करीना कपूर आणि पृथ्वीराज सुकुमारन हे दोघेही डीसीपीच्या भूमिकेत असल्याने पडद्यावर दोन दमदार अधिकाऱ्यांची टक्कर पाहायला मिळणार का, की दोघे एखाद्या गुंतागुंतीच्या गुन्ह्याचा तपास एकत्र करणार, हा प्रश्न सध्या चाहत्यांना पडला आहे. मेघना गुलजार यांच्या चित्रपटांमध्ये कथा, व्यक्तिरेखा आणि वास्तववादी मांडणीला विशेष महत्त्व असते. त्यामुळे 'दायरा'मध्येही केवळ पोलिसांची धावपळ आणि गुन्हेगाराचा पाठलाग एवढाच थरार नसेल, तर गुन्ह्याच्या मागची माणसं आणि त्यामागचे भावविश्वही महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. करीना आणि पृथ्वीराजसारख्या दोन वेगळ्या शैलीच्या कलाकारांची जोडी या कथेला आणखी वजन देऊ शकते.

नव्या पोस्टरमध्ये करीना ज्या आत्मविश्वासाने डीसीपीच्या रूपात उभी आहे, ते पाहता तिच्या भूमिकेत काहीतरी खास दडलेले असल्याचे संकेत मिळतात. दुसरीकडे पृथ्वीराजचाही गंभीर आणि कडक अधिकारी म्हणून लूक लक्ष वेधून घेतो. त्यामुळे चित्रपटातील तपास, रहस्य आणि नात्यांची गुंतागुंत नेमकी कशी उलगडणार, याची उत्सुकता कायम आहे. 'दायरा' पुढील महिन्यात चित्रपटगृहात दाखल होणार असल्याचे वृत्त आहे. रिलीजची तारीख आणि कथेबाबतची अधिक माहिती समोर आल्यानंतर या चित्रपटाभोवतीचे गूढ आणखी वाढण्याची शक्यता आहे. आत्तासाठी मात्र करीना कपूरचा हा नवा पोलिसी अवतारच चर्चेचा विषय ठरला आहे. ग्लॅमरची राणी हातात कायद्याची सूत्रे घेते, तेव्हा पडद्यावरचा 'दायरा' किती थरारक ठरतो, हे पाहणे नक्कीच रंजक ठरणार आहे. ■



# दोन कोटींच्या चित्रपटाचा 'चमत्कार'

मोठे बजेट, प्रसिद्ध कलाकार आणि जोरदार जाहिरात हे चित्रपटाच्या यशाचे महत्त्वाचे घटक मानले जातात. मात्र, 'हनुमान अंश' या छोट्या बजेटच्या चित्रपटाने ही समीकरणे काही अंशी बदलून दाखवली आहेत. अवघ्या दोन कोटी रुपयांच्या खर्चात तयार झालेल्या या चित्रपटाला सुरुवातीला प्रेक्षकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पहिल्या दोन आठवड्यांमध्ये त्याचे अनेक शो कमी करण्यात आले होते. चित्रपटगृहातून तो लवकरच हटवला जाईल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्यानंतर समाजमाध्यमांवर चित्रपटाची चर्चा वाढली आणि प्रेक्षकांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिक्रियेमुळे चित्रपटाच्या कमाईला अचानक वेग आला. नीम करोली बाबा यांच्या जीवन आणि आध्यात्मिक प्रवासापासून प्रेरणा घेतलेल्या या चित्रपटाने अखेर १८ कोटी रुपयांहून अधिक कमाई केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे कमी खर्चात तयार झालेल्या चित्रपटासाठी ही कामगिरी विशेष ठरली आहे.

'हनुमान अंश'ची सुरुवात मात्र फारशी प्रभावी नव्हती. पहिल्या दिवशी चित्रपटाने सुमारे १० लाख रुपयांची कमाई केली. पहिल्या आठवड्यात हा आकडा अंदाजे १.०८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला, तर दुसऱ्या आठवड्यात केवळ ४० लाख रुपयांची भर पडली. पहिल्या १४ दिवसांमध्ये चित्रपटाची कमाई सुमारे दीड कोटी रुपयेच झाली होती. त्यामुळे अनेक ठिकाणी त्याचे शो मर्यादित करण्यात आले. मोठ्या चित्रपटांना अधिक स्क्रीन्स देण्याच्या स्पर्धेत या चित्रपटाला अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, तिसऱ्या आठवड्यात परिस्थिती पूर्णपणे बदलली. चित्रपट पाहिलेल्या प्रेक्षकांनी समाजमाध्यमांवर त्याचे कौतुक करण्यास सुरुवात केली. विशेषतः चित्रपटाचा आध्यात्मिक विषय आणि कथा यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली. या 'वर्ड ऑफ माऊथ'चा थेट परिणाम चित्रपटाच्या कमाईवर झाला. तिसऱ्या आठवड्यात चित्रपटाने तब्बल १०.४० कोटी रुपयांची कमाई केली. त्यातील २२ व्या दिवशीची सुमारे ६.५० कोटी रुपयांची कमाई विशेष चर्चेची ठरली. चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल चतुर्वेदी यांनी केले असून शोभिनव सत्या यांनी नीम करोली बाबा यांची भूमिका साकारली आहे. मोठ्या जाहिरातीसाठी निर्मात्यांकडे पुरेसा निधी नसल्याने त्यांनी वेगळ्या पद्धतीने चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. नीम करोली बाबा यांच्या संदेशाशी संबंधित आठ भंडाऱ्यांचे आयोजन करून चित्रपटाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यात आली. त्यानंतर समाजमाध्यमांवरील चर्चेमुळे चित्रपटाला नवी ओळख मिळाली. सुमारे १.८ ते २ कोटी रुपयांच्या निर्मिती खर्चाच्या तुलनेत १८.३८ कोटी रुपयांची कमाई झाल्याने खर्चाच्या तुलनेत सुमारे ८१९ टक्के परतावा मिळाल्याचे सांगितले जात आहे. अर्थात, बॉक्स ऑफिसवरील एकूण कमाई आणि निर्मात्यांचा प्रत्यक्ष नफा हे वेगवेगळे आकडे असू शकतात. ■



# मराठी 'करोडपती'च्या हॉटसीटवर 'धक धक गर्ल'

बॉलिवूडची धकधक गर्ल माधुरी दीक्षित आता पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. 'कौन बनेगा करोडपती'च्या 'कोण होणार करोडपती' या मराठी आवृत्तीच्या आठव्या पर्वाची सूत्रे माधुरीच्या हातात असणार आहेत. तब्बल २४ वर्षांनंतर ती टीव्हीवर सूत्रसंचालक म्हणून परतत असल्याने तिच्या चाहत्यांसाठी ही बातमी खास ठरली आहे. या कार्यक्रमाचा प्रोमोही समोर आला असून त्यात माधुरी पारंपरिक हिरव्या साडीत दिसत आहे. त्यामुळे 'कंप्युटरजी, लॉक करा उत्तर!' म्हणताना माधुरीचा अंदाज कसा असेल, याची उत्सुकता वाढली आहे. आतापर्यंत या कार्यक्रमाची सूत्रे सचिन खेडेकर, स्वप्नील जोशी आणि नागराज मंजुळे यांसारख्या कलाकारांनी सांभाळली आहेत. आता या यादीत माधुरीचे नाव जोडले जाणार आहे. अभिनय, नृत्य आणि ग्लॅमरनंतर प्रश्नमंजुषेच्या मंचावर माधुरीची सहज, मिश्कील शैली पाहायला मिळणार असल्याने कार्यक्रमाला वेगळीच रंगत येण्याची शक्यता आहे.

माधुरीच्या या नव्या भूमिकेबरोबरच तिच्या मानधनाचीही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विविध माध्यमांतील वृत्तांनुसार, माधुरी एका रिॲलिटी शोच्या संपूर्ण पर्वासाठी तब्बल २४ ते २५ कोटी रुपये मानधन घेत असल्याचे सांगितले जाते. 'कोण होणार करोडपती'साठीही ती एवढेच मानधन घेणार असल्याचा दावा काही अहवालांमध्ये करण्यात आला आहे. मात्र याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे ही रक्कम सध्या केवळ वृत्तांवर आधारित आहे. पण या चर्चेला आणखी रंग येतो तो अमिताभ बच्चन यांच्या मानधनाच्या तुलनेमुळे. 'कौन बनेगा करोडपती'शी अमिताभ बच्चन यांचे नाते तब्बल अडीच दशकांचे आहे आणि त्यांच्या सूत्रसंचालनामुळे या कार्यक्रमाला वेगळी ओळख मिळाली आहे. काही अहवालांमध्ये अमिताभ यांना एका आठवड्यासाठी सुमारे २५ कोटी रुपये मानधन मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. म्हणजे पाच दिवसांच्या कार्यक्रमासाठी एवढी रक्कम आणि दुसरीकडे संपूर्ण पर्वासाठी माधुरीच्या मानधनाची चर्चा- यामुळे 'फीस'चा हा किस्साही चांगलाच फिल्मी झाला आहे.

मात्र पैशांपेक्षा माधुरीला या कार्यक्रमाकडे खेचणारी गोष्ट वेगळी आहे. स्पर्धकांच्या आयुष्यातील कथा, त्यांची स्वप्ने, संघर्ष आणि आनंदाचे क्षण यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी तिला मिळणार आहे. अभिनयात कलाकार एखाद्या व्यक्तिरेखेत शिरतो; पण सूत्रसंचालन करताना माधुरीला स्वतःच्या स्वभावात राहून प्रेक्षकांशी संवाद साधता येणार आहे. त्यामुळे तिचा उत्स्फूर्त आणि मनमोकळा अंदाज या पर्वाचे मोठे आकर्षण ठरू शकतो. एका बाजूला कठीण प्रश्न, दुसरीकडे मोठ्या रकमेचा खेळ आणि मध्ये माधुरीची खुसखुशीत गप्पा-असा हा कार्यक्रमाचा फॉर्म्युला दिसतो आहे. त्यामुळे 'कोण होणार करोडपती'च्या हॉटसीटवर बसलेल्या स्पर्धकाला प्रश्नाचे उत्तर सुचेल की नाही, हे सांगता येणार नाही; पण माधुरीच्या या नव्या टीव्ही इनिंगने प्रेक्षकांच्या उत्सुकतेचा 'लॉक' मात्र आधीच झाला आहे! ■



# 'बंदर'ची पुन्हा चर्चा!

बॉबी देओलच्या कारकिर्दीची दुसरी इनिंग सध्या चांगलीच रंगात आली आहे. वेगवेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिका स्वीकारत प्रेक्षकांना आश्चर्यचकित करणाऱ्या बॉबीचा 'बंदर : मंकी इन अ केज' हा क्राइम थ्रिलर आता पुन्हा चर्चेत आला आहे. अनुराग कश्यप दिग्दर्शित हा चित्रपट ५ जूनला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला होता. त्यानंतर २८ ऑगस्टला ओटीटीवर दाखल होताच सोशल मीडियावर त्याच्या कथेची चर्चा सुरू झाली. चित्रपटाची कथा समर नावाच्या ५० वर्षांच्या कलाकाराभोवती फिरते. एकेकाळी मालिकांमुळे घराघरात ओळखला जाणारा समर आता स्टारडम हरवलेला अभिनेता आहे. काम कमी झाल्याने लग्नसमारंभात गाण्याची वेळ त्याच्यावर येते. आयुष्य आधीच काहीसे विस्कटलेले असताना अचानक पोलिस त्याला अटक करतात. कारण? त्याच्या मैत्रिणीने त्याच्यावर बलात्काराचा आरोप केलेला असतो! एका क्षणात समरच्या आयुष्याचीच 'रेस' बदलते आणि स्वतःला निर्दोष सिद्ध करण्यासाठी त्याची धडपड सुरू होते.

समर आणि त्याची मैत्रीण डेटिंग ॲपच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आलेले असतात. नातं बिघडल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर जाते आणि समरवर गंभीर आरोप होतो. विशेष म्हणजे या कथेत नायकाला सरळसोट 'हिरो' म्हणून दाखवलेले नाही. त्याच्या भूतकाळातील चुका, नात्यातील बेफिकिरी आणि स्वतःच्या वागण्याबाबतची अनिश्चितता यामुळे प्रेक्षकांनाही सतत प्रश्न पडत राहतो की नेमकं खरं काय? समरला मदत करण्यासाठी त्याची बहीण सुहानी मेहरा पुढे येते आणि कायदेशीर लढाई सुरू होते. मात्र खरी परीक्षा तुरुंगात सुरू होते. शारीरिक त्रासाबरोबरच मानसिक छळ, कैद्यांमधील गटबाजी आणि तुरुंगातील कठोर वास्तव समरला अक्षरशः आतून हादरवून सोडते. चित्रपटाच्या माध्यमातून 'मी टू' चळवळ, खोट्या आरोपांवरील चर्चा आणि पुरुषांच्या वेदनांकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन मांडला जातो. त्यामुळे 'बंदर' ही केवळ गुन्ह्याची कथा न राहता नातेसंबंध, आरोप आणि त्यातून उद्ध्वस्त होणाऱ्या आयुष्याची गुंतागुंतीची गोष्ट बनते.

बॉबी देओलनेही या भूमिकेबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केले. अभिनेता म्हणून वेगवेगळ्या छटा असलेल्या व्यक्तिरेखा साकारण्याची इच्छा असल्याचे त्याने सांगितले. 'बंदर'सारखी भूमिका मिळणे हे भाग्याचे असल्याचेही त्याने नमूद केले. ■

# 'तरूण तुर्कां'चा जादुई जलवा



वयाची साठी ओलांडल्यानंतर अनेक कलाकार अभिनयापासून दूर जातात; मात्र दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील काही सुपरस्टार्ससाठी वय हा केवळ आकडा ठरला आहे. येत्या काही महिन्यांमध्ये ६५ वर्षांहून अधिक वयाचे रजनीकांत, नागार्जुन आणि चिरंजीवी आपल्या बहुप्रतीक्षित चित्रपटांसह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. विशेष म्हणजे तिघांच्याही चित्रपटांकडून मोठ्या बॉक्स ऑफिस कमाईची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे तरुण कलाकारांची मोठी फौज असतानाही या ज्येष्ठ सुपरस्टार्सची लोकप्रियता अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. सध्या ७५ वर्षांचे असलेले रजनीकांत 'जेलर २'मधून पुन्हा एकदा ॲक्शनच्या दुनियेत उतरणार आहेत. नेल्सन दिलीपकुमार दिग्दर्शित हा चित्रपट 'जेलर'चा पुढचा भाग आहे. पहिल्या चित्रपटाला मिळालेला प्रतिसाद पाहता दुसऱ्या भागाबाबतही चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. हा चित्रपट १५ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होण्याची माहिती आहे.

सुमारे ३०० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये हा चित्रपट तयार होत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे दसऱ्याच्या सुट्टीत रजनीकांत यांचा 'जेलर २' बॉक्स ऑफिसवर किती मोठी कमाई करतो, याकडे चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

रजनीकांत यांच्यानंतर ६७ वर्षांचे नागार्जुनही याच वर्षी मोठ्या पडद्यावर महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. २९ ऑगस्ट रोजी वाढदिवस साजरा करणाऱ्या नागार्जुन यांच्या १००व्या चित्रपटाचे शीर्षक 'किंग १००' असे जाहीर करण्यात आले आहे. ■

# विशाल मिश्राचा पूरग्रस्तांना मदतीचा हात



गायक आणि संगीतकार विशाल मिश्रा यांनी पूरग्रस्त नेपाळ आणि आसाममधील नागरिकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. 'टॉक्सिक' या चित्रपटातील गाण्यांमुळे चर्चेत असलेल्या विशाल यांनी मदतीसाठी नेपाळ आणि आसाममध्ये विशेष संगीत कार्यक्रम घेण्याची घोषणा केली आहे. या कार्यक्रमांतून मिळणारी संपूर्ण रक्कम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली असून अनेक कुटुंबांवर विस्थापित होण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक कलाकार मदतीसाठी पुढे येत असताना विशाल मिश्रा यांनीही आपला वाटा उचलण्याचा निर्णय घेतला आहे. संगीताच्या माध्यमातून निधी उभारून तो थेट आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी वापरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. विशाल मिश्रा यांनी समाजमाध्यमावर आपल्या भावना व्यक्त करताना, नेपाळ आणि आसाममध्ये प्रत्येकी एक संगीत कार्यक्रम आयोजित करण्याचे जाहीर केले. या दोन्ही कार्यक्रमांतून मिळणारा प्रत्येक पैसा पूर निवारण आणि बाधित नागरिकांच्या मदतीसाठी दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. 'जे काही माझ्याकडून शक्य आहे, ते मी करेन,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या घोषणेनंतर चाहत्यांकडून सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. कलाकार केवळ मनोरंजनाच्या क्षेत्रापुरते मर्यादित न राहता नैसर्गिक आपत्तीच्या काळात समाजासाठी उभे राहू शकतात, याचे हे उदाहरण मानले जात आहे. ■

दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

शुक्रवार । ४ सप्टेंबर २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

न्यूज ब्रीफ

### शिक्षकांच्या तक्रारींवर चौकशीची मागणी

**वाशिम :** जिल्ह्यातील १८ शिक्षक संघटनांनी प्रभारी उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत केलेल्या तक्रारी व आरोपांची तातडीने, वस्तुनिष्ठ आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी उद्धवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांना २ सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले. जिल्हाप्रमुख बालाजी पाटील वानखेडे, उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर, अर्जुन पाटील सुर्वे यांच्यासह आदींनी सीईओंची भेट घेऊन याबाबत चर्चा केली.

### मंगरुळपीरमध्ये आज भजन संध्या

**मंगरुळपीर :** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त मंगरुळपीर शहरातील संभाजी नगर, बायपास रोड परिसरात शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी रात्री ८ ते १२ वाजेपर्यंत भक्तीमय भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर येथील भजन गायक उज्ज्वल खाकोलिया भजने सादर करणार आहेत. भाविकांनी परिवारासह उपस्थित राहण्याचे आवाहन विनोद परळीकर, प्रमोद परळीकर, राम परळीकर, कृष्णा परळीकर व हरि परळीकर यांनी केले आहे.

### खात्यात आलेले पाच लाख केले परत

**रिसोड:** बुलढाणा अर्बन पतसंस्थेच्या बुलढाणा मुख्य शाखेतून तांत्रिक अडचणीमुळे मुकेश मधुकर वसमतकर यांच्या खात्यात चुकून पाच लाख रुपये जमा झाले. ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ बँकेत जाऊन रक्कम आपली नसल्याचे सांगत ती परत केली. व्यवस्थापक गोपाळ बाळदी व विभागीय व्यवस्थापक अमोल शिंदे यांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून रक्कम संबंधित खात्यात जमा केली. कोणताही हक्क न सांगता चुकून खात्यात आलेली रक्कम तत्काळ परत करून वसमतकर यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला.

## १२५ दिवसांच्या वैधानिक रोजगार हमीसाठी मानकाधारित निधीचे वाटप

# रोजगार मागाल, काम मिळणार ; जिल्ह्याला १६२ कोटींचा निधी

वाशिम / प्रतिनिधी



ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची वैधानिक हमी देण्यासाठी राज्य शासनाने वाशिम जिल्ह्यासाठी १६२ कोटी ३० लाख ७९ हजार रुपयांचा मानकाधारित निधी निश्चित केला आहे. 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) (व्ही. बी.-जी राम जी)' योजनेंतर्गत सन २०२६-२७ मध्ये १२५ दिवसांपर्यंतच्या अकुशल रोजगाराच्या वैधानिक हमीसाठी हा निधी उपलब्ध होणार आहे.

राज्य शासनाच्या १ सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार, केंद्र शासनाने १२५ दिवसांच्या वैधानिक रोजगार हमीसाठी राज्याला ४ हजार ४२०.३२ कोटी रुपयांचा मानकाधारित निधी निश्चित केला आहे. त्यात राज्याच्या समरूप हिस्स्याची २ हजार ९४७ कोटी रुपये रक्कम धरून राज्यासाठी एकूण ७ हजार ३६७.३२ कोटी रुपयांचा निधी निश्चित करण्यात आला आहे. या निधीचे जिल्हानिहाय वाटप सन २०२५-२६ मधील मनुष्यदिवस निर्मितीचा आधार घेऊन करण्यात आले आहे. त्यानुसार वाशिम जिल्ह्यात २०२५-२६ मध्ये ३६.६५ लाख मनुष्यदिवसांची निर्मिती झाली होती. त्याआधारे जिल्ह्यासाठी १६२३०.७९ लाख रुपयांचा अर्थात १६२.३० कोटी रुपयांचा निधी निश्चित करण्यात आला आहे.

दरम्यान, जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेला निधी जिल्ह्यांतर्गत वितरित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना देण्यात आले आहेत. निश्चित निधी पूर्ण खर्च झाल्यानंतर आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी जिल्ह्याला उपलब्ध करून देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे रोजगाराची मागणी वाढल्यास त्यानुसार निधी उपलब्ध करून देत ग्रामीण भागातील मजुरांची रोजगाराची वैधानिक हमी कायम ठेवण्याची कार्यवाही केली जाणार आहे. नवीन मार्गदर्शक सूचनानुसार व्ही. बी. जी.रामजी योजनेची जिल्ह्यात अंमलबजावणी केली जाणार आहे.

### मजुरांच्या मागणीनुसार रोजगार

■ ग्रामपंचायतींचे ए, बी आणि सी श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात येणार असले तरी ग्रामस्तरावरून प्राप्त होणारी रोजगाराची मागणी अनिवार्यपणे विचारात घेऊन निर्धारित कालमर्यादेत रोजगार उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेला निधी जिल्हांतर्गत वितरित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना देण्यात आले आहेत. हा निधी चालू आर्थिक वर्षात पूर्णपणे खर्च होईल याची जबाबदारीही त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. निश्चित निधी पूर्ण खर्च झाल्यानंतर आवश्यकतेनुसार अतिरिक्त मानकाधारित निधी जिल्ह्यांना वितरित करण्याची तरतूद शासन निर्णयात करण्यात आली आहे.

### १२५ दिवस रोजगाराची हमी

■ योजनेअंतर्गत १२५ दिवसांपर्यंतच्या अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे वर्षभरात केव्हाही, पावसाळ्यातही मजुरांकडून कामाची मागणी आल्यास विहित कालावधीत रोजगार उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे वर्षभरात कोणत्याही कालावधीत मजुरांनी संबंधित यंत्रणेकडे कामाची मागणी केल्यास मजुरांना तात्काळ काम उपलब्ध केले जाणार आहे.



# अकोला नाका-काटा चौक मार्गावर नो-एंट्री

## रस्ता कामामुळे आजपासून वाहतूक बंद

वाशिम / प्रतिनिधी

वाशिम शहरातील अकोला नाका ते काटा चौक या सुमारे १.२ किलोमीटर रस्त्याचे बांधकाम सुरू असल्याने या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक ४ सप्टेंबरपासून पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ (१) (ख) अन्वये याबाबत आदेश जारी केले आहेत. अकोला नाका ते काटा चौक मार्गावरील वाहतूक जिल्हा शासकीय रुग्णालय, आरटीओ कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, आर.ए. कॉलेज व परिसरातील इतर शासकीय कार्यालयांच्या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

### काटा, कोंडाळ्यासाठी पर्यायी मार्ग

■ काटा, कोंडाळा तसेच संबंधित ग्रामीण भागाकडे जाणाऱ्या वाहनांसाठी अकोला नाका ते अकोला रोड, वाटाणे लॉन, पाटील धाबा, काटा-कोंडाळा रोडमार्गे पुढे जाण्याचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### दुचाकींसाठी वन-वे

■ काटा चौक ते अकोला नाका या मार्गावर केवळ दुचाकी वाहनांसाठी एकेरी वाहतूक सुरू राहणार आहे. दरम्यान, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने, पोलीस वाहने, शासकीय अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच आपत्कालीन वाहनांना सुट देण्यात आली आहे.

# गोठ्याला आग ; तीन जनावरे जळून खाक

रिसोड / प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे चिंचाबांभर शेतशिवारात शेतातील गोठ्याला बुधवारी, २ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत दोन गायी, एक गोऱ्हा तसेच शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत शेतकरी रामेश्वर अश्रुजी जायभाये, रा. कंकरवाडी यांचे सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले.

रामेश्वर जायभाये हे नेहमीप्रमाणे जनावरांना चारापाणी करून गोठा बंद करून सायंकाळी घरी गेले होते. दरम्यान, रात्री ८ वाजताच्या सुमारास शेजारील शेतकऱ्याने फोन करून गोठ्याला आग लागल्याची माहिती दिली. आग विझविण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने आगीवर वेळीच नियंत्रण मिळविता आले नाही. जायभाये कुटुंबीयांसह शेतात पोहोचेपर्यंत गोठा आणि त्यातील साहित्य आगीत जळून खाक झाले होते. आगीत दोन गायी, एक गोऱ्हा मृत्युमुखी पडले. स्प्रिंकलर संच, प्रेशर पंप, चार्जिंग पंप, ड्रिप बंडल, हळदीच्या खताच्या बॅग, ताडपत्री, गोठ्याचे साहित्य तसेच अन्य वस्तूंचे नुकसान झाले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे



शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. घटनेचा पंचनामा तलाठी प्रज्ञा गरकळ यांनी करून अहवाल शासनाकडे पाठविला आहे.

# शेतकरी कुटुंबातील सख्खे भाऊ देशसेवेत चमकले!

गजानन गाडे

**सवड :** शेतकरी कुटुंबातून आलेल्या सिद्धार्थ सुखदेव खंडारे आणि कुमार सुखदेव खंडारे या दोन सख्ख्या भावांनी भारतीय सैन्य दलात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत कुटुंबासह सवड गावाचा गौरव वाढविला आहे. सिद्धार्थ यांची सुभेदारपदी, तर कुमार यांची नायब सुभेदारपदी पदोन्नती झाली आहे.

आई-वडिलांचे संस्कार, कष्टाची जिद्द आणि देशसेवेची प्रेरणा घेऊन दोन्ही भावांनी भारतीय सैन्य दलात प्रवेश केला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी



कुमार सुखदेव खंडारे



सिद्धार्थ सुखदेव खंडारे

अनेक वर्षे प्रामाणिकपणे देशसेवा बजावली. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची दखल घेत मिळालेली पदोन्नती हा त्यांच्या मेहनतीचा आणि खंडारे कुटुंबाच्या संस्कारांचा गौरव असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. दोन्ही भावांच्या या यशामुळे सवडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, त्यांच्या कर्तृत्वाचे गावात कौतुक होत आहे. त्यांच्या यशातून ग्रामीण भागातील तरुणांना देशसेवेची प्रेरणा मिळत आहे. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल नुकताच सिद्धार्थ व कुमार खंडारे यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामस्थ व मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन दोन्ही भावांचा गौरव करण्यात आला. यावेळी यासीन शहा, स्वप्निल मंडलिक, योगेश अंभोरे, सचिन खंडारे, कृष्णा पंडित, आकाश खांदळे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सवडच्या शिरपेचात मानाचा तुरा

■ आई-वडिलांच्या संस्कारातून देशसेवेची प्रेरणा घेत सिद्धार्थ व कुमार खंडारे यांनी भारतीय सैन्य दलात उल्लेखनीय कामगिरी केली. अनेक वर्षांच्या सेवेनंतर सिद्धार्थ खंडारे यांची सुभेदारपदी, तर कुमार खंडारे यांची नायब सुभेदारपदी पदोन्नती झाली. त्यांच्या या यशामुळे सवड गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला असून, दोन्ही भावांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. देशसेवेतील त्यांची कामगिरी नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# मानोरा खरेदी-विक्री संस्थेची वार्षिक सभा उत्साहात

मानोरा / प्रतिनिधी

तालुका खरेदी-विक्री सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण आमसभा बुधवारी संस्थेच्या अध्यक्षा सपना विक्रांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत संस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेऊन आगामी वर्षातील नियोजन, आर्थिक बाबी आणि सभासदांच्या हितासंबंधी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

प्रारंभी संस्थेचे व्यवस्थापक एस. व्ही. इंगळे यांनी मागील वार्षिक आमसभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यासाठी सभेसमोर मांडले. तसेच समितीने संमत केलेला वार्षिक अहवाल व वार्षिक हिशोबाची पत्रके मंजुरीसाठी ठेवण्यात आली. वार्षिक अंदाजपत्रकापेक्षा झालेल्या अधिक खर्चास मंजुरी, २०२५-२६ च्या नफ्याची वाटणी, २०२६-२७ साठी कर्ज मर्यादा, अंदाजपत्रक तसेच अंकेक्षण अहवालातील दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

२०२६-२७ साठी अंकेक्षक नियुक्तीच्या विषयावरही विचारविनिमय झाला. सभेला अध्यक्षा सपना विक्रांत देशमुख, संचालक भारत चव्हाण, गणेश पवार, दादाराव दुमारे, रूपेश पवार, जगदीश वाघमारे, धनंजय वानखेडे, अन्वर पटेल, गणेश मिसाळ, पद्मा देशमुख तसेच सभासद यशवंत इंगळे, सुरेश पाटील गावंडे, विक्रांत देशमुख, नागनाथ आप्पा घाटरे, सुभाष पवार, प्रविण देशमुख उपस्थित होते. व्यवस्थापक एस. व्ही. इंगळे तसेच कर्मचारी पिंजरकर, आमटे, ठाकरे, शिंदे उपस्थित होते.



### सभासदांच्या हिताला प्राधान्य

■ संस्थेचा कारभार अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर देण्याचा निर्धार आमसभेत व्यक्त करण्यात आला. आगामी काळात संस्थेच्या कामकाजात आवश्यक सुधारणा करून सभासदांना अधिक चांगल्या सेवा देण्याबाबतही चर्चा झाली.

### अभिलेख नकाशांचे अद्ययावतीकरण होणार

वाशिम / प्रतिनिधी

जिल्ह्यातील भूमी अभिलेख नकाशांची अचूकता वाढविण्यासाठी ७९३ गावांतील १ लाख ६६ हजार ७२५ बहुभुजांची नकाशानिहाय पडताळणी करून सुधारित नकाशे तयार करण्यात येणार आहेत. यासाठी अनुभवी संस्थांकडून सीलबंद दरपत्रके मागविण्यात आली असून, १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ती सादर करता येतील. कामासाठी संस्थेची मागील तीन वर्षांतील सरासरी वार्षिक उलाढाल किमान १६ लाख रुपये असणे आवश्यक आहे.

# तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

मंगरूळपीर / प्रतिनिधी

तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीची तातडीने दखल घेऊन तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

पावसाअभावी तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असून, शेतीपिकांवरही विपरीत परिणाम झाला आहे. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने तातडीने पंचनामे करून दुष्काळी परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत व आवश्यक दिलासा द्यावा, अशीही मागणी करण्यात आली. निवेदन देतेवेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर, मंगरूळपीर तालुकाप्रमुख अर्जुन भीमराव पाटील सुर्वे, निखिल इंगोले, भागवत शिंदे, शिवा सावके, धीरज राऊत, राम सावके, ओमप्रकाश इंगळे, राहुल माळी, आनंदा काळे आणि शंकर सावके उपस्थित होते.

## अधिकृत संकेतस्थळावरूनच बुकिंग करण्याचे वाशिम पोलिसांचे आवाहन

# 'चारधाम'च्या नावाखाली फसवणुकीचा धोका

वाशिम / प्रतिनिधी

चारधाम यात्रेसाठी ऑनलाइन बुकिंग करताना सायबर फसवणुकीला बळी पडू नये, यासाठी वाशिम पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. हेलिकॉप्टर सेवा, हॉटेल तसेच टूर अँड ट्रॅव्हल पॅकेजच्या ऑनलाइन बुकिंगच्या नावाखाली बनावट संकेतस्थळे व लिंक तयार करून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

उत्तराखंड सरकारकडून महाराष्ट्र राज्यातील चारधाम यात्रेकरू व पर्यटकांसाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. चारधाम यात्रेसाठी भाविक ऑनलाइन माहितीचा शोध घेत असताना सायबर गुन्हेगारांकडून बनावट संकेतस्थळे व लिंक तयार केल्या जात आहेत. गुगल किंवा इतर शोधयंत्रांवर माहिती शोधताना अशा बनावट वेबसाइटच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता आहे. चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर बुकिंग करताना नागरिकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा. पोलिसांनी अधिकृत संकेतस्थळावरूनच हेलिकॉप्टर बुकिंग करण्याचे आवाहन केले आहे. तसेच उत्तराखंड पर्यटन विभागाकडून अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.




### बनावट लिंकपासून सावध राहा

■ चारधाम यात्रेच्या नावाखाली कोणत्याही अनोळखी वेबसाइट, सोशल मीडिया जाहिरात किंवा व्यक्तीवर विश्वास ठेवून ऑनलाइन पैसे भरू नयेत. बुकिंग करण्यापूर्वी संकेतस्थळ अधिकृत आहे की नाही, याची खात्री करावी. नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सावध राहून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन वाशिम पोलिसांनी केले आहे.

> चारधाम यात्रेसाठी ऑनलाइन बुकिंग करताना नागरिकांनी कोणत्याही अनोळखी वेबसाइट, लिंक किंवा व्यक्तीवर विश्वास ठेवून आर्थिक व्यवहार करू नये. बुकिंग करण्यापूर्वी संबंधित संकेतस्थळ अधिकृत आहे की नाही, याची खातरजमा करावी. सायबर फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षित ऑनलाइन व्यवहार करावेत.
>
> – **निकेश खाटमोडे,** पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम

### कुऱ्हाडीने हल्ला ; महिलेला एक वर्ष सक्तमजुरी

मंगरूळपीर / प्रतिनिधी

कौटुंबिक वादातून कुऱ्हाडीने वार करून संतोष कोंडीराम लोंढे यांना गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी महिलेला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ख्वाजा कलाल यांनी एक वर्ष सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाच्या रकमेपैकी ८ हजार रुपये जखमीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने २ सप्टेंबर रोजी दिले.

४ ऑक्टोबर २०१५ रोजी बिटोडा भोयर येथे झालेल्या वादातून आरोपी महिलेने कुऱ्हाडीने लोंढे यांच्या चेहऱ्यावर वार केला होता. यात त्यांच्या नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले होते. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता सन्मती महावीर बाकलीवाल यांनी कामकाज पाहिले.

# गणेशोत्सव परवानगीसाठी आता सिटीझन पोर्टलचा आधार

## घरबसल्या करता येणार ऑनलाईन अर्ज

मानोरा / प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मानोरा पोलिसांनी गणेश मंडळांसाठी ऑनलाईन परवानगी अर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या परवानगीसाठी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना पोलीस ठाण्यात वारंवार जाण्याची गरज राहणार नाही. मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक नैना पोहेकर यांनी केले आहे.

गणेशोत्सवाची परवानगी घेण्यासाठी मंडळांनी सिटीझन पोर्टलवर जाऊन 'गणेशोत्सव परवानगी अर्ज' हा पर्याय निवडावा. त्यानंतर आवश्यक माहिती भरून अर्ज ऑनलाईन सादर करता येणार आहे. अर्ज सादर केल्यानंतर मिळालेला अर्ज क्रमांक जतन करून ठेवल्यास अर्जाची स्थिती ऑनलाइन तपासता येणार आहे. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमुळे घरबसल्याही अर्ज करता येणार असल्याने मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा वेळ वाचणार आहे.

### ऑफलाइन अर्जासाठी झेरॉक्स सेंटरची सुविधा

■ मानोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणेश मंडळांना ऑफलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंडळांना मानोरा येथील झेरॉक्स सेंटरवरून अर्ज मिळणार असून, तेथेच अर्जाची प्रक्रिया करता येणार आहे.

## पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान

# भारताच्या श्रीकांतने वर्ल्ड नंबर-९ व्हिक्टर लाईला हरवले

**शेनझेन एरिना, वृत्तसंस्था :**

चीनमधील शेनझेन एरिना येथे सुरू असलेल्या चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा अनुभवी खेळाडू किदांबी श्रीकांतने पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले आहे.

गुरुवारी दुसऱ्या फेरीत माजी वर्ल्ड नंबर-१ श्रीकांतने कॅनडाच्या वर्ल्ड नंबर-९ व्हिक्टर लाईला २१-१८, २१-१९ अशा फरकाने हरवून धक्कादायक विजय मिळवला. दुसरीकडे, महिला एकेरीत नुकतेच चायपे ओपन सुपर ३०० चे विजेतेपद पटकावणारी तन्वी शर्मा जपानच्या वर्ल्ड नंबर-९ टोमोका मियाझाकीकडून १७-२१, २१-१८, १६-२१ अशा फरकाने पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडली. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनीषा क्रास्टोची जोडीही दुसऱ्या फेरीत पराभूत झाली.

पहिल्या गेममध्ये श्रीकांत ३-७ ने मागे होता. त्याने लाईच्या चुकांचा फायदा घेत स्कोअर ८-८ ने बरोबरीत आणला. ब्रेकपर्यंत लाई ११-९ ने पुढे होता आणि नंतर त्याने आघाडी १५-११ पर्यंत वाढवली. यानंतर श्रीकांतने सलग गुण मिळवले आणि स्कोअर १५-१५ केला. त्याने १८-१६ ची आघाडी घेतली आणि २१-१८ ने पहिला गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये श्रीकांत ५-९ आणि नंतर ९-१४ ने मागे होता. त्याने सलग गुण मिळवून स्कोअर १३-१४ केला आणि १८-१८ ने बरोबरी साधली. यानंतर लाईचा शॉट बाहेर गेला आणि श्रीकांतला मॅच पॉइंट मिळाला. पुढील रॅलीमध्ये लाईचा शॉट पुन्हा बाहेर गेला आणि श्रीकांतने २१-१९ ने गेम जिंकून सामना आपल्या नावावर केला.



### पुढील सामना ली चेउक यू सोबत

माजी वर्ल्ड नंबर-१ श्रीकांतचा क्वार्टर फायनलमध्ये हाँगकाँगच्या ली चेउक यूशी सामना होईल. श्रीकांत याच वर्षी यूएस ओपन सुपर ३०० च्या अंतिम फेरीतही पोहोचला होता. तर, व्हिक्टर लाईने गेल्या महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये आपले दुसरे कांस्यपदक जिंकले होते. त्याने याच वर्षी इंडोनेशियामध्ये आपले पहिले सुपर १००० विजेतेपदही जिंकले आहे.

### तन्वी शर्मा तीन गेममध्ये हरली

महिला एकेरीत तन्वी शर्माने टोमोका मियाझाकीला कडवी झुंज दिली, पण निर्णायक गेममध्ये ती हरली. तन्वीने पहिला गेम १७-२१ ने गमावला, त्यानंतर दुसरा गेम २१-१८ ने जिंकून पुनरागमन केले. तिसऱ्या गेममध्ये मियाझाकीने २१-१६ ने विजय मिळवून भारतीय खेळाडूचा प्रवास थांबवला.

# ७५ हून अधिक राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान; २५० खेळाडूंचा विविध उपक्रमांत सहभाग

**बुलढाणा/ प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये क्रीडाविषयक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा दिवस देशभरात 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांच्या वतीने जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या विविध कार्यक्रमांमध्ये ७५ हून अधिक राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच भारतीय खेल प्राधिकरणाच्या मार्गदर्शनानुसार आयोजित विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये सुमारे २५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले. यामध्ये मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन, त्यांच्या जीवनावर व्याख्याने, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार, खेळाडूंना मान्यवरांचे मार्गदर्शन तसेच विविध क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. भारतीय खेल प्राधिकरणाच्या उपक्रमांतर्गत २८ ऑगस्ट रोजी '२९ चॅलेंज', 'पास द बॉल' आणि 'स्पोर्ट्स बंधन' या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी 'एक तास खेळाच्या मैदानात' या उपक्रमांतर्गत मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तर ३० ऑगस्ट रोजी 'संडे ऑन' उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप १ सप्टेंबर रोजी करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, राखीव पोलीस निरीक्षक विकास तिडके तसेच प्राध्यापक डॉ. मनोज व्यवहारे यांच्या उपस्थितीत खेळाडूंचा सत्कार व सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा पुरस्कारार्थी डॉ. गायत्री सावजी यांनी केले. प्रस्तावना राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांनी केली, तर आभार राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जीवन मोहोड यांनी मानले.




### जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन गौरव

सन २०२५-२६ मध्ये शालेय तसेच अधिकृत एकविध खेळ संघटनांमार्फत आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या तसेच सहभाग घेतलेल्या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलढाणा येथे झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कारार्थी चंद्रकांत इलक, हॉकी मार्गदर्शक सय्यद आबिद आणि क्रीडा शिक्षक रविंद्र गणेशे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ब्राझीलच्या आगमनामुळे भारतीय फुटबॉलला प्रसिद्धी : गांगुली

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

माजी भारतीय कर्णधार सौरव गांगुली यांनी ब्राझीलच्या भारत दौऱ्याला पाठिंबा दिला आहे. गुरुवारी ते म्हणाले, 'ब्राझील एक मजबूत फुटबॉल संघ आहे. त्यांच्या इथे येण्याने भारतीय फुटबॉलला प्रसिद्धी मिळेल.

१४ दिवसांपूर्वी भारतीय फुटबॉल संघाचे माजी कर्णधार बायचुंग भुतिया यांनी भारतीय फुटबॉल चाहत्यांना भारत-ब्राझील मैत्रीपूर्ण सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते.

भारत आणि ब्राझील यांच्यातील आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामना ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये खेळवला जाईल.



गांगुलींना भारत-ब्राझील सामन्याबद्दल विचारण्यात आले होते. यावर ते म्हणाले, 'फुटबॉल एक उत्कृष्ट खेळ आहे. मला तो पाहायला आवडतो. ब्राझील जगातील महान फुटबॉल खेळणाऱ्या देशांपैकी एक आहे. मला आशा आहे की ते खूप मजबूत संघासह येतील.'

### खेळाडू-क्लबसना मदत करा : भुतिया

सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या आवाहनामागे भुतियांचा तर्क होता की या सामन्यावर ५० ते ७० कोटी रुपये खर्च होतील. एका मैत्रीपूर्ण सामन्यासाठी एवढा पैसा खर्च करणे योग्य नाही. हा पैसा बंगालमधील खेळाडू, फुटबॉल पायाभूत सुविधा, फुटसल मैदाने आणि आर्थिक संकटात असलेल्या क्लब्सवर खर्च केला जाऊ शकतो.

# लक्ष्मण एशियन गेम्समध्ये भारतीय पुरुष संघाचे प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** नॅशनल क्रिकेट अकादमीचे संचालक व्हीव्हीएस लक्ष्मण या महिन्यात जपानमधील आइची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष संघाचे प्रशिक्षक असतील. क्रीडा मंत्रालयाने प्रशिक्षकांची यादी जाहीर केली आहे.



लक्ष्मण यांच्यासोबत सुनील जोशी, ऋषिकेश कानिटकर आणि सुभदीप घोष हे देखील संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये असतील. लक्ष्मण यांनी २०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारतीय संघाला प्रशिक्षण दिले होते, जिथे संघाने सुवर्णपदक जिंकले होते. संघाचे नियमित मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावर होणाऱ्या एकदिवसीय मालिकेदरम्यान वरिष्ठ संघासोबत असतील. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना २७ सप्टेंबरपासून सुरू होईल. आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होईल. भारतीय संघ आपला पहिला सामना याच्या चार दिवसांनी खेळेल.




### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**टॉक्सीक : अ फेअरी टेल फॉर ग्रॉन युपीएस :** स. ९:३०, ११:१५, दु. १२:१५, २:३०, ४:३०, सायं. ५:३०, ६:३०, रा.१०:००

**हनुमान अंश :** दु.१२:१५, २:३०, ४:३०, सायं. ५:३०,

**बटवारा १९४७ :** दु. १२:३०, सायं. ५:३०, ६:३०, रा. १०:००

**स्पायडर मॅन ब्रॅण्ड न्यू डे (हिंदी) :** दु. १२:३०, सायं. ५:३०, ६:३०,

**आवारापण-२ :** दु. १२:१५, २:३०,

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**हनुमान अंश :** स. ११:१५, दु. १२:१५, २:३०, ४:३०, सायं. ५:३०, ६:३०

**टॉक्सीक : अ फेअरी टेल फॉर ग्रॉन युपीएस :** दु. १२:१५, सायं. ४:३०, ६:३०

**आवारापण-२ :** दु. १२:१५, सायं. ४:३०, ६:३०

**बटवारा १९४७ :** दु. १२:३०, २:३०, रा. १०:२५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**हनुमान अंश :** स. १०:००, दु. १२:००, ३:००, ४:००, सायं. ६:००,

**टॉक्सीक : अ फेअरी टेल फॉर ग्रॉन युपीएस :** स. १०:१०, दु. ०५:३०, सायं. ८:००

**टॉक्सीक : अ फेअरी टेल फॉर ग्रॉन युपीएस :** दु. १२:१५, सायं. ४:३०, ६:३०

**आवारापण-२ :** दु. २:३०, रात्री. १०:२५

**धमाल-४ :** दु. १२:००, २:३०, रा. ९:३०

### खामगाव

**श्री गजानन टॉकीज**

**टॉक्सीक :** दु. १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस**

**टॉक्सीक :** दु. १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### शेगाव

**माऊली सिनेप्लेक्स**

**टॉक्सीक :** स. ११.४५, दु. २.४५, साय. ६.१५, रात्री. ९.५४

**आवारापण-२ :** दु. १२.१५,

**हनुमान अंश :** दु. ३:१५

**टॉक्सीक :** साय. ६.२०, रात्री. ९.४५

### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**टॉक्सिक :** दु. १:३०, ५:००, ५:३० रात्री ८:४५, ९:४५

**हनुमान अंश :** दु. २:००

### अकोला

**मिराज**

**स्पाईडर मॅन : ब्रॅन्ड न्यू डे (हिंदी)** - स. १०.३०, दु. १२.००, दु. ३.०० ४.३०, सायं. ७.३०, रात्री ९,०० १०.३०

**स्पाईडर मॅन : ब्रॅन्ड न्यू डे (इंग्रजी)** - दु. १.३०, सायं. ६.००

**ओह माय डॉग (हिंदी)** - दु. ३.१५, सायं. ६.१५

**हनुमान अंश** - दु. ४.००

**धम्माल ४** - सायं. ७.००, रात्री १०.००

**डीसी : दी ब्लडी व्हॅलेटाईन** - रात्री ९.१५

### वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

| | |
|---|---|
| **धमाल ४** | दु. १२.१५, सायं. ६.२५ |
| **स्पायडर मॅन ब्रॅण्ड न्यू डे** | दु.१२.३०, ३.३०, सायं. ६.३०, रा. ९.३० |
| **जननेता** | दु. ३.१५, रा. ९.२५ |




# करीना कपूरने ११वीनंतर शिक्षण सोडले होते..

## शिक्षण पूर्ण न केल्याचा आजही पश्चात्ताप



अभिनेत्री करीना कपूर खानने नुकतेच सांगितले की तिने ११वी नंतर शिक्षण सोडून चित्रपटांमध्ये काम करायला सुरुवात केली होती.

यूट्यूब चॅनलवरील संवादात करीना म्हणाली की तिने आपले शिक्षण पूर्ण केले नाही, ज्याचा तिला यश मिळाल्यानंतरही पश्चात्ताप राहिला. ती म्हणाली, ''मी माझे शिक्षण पूर्ण केले नाही आणि ही गोष्ट माझ्या मनात राहिली. मला संधी मिळाली होती, पण मी चित्रपटांमध्ये आले आणि ११वी नंतर पुढे शिक्षण घेतले नाही.''

करीनाने मान्य केले की लोक तिच्या शिक्षण सोडण्याच्या निर्णयावर प्रश्न विचारू शकतात, पण तिला अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध करायचे होते. ती म्हणाली की तिला आपल्या मनाचे ऐकून पुढे जायचे होते.

करीनाने स्पष्टपणे सांगितले की शिक्षण पूर्ण न करणे आजही तिच्यासाठी पश्चात्तापाची बाब आहे. ती म्हणाली, ''शिक्षण अशी गोष्ट आहे, जी पूर्ण न केल्याचा मला पश्चात्ताप आहे.''

करीनाने सांगितले की तिच्या स्वतःच्या अनुभवाचा तिच्या मुलांच्या संगोपनावरही परिणाम झाला आहे. तिची इच्छा आहे की तैमूर आणि जेह त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात पुढे जावेत, पण त्याआधी त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण करावे. ती म्हणाली, ''म्हणूनच मी माझ्या मुलांना आधी त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यास आणि नंतर त्यांच्या मनाचे ऐकण्यास सांगितले आहे.'' करीना कपूरचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील जमनाबाई नरसी स्कूल आणि देहरादूनमधील वेल्हम गर्ल्स स्कूलमधून झाले होते. त्यानंतर तिने मुंबईतील मिठीबाई कॉलेजमध्ये कॉमर्सचे शिक्षण घेतले. मात्र, तिने कॉलेजची पदवी पूर्ण केली नाही. करीनाने हार्वर्ड समर स्कूलमधून मायक्रो कॉम्प्युटरचा तीन महिन्यांचा कोर्सही केला होता. त्यानंतर तिने मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पण अभिनयात करिअर करण्यासाठी तिने शिक्षण अर्धवट सोडले.

# अपरा मेहता यांना कुरूप म्हटल्याच्या आरोपावर दर्शन जरीवाला यांचे स्पष्टीकरण

ज्येष्ठ अभिनेते दर्शन जरीवाला यांनी वेगळ्या राहत असलेल्या पत्नी आणि अभिनेत्री अपरा मेहता यांनी त्यांना कुरूप म्हटले असल्याच्या आरोपांवर स्पष्टीकरण दिले.



काही काळापूर्वी अपरा मेहता यांनी दर्शन जरीवाला यांच्यापासून वेगळे होण्याबद्दल बोलले होते. दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, दर्शन घर सोडून निघून गेले होते आणि त्यांना आजवरची सर्वात कुरूप महिला म्हटले होते.

अपरा यांनी हे देखील सांगितले होते की, दर्शन यांनी त्यांना सांगितले होते की, त्यांचे प्रेम संपले आहे. आता दर्शन यांनी त्यांच्या वेगळ्या राहत असलेल्या पत्नीच्या या आरोपांवर उत्तर दिले आहे.

सिद्धार्थ कन्नन यांच्याशी बोलताना दर्शन यांनी अपरा यांनी सांगितलेल्या घटना चुकीच्या असल्याचे सांगितले. दर्शन म्हणाले, ''एक न्यूरोलॉजिकल घटना असते, ज्यात वेळेनुसार एखाद्या घटनेची आठवण बदलत राहते. मी खूप उदारपणे म्हणू शकतो की हा चुकीच्या आठवणीचा प्रकार आहे. ज्या पद्धतीने हे सांगितले गेले आहे, तसे काही घडलेच नव्हते.''

अभिनेत्याने अपराच्या रूपावर कोणतीही टिप्पणी केल्याचा इन्कार केला. अशा गोष्टी त्यांच्या स्वभावाला शोभत नाहीत, असे ते म्हणाले.

दर्शन म्हणाले, ''मी असा माणूस नाही जो एखाद्या सामान्य दिसणाऱ्या स्त्रीलाही कुरूप म्हणेल. असे बोलणे पूर्णपणे अनावश्यक असते. जर मी स्वतःला चांगले ओळखत असेन, तर मी व्यक्तीच्या आतल्या गोष्टींबद्दल बोलतो, तिच्या बाह्य रूपाबद्दल नाही.'' दर्शन म्हणाले की अपरा 'व्हिक्टिम कार्ड' खेळण्यासाठी पूर्णपणे स्वतंत्र आहे. ते म्हणाले की ते त्यांच्या भूतकाळापासून पुढे गेले आहेत आणि आज त्यांच्या आयुष्यात खूप आनंदी आहेत.

# प्रीती झिंटा म्हणाली, मी रोज १८ तास काम केले...

चित्रपटसृष्टीत कामाच्या लांब तासांवर आणि वर्क-लाइफ बॅलन्सबाबतची चर्चा पुन्हा एकदा तीव्र झाली आहे. जवळपास एका दशकाच्या अंतराने मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणाऱ्या अभिनेत्री प्रीती झिंटाने या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.



मुंबईत तिच्या आगामी ॲक्शन-कॉमेडी चित्रपट 'वाइब'च्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात प्रीती झिंटाने खुलासा केला की, तिने या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान दररोज १८ तास काम केले.

तिने स्पष्ट केले की, ''प्रत्येकाच्या स्वतःच्या प्राधान्यक्रम असतात'' आणि तिने भारतात तिच्या कमी वेळेच्या दौऱ्यासाठी आणि अमेरिकेत मुलांकडे लवकर परत जाण्यासाठी स्वतःच हे लांब शेड्यूल निवडले होते.

ट्रेलर लॉन्चदरम्यान जेव्हा मीडियाने प्रीती झिंटाला सेटवरील लांबच्या कामाच्या तासांबद्दल प्रश्न विचारला, तेव्हा तिने सांगितले की दीर्घकाळ शूटिंग करणे कठीण होते, पण हा तिचा वैयक्तिक निर्णय होता. ५० वर्षीय प्रीती झिंटा म्हणाली, प्रत्येकाच्या स्वतःच्या आवडी आणि गरजा असतात. नक्कीच, मी १८ तास काम केले कारण मला माझे काम शक्य तितक्या लवकर संपवून अमेरिकेत परत माझ्या मुलांकडे जायचे होते. माझे लक्ष फक्त हेच होते की मी भारतात येईन, माझे काम लवकर पूर्ण करेन आणि लगेच परत जाईन. मी येथे ३० ते ४० दिवसांसाठी आले होते. त्यामुळे मला इतक्या लांब शिफ्टमध्ये काम करण्यात कोणतीही हरकत नव्हती. प्रीतीने हे देखील सांगितले की या चित्रपटात तिने अनेक कठीण ॲक्शन सीन्स स्वतः केले आहेत, ज्यासाठी सतत लांब शोज आणि शारीरिक श्रमाची गरज होती.